सावित्रीबाई फुले
पुणे विद्यापीठ

७५
वर्षांचा
गौरवशाली
वारसा



# विद्यापीठ मुद्रणालय

## अमृतमहोत्सव

१९५०



२०२५

# दिशा आणि वाटचाल

विद्येच्या सेवेत मुद्रणकलेतील पंचाहत्तर वर्षांची ठसठशीत वाटचाल!


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय अमृत महोत्सव विशेषांक
# (१९५०-२०२५)



**मालोजीराजे नाईक-निंबाळकर**
संस्थापक- राजमुद्रणालय (फलटण)



**बॅ. डॉ. मु. रा. जयकर**
पहिले कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**प्रा. डॉ. सुरेश गोसावी**
कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**प्रा. डॉ. नरेंद्र जाधव**
प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, रिझर्व बँकेचे मुख्य आर्थिक सल्लागार,
माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**प्रा. डॉ. पराग काळकर**
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**प्रा. डॉ. ज्योती भाकरे**
प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले
पुणे विद्यापीठ





७५
वर्षांचा
गौरवशाली
वारसा


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## विद्यापीठ मुद्रणालय

७५
अमृत महोत्सवी वर्ष
१९५० – २०२५

अमृतमहोत्सव

## विशेष पुस्तिका



सावित्रीबाई फुले
पुणे विद्यापीठ

७५ वर्षांचा गौरवशाली वारसा

# विद्यापीठ मुद्रणालय

## अमृतमहोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालयाचा अमृतमहोत्सव समारंभ
गुरूवार, दि. १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वा.
विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात संपन्न होत आहे.

**कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे**

**मा. प्रा. डॉ. नरेंद्र जाधव**
प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, रिझर्व बँकेचे मुख्य आर्थिक सल्लागार,
माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

**मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी**
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**मान्यवर वक्ते**

**मा. श्री. रु. दि. मोरे**
संचालक, शासन मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र शासन

**मा. श्री. निलेश जाधव**
संयुक्त महाप्रबंधक, भारत प्रतिभूति मुद्रणालय, नाशिक

**मा. श्रीमती अनुराधा ओक**
संचालक, बालभारती, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रमुख उपस्थिती**

**प्रा. डॉ. पराग काळकर**
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**प्रा. डॉ. ज्योती भाकरे**
प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**सन्माननीय उपस्थिती**

**श्री. रविंद्र शिंगणापूरकर**
**डॉ. ज्योत्स्ना एकबोटे**
**प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे**
**प्रा. संदीप पालवे**
**श्री. सागर वैद्य**
**प्रा. डॉ. सुदर्शन कुमार**
**प्रा. डॉ. प्रभाकर देसाई**
**डॉ. राजेंद्र विखे पाटील**
**प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे**
**प्रा. डॉ. धोंडीराम पवार**
**श्रीमती बागेश्री मंठाळकर**
**प्रा. डॉ. संगीता जगताप**
**सीएमए. डॉ. चारूशीला गायके**

**या समारंभासाठी आपण उपस्थित राहावे, अशी आग्रहाची विनंती आपणांस करीत आहे.**

**निमंत्रक**

**डॉ. दत्तात्रय कुटे,** व्यवस्थापक, विद्यापीठ मुद्रणालय

## मुद्रणालय तांत्रिक आणि सल्लागार समिती :

- प्रा. डॉ. ज्योती भाकरे (अध्यक्ष)
- प्रा. डॉ. प्रभाकर देसाई
- प्रा. मधुरा महाजन
- सीएमए. डॉ. चारूशीला गायके
- डॉ. मुंजाजी रासवे
- डॉ. दत्तात्रय कुटे

**मुद्रक व प्रकाशक :** **प्रा. डॉ. ज्योती भाकरे,** प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
**मुद्रणस्थळ** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पुणे-४११००७.



फलटण राजमुद्रणालया बरोबर आलेला सेवक वर्ग



प्रा. डॉ. नरेंद्र जाधव, कुलगुरू, विद्यापीठ मुद्रणालयातील कर्मचारी वर्गासोबत




श्री. भगत सिंह कोश्यारी, माजी कुलपती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरू हे व्यवस्थापक, विद्यापीठ मुद्रणालय डॉ. दत्तात्रय कुटे आणि मुद्रणालयातील कर्मचारी वर्गाचा सन्मान करताना




विद्यापीठ मुद्रणालयामध्ये छपाई केलेल्या विद्यापीठ वर्धापन दिन वार्ता विशेषांकाचे प्रकाशन करताना मा. कुलगुरू, डॉ. सुरेश गोसावी, विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर, मा. प्र–कुलगुरू, डॉ. पराग काळकर, मा. प्रभारी कुलसचिव, डॉ. ज्योती भाकरे आणि इतर मान्यवर.



विद्यापीठ मुद्रणालयामध्ये छपाई केलेल्या विद्यापीठ वार्ताचे प्रकाशन करताना मा. कुलगुरू, डॉ. सुरेश गोसावी, डॉ. विजय कुमार सारस्वत, सदस्य नीती आयोग, मा. प्र–कुलगुरू, डॉ. पराग काळकर, मा. प्रभारी कुलसचिव, डॉ. ज्योती भाकरे आणि डॉ. प्रभाकर देसाई.



विद्यापीठ मुद्रणालयातील अधिकारी व सर्व कर्मचारीवर्ग



# मा. कुलगुरू यांचा संदेश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयास ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, हा अभिमानाचा आणि विद्यापीठाच्या इतिहासातील एक आनंदाचा क्षण आहे. ज्ञानसंस्कृतीची मशाल अखंड प्रज्वलित ठेवत आणि मानवी प्रगतीस नवे दिशादर्शन करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्थापनेपासून उच्च शिक्षणक्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यापीठामध्ये निर्माण होणाऱ्या ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, त्याचे संरक्षण आणि व्यापक प्रसार यात मुद्रणालयाने सातत्याने महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. संशोधनग्रंथ, परीक्षा संबंधित साहित्य, शैक्षणिक प्रकाशने, वार्षिक अहवाल, नियतकालिके ते कार्यालयीन कागदपत्रे या सर्व निर्मितीत मुद्रणालय ही आमच्या बौद्धिक व प्रशासकीय संरचनेच्या केंद्रस्थानी असलेली एक महत्त्वपूर्ण संस्था आहे.

विद्यापीठाच्या जडणघडणीत आणि प्रगतीत मुद्रणालयाने दिलेले योगदान अमूल्य असून या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सर्व अधिकारी, कर्मचारी, आणि या संस्थेशी जोडलेल्या सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करू इच्छितो. विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून मुद्रणालय हे केवळ एक तांत्रिक विभाग न राहता विद्यापीठाच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि आर्थिक कार्यप्रणालीचा एक आधारस्तंभ म्हणून कार्यरत आहे. मागील सात दशकांत या मुद्रणालयाने हजारो विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासक आणि संशोधक यांच्या शैक्षणिक प्रवासात आपला मोलाचा वाटा उचलला आहे. विद्यापीठाच्या दैनंदिन कार्यामधील  उत्तरपत्रिका, गुणपत्रके, प्रमाणपत्रे, अहवाल, विविध विभागांच्या शैक्षणिक पुस्तकांची दर्जेदार मांडणी, छपाई व प्रकाशन तसेच विद्यापीठात होणाऱ्या सर्व शैक्षणिक विभागांकडून घेतल्या जाणाऱ्या परिषदांमधून प्रकाशित होणाऱ्या शैक्षणिक साहित्याची सुबक मांडणी व छपाई ही गुणवत्तापूर्ण व दर्जेदारपणे मुद्रणालयाकडून केली जाते. हे सर्व मुद्रणालयाच्या अथक् परिश्रमांचे फलित आहे. विशेषतः विद्यापीठाच्या पदवीप्रदान व वर्धापनदिन वार्ता विशेषांक, विद्यापीठ वार्षिक अहवाल, दैनंदिनी(डायरी), अधिसभा भाषणे व अहवाल तसेच विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या मौल्यवान अशा दुर्मिळ पुस्तकांचे पुनर्प्रकाशन इत्यादी महत्त्वपूर्ण दस्तावेजांची कल्पक, सुयोग्य मांडणी व सुबक छपाई मुद्रणालय अव्याहतपणे करीत आहे.

परीक्षांसाठी लागणारी उत्तरपत्रिका, प्रॅक्टिकल शीट्स आणि पर्यवेक्षक अहवाल या सर्व गोष्टींचे छपाईकार्य मुद्रणालय अत्यंत काटेकोरपणे, वेळेच्या चौकटीत आणि गोपनीयतेचा उच्च दर्जा राखत पूर्ण करते. दरवर्षी लाखो विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी लागणारी ही तयारी एक जबाबदारीची प्रक्रिया

आहे. मुद्रणालयाने या जबाबदारीचे अत्यंत कुशलतेने पालन केलेले आहे. परीक्षेव्यतिरिक्त विद्यापीठाच्या प्रशासन आणि वित्त विभागांसाठी देखील मुद्रणालयाचे योगदान तितकेच महत्त्वाचे आहे. विविध परिपत्रके, वार्षिक अहवाल, सभा व इतिवृत्ते, अहवाल, नियमावली, लेखापरीक्षण, अर्थसंकल्प आणि इतर शासकीय अहवाल यांची छपाई मुद्रणालयातूनच केली जाते. या दस्तऐवजांमधून विद्यापीठाचे कामकाज पारदर्शक आणि दर्जेदार राहिले आहे.

संशोधनाचा विस्तार, गुणवत्तापूर्ण प्रकाशनांची गरज आणि जागतिक स्पर्धेमुळे मुद्रणालयानेही आपली कार्यप्रणाली सतत सुधारून अधिक सकस आणि समृद्ध केली आहे. सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक क्रांतीच्या विचारांचा वारसा लाभलेल्या या विद्यापीठात समानता, मानवतावाद आणि सामाजिक न्याय या मूल्यांना जपत मुद्रण व प्रकाशन संस्काराची परंपरा जपली जात आहे, हे अभिमानास्पद आहे. या ग्रंथाच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या लेखक, संशोधक, संपादक, संग्रहकर्ते व प्रकाशनाशी संलग्न सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. विद्यापीठाच्या ऐतिहासिक नोंदी राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे आणि या उपक्रमाद्वारे त्या दिशेने अत्यंत महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे. आगामी पिढ्यांसाठी हा दस्तऐवज मार्गदर्शक ठरेल आणि विद्यापीठाच्या बौद्धिक व सांस्कृतिक संपदेचा अभ्यास करणाऱ्यांसाठी विश्वसनीय संदर्भ ठरेल, यात शंका नाही.

सध्या जग झपाट्याने डिजिटल युगाकडे वाटचाल करत आहे. अशा परिस्थितीत मुद्रणालयाने आपली कार्यपद्धती तंत्रज्ञानाशी सुसंगत ठेवणे अत्यावश्यक आहे. पारंपरिक ऑफसेट छपाईपासून डिजिटल प्रिंटिंग, क्यूआर कोड आधारित सुरक्षा प्रणाली आणि ई–सर्टिफिकेट्स यांचा वापर करून आधुनिकतेचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. मुद्रणालयातील अधिकारी, कर्मचारी आणि तांत्रिक सहकारी हे या कार्यप्रणालीचे खरे आधार आहेत. त्यांनी दिवसरात्र काम करून वेळेवर छपाई पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. मुद्रणालयातील कर्मचारी शांतपणे, जबाबदारीने आणि निष्ठेने काम पार पाडतात. त्यांचा हा समर्पणभावच मुद्रणालयाच्या यशाचे खरे गमक आहे.

या सर्व उल्लेखनीय कार्यासाठी मी विद्यापीठ मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि या कार्याशी संबंधित सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. सातत्य, समर्पण आणि गुणवत्तेच्या बळावर आपण विद्यापीठाची प्रतिष्ठा उंचावली आहे. अमृतमहोत्सवी वर्ष हे केवळ भूतकाळातील यश साजरे करण्यासाठी नसून पुढील नव्या वाटचालीचे दिशादर्शक ठरावे, असे मला वाटते.

मला खात्री आहे की विद्यापीठ मुद्रणालय भविष्यातही 'गुणवत्ता, गोपनीयता आणि कार्यक्षमतेचे प्रतीक' म्हणून आपली ओळख कायम ठेवेल. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, पर्यावरणपूरक दृष्टिकोन आणि सेवाभाव या तिन्हींच्या माध्यमातून ते विद्यापीठाच्या प्रगतीचा अविभाज्य भाग बनून राहील. या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मी मुद्रणालयाच्या सर्व सहकाऱ्यांना आणि या संस्थेशी निगडित सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

**प्रा. डॉ. सुरेश गोसावी**
**कुलगुरू**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**



# मा. प्र-कुलगुरू यांचा संदेश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयास ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. सात दशकांहून अधिक काळ विद्यापीठाच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि संशोधनात्मक वाटचालीत मुद्रणालयाने बजावलेली भूमिका अमूल्य आहे. या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक सहकारी आणि या संस्थेशी निगडित सर्व घटकांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. विद्यापीठ मुद्रणालय हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्याचे एक दृढ आधारस्तंभ आहे. स्थापनेपासूनच मुद्रणालयाने विद्यापीठाच्या विविध विभागांना आवश्यक असलेल्या छपाई आणि प्रकाशन सेवांद्वारे तांत्रिक सहाय्य केले आणि विद्यापीठाच्या गुणवत्तेचा, शिस्तीचा व प्रतिष्ठेचा स्तर उंचावण्यात मोठे योगदान दिले आहे.

शैक्षणिक कक्षाच्या विविध कामकाजात, विशेषतः शिक्षक मान्यता, अभ्यासक्रम, शैक्षणिक सभांचे अहवाल यामध्ये मुद्रणालयाने सातत्याने अचूक आणि गुणवत्तापूर्ण छपाई पुरवली आहे. विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांसाठी मुद्रणालयाचे योगदान व्यापक आहे. विद्यापीठाची पदव्युत्तर आणि संशोधन प्रवेश प्रक्रिया ही अत्यंत संवेदनशील आणि शिस्तबद्ध स्वरूपाची असते. माहितीपत्रक, प्रवेश सूचना, प्रॉस्पेक्टस आणि मार्गदर्शक पुस्तिका यांसारख्या सर्व कागदपत्रांची छपाई मुद्रणालयामार्फत केली जाते. या प्रक्रियेत वेळेचे व्यवस्थापन, अचूक माहितीचा समावेश आणि आकर्षक सादरीकरण या तिन्ही बाबींचे संयोजन मुद्रणालयाने उत्तमरित्या साधले आहे.

विद्यापीठातील विविध संशोधन प्रकल्पांचे सारांश, प्रबंध प्रकाशन, संशोधन आणि अभ्यास मंडळांचे अहवाल हे सर्व मुद्रणालयाद्वारे छपाई केले जात आहेत. विद्यापीठाचा वार्षिक अहवाल हा विद्यापीठाच्या एकूण कामकाजाचा आरसा असतो. या अहवालाची मांडणी, संपादन आणि छपाई ही जबाबदारी मुद्रणालयाने नेहमीच दर्जेदारपणे पार पाडली आहे. वार्षिक अहवालांमधून विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा, आर्थिक पारदर्शकता आणि शैक्षणिक उपक्रमांची माहिती मिळते. त्यामुळे या प्रकाशनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्याचबरोबर विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांची पुस्तके, अभ्यासक्रम, पुस्तिका तसेच विद्यापीठात होणाऱ्या शैक्षणिक परिषदांची सारांश पुस्तके(ॲबस्ट्रॅक्ट बुक), माहितीपत्रके इत्यादी महत्त्वपूर्ण शैक्षणिक दस्तावेजांची मांडणी व

छपाई दर्जेदारपणे मुद्रणालय सातत्याने करीत आहे.

मुद्रणालयाने आपल्या कामात 'गुणवत्ता, गोपनीयता आणि कार्यक्षमता' या तिन्ही तत्त्वांचा अवलंब सातत्याने केला आहे. आज शिक्षण आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रांमध्ये डिजिटल परिवर्तन झपाट्याने घडत आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठ मुद्रणालयानेही आपल्या कार्यपद्धतीत आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले आहे.

मुद्रणालयाच्या यशामागे त्यातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे सातत्यपूर्ण श्रम आणि समर्पण आहे. अनेकदा वेळेच्या मर्यादा आणि कामाच्या ताणातही त्यांनी निष्ठेने व शांतपणे आपले कार्य केले आहे. त्यांच्या या परिश्रमामुळेच विद्यापीठाचे कार्य निर्विघ्नपणे चालते. या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि कौतुक अपेक्षित आहे. आगामी काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालयाने पारंपरिक मुद्रण सेवा पुरवण्याबरोबरच नव्या तंत्रज्ञानावर आधारित दस्तऐवज व्यवस्थापन, प्रमाणपत्र पडताळणी आणि ई–आर्कायव्हिंग प्रणाली यामध्ये अग्रणी भूमिका बजावावी. यामुळे विद्यापीठाची कार्यप्रणाली अधिक वेगवान, सुरक्षित आणि आधुनिक बनेल.

या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मी विद्यापीठ मुद्रणालयाचे विद्यापीठासाठी दिलेल्या दीर्घकालीन योगदानाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करतो. विद्यापीठाच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर मुद्रणालयाचे कार्य हा विश्वासाचा पाया ठरला आहे. भविष्यात मुद्रणालयाने गुणवत्ता, नवोन्मेष आणि शाश्वतता' या त्रिसूत्रीवर आधारित कार्य करीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमधील मुद्रणालयांच्या धर्तीवर सर्वांगीण विकास व्हावा ही सदिच्छा आणि विद्यापीठाच्या ज्ञानदीपाला अधिक तेजस्वी बनवावे, हीच माझी मनःपूर्वक शुभेच्छा.

**प्रा. डॉ. पराग काळकर**
प्र–कुलगुरू,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



# मा. कुलसचिव यांचा संदेश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयास ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या या गौरवशाली प्रसंगी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने तसेच मुद्रणालय प्रकाशक आणि विद्यापीठ कुलसचिव या नात्याने मी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि सहकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते. विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच मुद्रणालय हे ज्ञानप्रसार, प्रशासनिक कार्य आणि दस्तऐवजीकरणाच्या दृष्टीने एक अत्यावश्यक विभाग आहे. विद्यापीठातील शैक्षणिक, परीक्षा, संशोधन आणि प्रशासनिक कामकाजाचा लेखाजोखा ठेवणे, दस्तऐवजांचे मुद्रण व प्रकाशन, विविध परिपत्रके, अहवाल, माहितीपत्रके, मासिके, वार्षिक अहवाल, स्मरणिका, नियम पुस्तिका, विविध विषयांचे अभ्यासक्रम, वार्षिक अर्थसंकल्पीय अहवाल आणि पदवीप्रदान व वर्धापनदिन वार्ता विशेषांकांबरोबरच विद्यापीठ दैनंदिनी इत्यादी महत्त्वपूर्ण दस्तावेजांची कलात्मक व दर्जेदार निर्मिती व छपाई यांसारख्या महत्त्वाच्या बाबींची पूर्तता मुद्रणालय सातत्याने करत आले आहे.

मुद्रणालय आपले दैनंदिन कामकाज अत्यंत जबाबदारीने आणि नियोजनपूर्वक पार पडते. मुद्रणासाठी येणाऱ्या विविध विभागांच्या मागण्या, त्यांचे नियोजन, मुद्रितशोधन, छपाई, बांधणी आणि वितरण या सर्व टप्प्यांमध्ये मुद्रणालयातील प्रत्येक सदस्य कार्यक्षमतेने योगदान देतो. यामुळे विद्यापीठातील प्रत्येक विभागाला वेळेत आणि गुणवत्तापूर्ण सेवा मिळते, ही मुद्रणालयाची मोठी जमेची बाजू आहे. विद्यापीठातील महत्त्वपूर्ण निर्णय, विविध सभांचे अहवाल, वार्षिक अहवाल, अभ्यासक्रमातील सुधारणा, तसेच विविध समित्यांच्या कार्यवृत्तांचे मुद्रण हे काम मुद्रणालयच काटेकोरपणे पार पाडते. त्यामुळे विद्यापीठाचा इतिहास, परंपरा आणि वैचारिक प्रवास सातत्याने जपला जात आहे.


मुद्रणालयाच्या जडणघडणीत अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय सुधारणा वेळोवेळी करण्यात आल्या. पारंपरिक ऑफसेट तंत्रज्ञानापासून डिजिटल मुद्रणापर्यंत मुद्रणालयात कालानुरूप खूप बदल झाले. हे बदल मुद्रणालयाची प्रगती, गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढविण्याचे द्योतक आहे. याचबरोबर प्रशासनातील नूतन धोरणे, पारदर्शक निविदा प्रक्रिया, वित्तीय शिस्त आणि कर्मचारी कल्याण यावरही मुद्रणालयाने संतुलित भर दिला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाचे कार्य हे विश्वसनीय, वेळेत आणि गुणवत्तापूर्ण सेवा

देणारा अमूल्य घटक आहे, असे मी गौरवाने नमूद करू इच्छिते. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी होणारे अभ्यासक्रम मार्गदर्शिकांचे प्रकाशन, परीक्षा व मूल्यांकन प्रक्रियेसाठी आवश्यक छपाई तसेच विद्यार्थ्यांशी संबंधित विविध माहितीपत्रके हे सर्व मुद्रणालयाच्या कार्यकौशल्यामुळे शक्य होते.

आजच्या युगात माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत असताना मुद्रणालयाने डिजिटल परिवर्तनाचा स्वीकार करणे अत्यावश्यक आहे. ई–प्रकाशन, ऑनलाईन वितरण, पर्यावरणपूरक मुद्रणसाधने आणि विदा सुरक्षा या क्षेत्रात नव्या दिशेने वाटचाल करण्याची हीच योग्य वेळ आहे. संशोधन ग्रंथ, विद्यार्थ्यांचे संशोधन प्रबंध तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांचे दस्तऐवज हे जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी मुद्रणालयाने नवी भूमिका निभवावी. विद्यापीठाच्या प्रशासनाच्या वतीने मी मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि सहकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते. त्यांनी सातत्य, निष्ठा आणि परिश्रमाने विद्यापीठाच्या प्रगतीला सतत दिशा दिली आहे.

या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठ मुद्रणालयाने आपल्या गुणवत्तेची परंपरा पुढे नेऊन, नवे तंत्रज्ञान स्वीकारून, आर्थिक आणि व्यवस्थापकीय दृष्टीने स्वावलंबी बनावे, हीच अपेक्षा. त्यांचे कार्य विद्यापीठाच्या प्रगतीचा अविभाज्य भाग राहो आणि ज्ञानप्रसाराच्या या प्रवासात त्यांनी आपले अमूल्य योगदान देत राहावे, ही मनःपूर्वक शुभेच्छा.

**प्रा. डॉ. ज्योती भाकरे**
प्रभारी कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



## मा. व्यवस्थापन परिषद सदस्य यांचा संदेश

विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच मुद्रणालय हे शिक्षण, संशोधन, प्रशासन आणि ज्ञानप्रसार यांचा आधारस्तंभ राहिले आहे. ७५ वर्षांचा प्रवास हा केवळ काळाचा प्रवास नसून विद्यापीठाच्या विचारसरणी, प्रगती आणि आत्मविश्वासाचा साक्षीदार आहे. विद्यापीठाच्या प्रत्येक टप्प्यावर, उपक्रमात आणि शैक्षणिक कृतीत मुद्रणालयाने आपला ठसा उमटवला आहे. विद्यापीठाच्या प्रारंभीच्या काळात मर्यादित साधनसामग्री असूनही मुद्रणालयाने आपल्या निष्ठेने आणि कार्यकौशल्याने विविध विभागांना, परीक्षा शाखांना, संशोधन केंद्रांना आणि प्रशासकीय घटकांना आवश्यक छपाईसह सर्वसमावेशक सेवा पुरवल्या. अभ्यासक्रम पुस्तिका, प्रशासकीय दस्तऐवज, वार्षिक अहवाल, नियतकालिके, संशोधनग्रंथ आणि सभांचे अहवाल यांच्या माध्यमातून विद्यापीठाचे विचार, संशोधन व कार्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात मुद्रणालयाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

काळानुसार तंत्रज्ञानात झालेले बदलही मुद्रणालयाने समर्थपणे आत्मसात केले. सुरुवातीच्या हस्तमुद्रण व टाईपसेटिंग युगातून ऑफसेट प्रिंटिंगपर्यंत आणि आजच्या डिजिटल प्रिंटिंगपर्यंतचा प्रवास हा मुद्रणालयाच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा व नवनवीन आव्हाने स्वीकारण्याच्या वृत्तीचा पुरावा आहे. प्रत्येक युगात मुद्रणालयाने वेळेची, गुणवत्तेची आणि अचूकतेची कास धरून विद्यापीठाच्या कार्यात अविभाज्य स्थान मिळवले आहे. विद्यापीठाच्या जडणघडणीत मुद्रणालयाचे योगदान तांत्रिक कामांबरोबर बौद्धिक आणि सांस्कृतिकही आहे. येथे मुद्रित केलेले अभ्यासक्रम आणि ग्रंथ हे विद्यार्थ्यांच्या पिढ्यांना घडविणारे ठरले आहेत. संशोधनग्रंथ आणि वार्षिक अहवालांनी विद्यापीठाची वैज्ञानिक व शैक्षणिक प्रतिमा निर्माण करण्यास मदत झाली आहे. अशा प्रकारे मुद्रणालय हे ज्ञानप्रसाराचे केंद्र आणि विद्यापीठाच्या वैचारिक प्रवाहाचे वाहक बनले आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मी मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि तांत्रिक सहकाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या कार्यनिष्ठेने, संघभावनेने आणि गुणवत्तेप्रती असलेल्या बांधिलकीनेच ही संस्था ७५ वर्षांचा लक्षणीय टप्पा गाठू शकली आहे. आगामी काळात विद्यापीठ मुद्रणालयाने आपल्या कार्याचा व्याप अधिक वाढवावा आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत अशी दिशा घ्यावी, ही काळाची गरज आहे.

'डिजिटल पब्लिशिंग हब' म्हणून स्वतःला विकसित करणे, ई–बुक्स आणि ऑनलाइन प्रकाशन क्षेत्रात पाऊल टाकणे, संशोधन व जर्नल प्रकाशनासाठी अत्याधुनिक सॉफ्टवेअरचा वापर करणे, तसेच पर्यावरणपूरक मुद्रण प्रक्रियेचा अवलंब करणे या गोष्टी मुद्रणालयाच्या पुढील प्रवासात अत्यंत महत्त्वाच्या ठरतील. यासोबतच विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना प्रकाशन तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षण देण्याची संधी उपलब्ध करून देणे, विद्यापीठाच्या विविध विभागांच्या प्रकाशनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविणे, तसेच मराठी व भारतीय भाषांतील शैक्षणिक ग्रंथप्रकाशन वाढविणे या दिशा पुढील वाटचालीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतील.

मुद्रणालय हे विद्यापीठाच्या 'ज्ञानप्रसार' या मूलभूत ध्येयाचे दृश्यमान रूप आहे. मुद्रण हे केवळ तांत्रिक कार्य नसून ते विचारांचे, संशोधनाचे आणि संस्कृतीचे प्रसारण आहे. म्हणूनच मुद्रणालयाने आपली परंपरा, गुणवत्ता आणि नावीन्य यांचा सुंदर संगम राखत पुढील दशकात विद्यापीठाच्या प्रगतीचा केंद्रबिंदू राहावे अशी आशा व्यक्त करतो.

या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा! आपले कार्य अधिक तेजस्वी होवो, नव्या तंत्रज्ञानासह ज्ञानप्रसाराच्या नवीन क्षितिजांना गवसणी घालो आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरो, हीच आमची मंगलकामना!

**श्री. रविंद्र शिंगणापूरकर**
व्यवस्थापन परिषद सदस्य,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



# मा. व्यवस्थापन परिषद सदस्य यांचा संदेश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयास ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या या ऐतिहासिक प्रसंगी मी विद्यापीठाचा माजी पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक, संलग्न महाविद्यालयाचा प्राचार्य आणि विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य म्हणून, मनःपूर्वक अभिनंदन करुन हार्दिक शुभेच्छा देतो. विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच मुद्रणालय हे ज्ञानप्रसाराचे, वैचारिक संवादाचे आणि शैक्षणिक शिस्तीचे मुख्य केंद्र राहिले आहे. १९५० साली सुरू झालेले हे मुद्रणालय आज विद्यापीठाच्या सर्व शाखांच्या आणि विभागांच्या कार्याचा अविभाज्य घटक बनले आहे. विद्यापीठाच्या वाढीचा आणि उत्क्रांतीचा मागोवा घेताना मुद्रणालयाचे योगदान हे महत्त्वाचे आहे.

शैक्षणिक क्षेत्रात मुद्रणालयाची भूमिका अत्यंत मोलाची आहे. अभ्यासक्रम पुस्तिका, प्रश्नपत्रिका, वार्षिक अहवाल, शोधनियतकालिके, शैक्षणिक परिपत्रके, स्मरणिका आणि विविध ग्रंथ यांद्वारे विद्यापीठाचा विचारप्रवाह समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य मुद्रणालयाने सातत्याने केले आहे. या माध्यमातून विद्यापीठाच्या शिक्षणाची गुणवत्ता, संशोधनाची परंपरा आणि प्रशासनाची पारदर्शकता प्रतिबिंबित झाली आहे. प्रत्येक विभागाच्या शैक्षणिक प्रगतीमागे, परीक्षांच्या यशस्वी आयोजनामागे आणि विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या उभारणीमागे मुद्रणालयाचा सूक्ष्म आणि स्थिर वाटा आहे. त्याचे कार्य हे नेहमीच महत्त्वाचे राहिले आहे.

मुद्रणालयाच्या सात दशकांच्या प्रवासात तांत्रिक आणि सामाजिक परिवर्तन घडले. सुरुवातीच्या काळात मर्यादित संसाधने, मॅन्युअल प्रेस आणि मर्यादित कर्मचारी असूनही मुद्रणालयाने दर्जेदार आणि वेळेवर सेवा देण्याची परंपरा सुरू केली. पुढील काळात ऑफसेट प्रिंटिंग, संगणक तंत्रज्ञान आणि अखेरीस डिजिटल मुद्रण या टप्प्यांतून ते यशस्वीरित्या पुढे गेले. हा प्रवास म्हणजे केवळ मुद्रण प्रक्रियेचा नव्हे, तर नवकल्पना आणि सातत्यपूर्ण सुधारणा यांचा आदर्श आहे. विद्यापीठाच्या जडणघडणीत मुद्रणालयाचे योगदान केवळ तांत्रिक नाही, तर वैचारिक आणि सांस्कृतिक आहे. येथे छापले गेलेले संशोधनग्रंथ, प्रबंध आणि नियतकालिके ही विद्यापीठाच्या ज्ञानसंपदेची साक्ष देतात. मुद्रणालय हे विचारांचे संवाहक आणि विद्यापीठाच्या आत्म्याचे प्रतिबिंब आहे. त्याच्या कार्यातून विद्यापीठाचे आदर्श, मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी या सर्वांचा प्रत्यय येतो.

संशोधक विद्यार्थी आणि मार्गदर्शक म्हणून माझ्या दृष्टीने मुद्रणालय हे शैक्षणिक प्रवासातील विश्वासार्ह राहिले आहे. संशोधनप्रबंधाच्या अंतिम मुद्रणापासून ते विद्यापीठीय प्रकाशनांमध्ये सहभागापर्यंत या विभागाने सदैव संशोधकांना मार्गदर्शन आणि सहाय्य केले आहे. मुद्रणालयाची अचूकता, गुणवत्ता आणि नियोजनबद्ध कार्यशैली हेच त्याच्या यशाचे मूळ कारण आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून मी सांगू शकतो की, मुद्रणालयाचे योगदान केवळ विद्यापीठापुरते मर्यादित नसून संलग्न महाविद्यालयांपर्यंत पोहोचले आहे. विविध परिपत्रके, सूचना, अभ्यासक्रमातील सुधारणा आणि परीक्षा प्रक्रियेतील आवश्यक दस्तऐवज यांद्वारे मुद्रणालयाने महाविद्यालयांना वेळेवर सहाय्य केले आहे. त्यामुळे विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधील संवाद अधिक प्रभावी झाला आहे. व्यवस्थापन परिषदेचा सदस्य या नात्याने मला जाणवते की, मुद्रणालय हे विद्यापीठाच्या प्रशासनातील पारदर्शकतेचा आणि कार्यक्षमततेचा मुख्य स्तंभ आहे. छपाईच्या प्रत्येक दस्तऐवजात विद्यापीठाची विश्वसनीयता आणि अचूकतेची परंपरा दिसते. यामुळे विद्यापीठाची संस्थात्मक प्रतिष्ठा अधिक दृढ झाली आहे.

आज मुद्रणालय आपल्या ७५ वर्षांच्या प्रवासानंतर नव्या युगाच्या उंबरठ्यावर उभे आहे. डिजिटलायझेशन, ई–प्रकाशन, ओपन ॲक्सेस रिसर्च जर्नल्स आणि ऑनलाईन डेटा व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांमध्ये ते सक्षमतेने पुढे जाऊ शकते. विद्यापीठातील संशोधक आणि विद्यार्थी वर्गाला प्रकाशन प्रक्रियेतील प्रशिक्षण देणे, संपादन कौशल्ये वाढविणे व शैक्षणिक संप्रेषणाची नवी साधने विकसित करणे या दिशेने मुद्रणालयाने पुढाकार घ्यावा. हे केवळ विद्यापीठापुरते मर्यादित न राहता इतर शैक्षणिक संस्थांसाठी आदर्श ठरावे.

आगामी काळात विद्यापीठ मुद्रणालयाने 'ज्ञानाचे उत्पादन केंद्र' म्हणून विकसित व्हावे, जिथे विचार, संशोधन आणि तंत्रज्ञानाचा संगम घडेल. ज्ञानाच्या या प्रवाहात मुद्रणालयाने आपली ओळख अधिक दृढ करावी, हीच आमची अपेक्षा आहे. या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मी विद्यापीठ मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक सहाय्यक आणि प्रशासनिक सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांचे परिश्रम, समर्पण आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता हेच या गौरवशाली परंपरेचे अधिष्ठान आहे.

७५ वर्षांचा हा प्रवास हा केवळ इतिहास नव्हे, तर प्रेरणादायी वारसा आहे. त्या वारशाचा पुढील काळात सन्मान राखत, आधुनिकतेची दिशा स्वीकारून आणि गुणवत्तेचा शिखर गाठून विद्यापीठ मुद्रणालयाने पुढील पिढ्यांसाठी आदर्श निर्माण करावा हीच मनःपूर्वक शुभेच्छा!

**प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे**
व्यवस्थापन परिषद सदस्य,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



# मा. वित्त व लेखा अधिकारी
## यांचा संदेश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयास ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या या अमृतमहोत्सवी काळात विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाच्या वतीने मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी, तंत्रज्ञ आणि सहकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच मुद्रणालय हे संस्थेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि आर्थिक कार्यप्रणालीचा अविभाज्य घटक राहिले आहे. विद्यापीठातील विविध विभाग, परीक्षा मंडळ, अभ्यास मंडळ, संशोधन विभाग, तसेच विविध शैक्षणिक प्रकाशनांच्या मागण्या वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करीत मुद्रणालयाने सतत कार्यक्षमता आणि विश्वासार्हतेचे उत्तम उदाहरण निर्माण केले आहे. मुद्रणालयाचे कार्य छपाईखेरीज विद्यापीठाच्या ज्ञानप्रसार, दस्तऐवजीकरण आणि प्रशासनिक पारदर्शकतेचे उत्तम प्रारूप आहे. वार्षिक अहवाल, परीक्षा प्रश्नपत्रिका, परिपत्रके, संशोधनग्रंथ, माहितीपत्रके, मासिके, स्मरणिका, विद्यापीठातील प्रशासकीय, परीक्षा, वित्त व शैक्षणिक विभागांची विविध महत्त्वपूर्ण छपाई आदी सर्व प्रकारचे दस्तऐवज मुद्रणालयाद्वारे तयार होतात. या सर्व कामांमध्ये काटेकोर वित्तीय नियोजन, साहित्य खरेदी, संसाधन व्यवस्थापन आणि उत्पादन खर्चाचे नियंत्रित नियोजन हे मुद्रणालयाच्या कार्यक्षेत्राशी घट्टपणे निगडीत आहे.

विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाच्या दृष्टीने मुद्रणालयाचे कार्य हे स्वावलंबन, कार्यक्षमता आणि वित्तीय शिस्त या तीन प्रमुख मूल्यांवर आधारित आहे. संसाधनांचा विवेकपूर्ण वापर, खर्चाचे योग्य नियोजन आणि मुद्रणाच्या प्रत्येक प्रक्रियेत गुणवत्ता व जबाबदारी टिकवून ठेवण्याची परंपरा यामुळे मुद्रणालयाने विद्यापीठाच्या आर्थिक व्यवस्थापनाला बळकटी दिली आहे. गेल्या सात दशकांतील मुद्रणालयाची प्रगती ही काळानुरूप झालेल्या तांत्रिक आणि व्यवस्थापकीय बदलांची साक्ष आहे. पारंपरिक ऑफसेट पद्धतीपासून आजच्या डिजिटल प्रिंटिंगच्या युगापर्यंतचा प्रवास हा अत्यंत प्रेरणादायी आहे. या प्रवासात मुद्रणालयाने आपले कामकाज तर वाढविलेच, त्याचबरोबर विद्यापीठातील प्रत्येक घटकास वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचे बंधनकारक ध्येय देखील जपले आहे.

आजच्या बदलत्या शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थितीत मुद्रणालयापुढे अनेक नवीन संधी उभ्या आहेत. डिजिटलायझेशन, ई–प्रकाशन, प्रिंटिंग ऑन–डिमांड, पर्यावरणपूरक शाई व कागदाचा वापर, तसेच विदा सुरक्षा व गोपनीयता या क्षेत्रात नव्या मानदंडांची गरज निर्माण झाली आहे. वित्तीय नियोजनाच्या दृष्टीने, खर्चाची कार्यक्षमता राखून उच्च गुणवत्तेचे उत्पादन देणे ही काळाची गरज आहे. याकरिता मुद्रणालयाने स्वावलंबी उत्पन्न केंद्र म्हणून विकसित व्हावे, तसेच बाह्य प्रकाशन प्रकल्प स्वीकारून आर्थिक स्थैर्य वाढवावे, अशी अपेक्षा आहे. विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाच्या दृष्टीने मुद्रणालय हे सुसंवाद आणि सहयोगाचे केंद्र आहे. मुद्रणालयाच्या कार्यक्षमतेसाठी वेळेवर निधी वितरण, खर्चाचे लेखापरीक्षण व वित्तीय पारदर्शकता या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आगामी काळात हे समन्वय अधिक बळकट करून, डिजिटल अर्थव्यवस्थेच्या नव्या साधनांचा उपयोग करून मुद्रणालयाला आत्मनिर्भर आणि आधुनिक बनविण्यास वित्त व लेखा विभाग कटिबद्ध आहे. मुद्रणालयाने ७५ वर्षांच्या कार्यकाळात निर्माण केलेली प्रतिष्ठा, विश्वास आणि गुणवत्तेची परंपरा ही विद्यापीठासाठी अभिमानास्पद आहे. या गौरवशाली वाटचालीच्या पुढील टप्प्यात मुद्रणालयाने 'गुणवत्ता, वेळेची मर्यादा आणि खर्च नियंत्रण' या तिन्ही अंगांचा समतोल राखून कार्य करावे, हीच अपेक्षा आहे.

या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मुद्रणालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना मी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देते.

ते आपल्या कार्यकुशलतेने विद्यापीठाच्या प्रगतीच्या प्रवासात नवे अध्याय रचतील, नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करतील आणि विद्यापीठाच्या वित्तीय शिस्त व कार्यगौरवाचे प्रतीक म्हणून अधिक तेजस्वी ठरतील, असा मला विश्वास आहे.

**सीएमए चारुशीला गायके**
वित्त व लेखा अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



# मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचा संदेश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयास ७५ वर्षे पूर्ण होत असल्याचा हा ऐतिहासिक आणि अभिमानास्पद क्षण आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच मुद्रणालय हे एक अत्यावश्यक विभाग म्हणून कार्यरत असून त्याने विद्यापीठाच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि परीक्षाविषयक कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. या सुवर्णपरंपरेला आता अमृतमहोत्सवी वर्ष प्राप्त होत असताना परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने मी मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांच्या पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो.

विद्यापीठाच्या दैनंदिन कार्यव्यवस्थेत मुद्रणालयाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः परीक्षा विभागाच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या विविध स्टेशनरी साहित्याच्या निर्मितीमध्ये मुद्रणालयाची भूमिका अनन्यसाधारण आहे. प्रत्येक सत्रात होणाऱ्या विविध परीक्षांसाठी लागणारी उत्तरपत्रिका, जुनिअर सुपरवायझर रिपोर्ट, प्रॅक्टिकल शीट्स इत्यादी सर्व स्टेशनरी विद्यापीठाच्या मुद्रणालयामार्फत काटेकोर नियोजनानुसार आणि वेळेत तयार केल्या जातात. या सर्व प्रक्रियेत गोपनीयता, गुणवत्तेचे पालन आणि वेळेचे व्यवस्थापन या तिन्ही बाबींचा उत्कृष्ट समन्वय साधणे अत्यंत आवश्यक असते; आणि मुद्रणालयाने हे कार्य सातत्याने आणि निष्ठेने पार पाडले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके आणि परीक्षा लेजर्स असे अत्यंत महत्त्वाचे दस्तऐवज यांची छपाईदेखील मुद्रण कक्षामार्फत केली आहेत. ही सर्व कामे तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाची तर आहेतच, त्याचबरोबर त्यांना उच्च दर्जाची गोपनीयता आणि अचूकता आवश्यक असते. कारण हे दस्तऐवज प्रत्येक विद्यार्थ्याच्या करिअर आणि प्रतिष्ठेशी थेट संबंधित असतात. मुद्रणालयाने या बाबतीत सातत्याने उत्तम दर्जा राखला असून, वेळोवेळी नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून प्रमाणपत्रांची सुरक्षा आणि विश्वासार्हता सुनिश्चित केली आहे.

मुद्रणालयाचे हे सातत्यपूर्ण योगदान परीक्षा विभागाच्या कार्यक्षमतेचा एक आधारस्तंभ ठरले आहे. परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यावर उदा. उत्तरपत्रिकांची उपलब्धता, मूल्यांकन प्रक्रियेतील दस्तऐवजीकरण आणि निकालाच्या घोषणेपर्यंत मुद्रणालयाचे सहकार्य अनिवार्य असते. परीक्षा विषयक साहित्याची आवश्यकता किंवा आकस्मिक

बदल असो, मुद्रणालय नेहमीच तत्परतेने प्रतिसाद देत आले आहे. ही तत्परता आणि निष्ठा हेच त्यांचे मोठे वैशिष्ट्य आहे. गेल्या ७५ वर्षांच्या प्रवासात मुद्रणालयाने पारंपरिक पद्धतीपासून ते अत्याधुनिक तंत्रज्ञानापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास केला आहे. ऑफसेट प्रिंटिंगपासून डिजिटल प्रिंटिंगपर्यंतचा हा प्रवास केवळ तांत्रिक नव्हे, तर व्यवस्थापनात्मक परिवर्तनाचाही द्योतक आहे. मुद्रणालयाने वेळोवेळी कार्यक्षमतेत सुधारणा केली, उत्पादनक्षमतेत वाढ घडवून आणली आणि गुणवत्तेचे मानक सतत उंचावले.

आजच्या काळात शिक्षण आणि परीक्षा या दोन्ही क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर डिजिटल रूपांतरण होत आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठ मुद्रणालयाने देखील या डिजिटल युगाशी सुसंगत असा विकास करणे आवश्यक आहे. मुद्रणालयाच्या कार्यक्षमतेत सातत्याने वाढ घडवून आणण्यासाठी कर्मचारी वर्गाचे कौशल्यवर्धन आणि तांत्रिक प्रशिक्षण यालाही प्राधान्य दिले पाहिजे. प्रिंटिंग टेक्नॉलॉजी, डिझाईन मॅनेजमेंट, सिक्युरिटी फिचर्स इन सर्टिफिकेट्स, डिजिटल डॉक्युमेंटेशन या विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळा राबवल्यास मुद्रणालय अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक होऊ शकते.

भविष्यात विद्यापीठ मुद्रणालय हे केवळ एक उत्पादन केंद्र न राहता ‘डिजिटल परीक्षा आणि दस्तऐवज व्यवस्थापन केंद्र’ म्हणून विकसित व्हावे, जिथे पारंपरिक मुद्रणाबरोबरच डेटा हँडलिंग, इलेक्ट्रॉनिक प्रमाणपत्रे आणि स्मार्ट डॉक्युमेंट ट्रॅकिंग यांसारख्या सेवा दिल्या जातील, ही काळाची गरज आहे. मुद्रणालय हे विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय पायाभूत रचनेचा अविभाज्य भाग आहे. विद्यापीठाचे कार्य सुरळीत, वेळेत आणि विश्वासार्ह पद्धतीने पार पाडले जावे यासाठी मुद्रणालयाचे योगदान अमूल्य आहे. या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मी विद्यापीठ मुद्रणालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि तांत्रिक सहकाऱ्यांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन करतो.

भविष्यात मुद्रणालयाने आपल्या गौरवशाली परंपरेला आधुनिक दृष्टिकोनासह पुढे नेऊन ‘गुणवत्ता, गती आणि गोपनीयता’ या त्रिसूत्री तत्त्वांवर अधिक दृढतेने कार्य करावे आणि विद्यापीठाच्या प्रगतीच्या प्रवासात एक भक्कम आधारस्तंभ राहावा, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.

**प्रा. डॉ. प्रभाकर देसाई**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | विद्यापीठ मुद्रणालय – ७५ वर्षांचा गौरवशाली वारसा : दिशा आणि वाटचाल<br>– डॉ. दत्तात्रय कुटे | १ |
| २. | विद्यापीठ मुद्रणालयाचे अमूल्य योगदान<br>– डॉ. गजानन एकबोटे | ५ |
| ३. | राजमुद्रणालयाकडून ज्ञानमुद्रणालयाकडे...<br>– डॉ. संजय तांबट | ७ |
| ४. | संस्कृत आणि विद्यापीठ मुद्रणालय : हृद्य ऋणानुबंध<br>– डॉ. मुग्धा गाडगीळ | १० |
| ५. | विद्यापीठ मुद्रणालय आणि मराठी विभाग : ७५ वर्षांचा सहकार्याचा प्रवास<br>– डॉ. तुकाराम रोंगटे | १५ |
| ६. | विद्यापीठ प्रकाशनालये : ज्ञानप्रसारातील विश्वासार्हता आणि नवचिंतनाची दिशा<br>– डॉ. शुभदा नगरकर | १९ |
| ७. | विद्यापीठ मुद्रणालय आणि विद्यापीठ ग्रंथालय यांच्यातील सहकार्याचे महत्व<br>– प्रा. डॉ. संजय देसले | २४ |
| ८. | छापखाना आणि कृत्रिम बुद्धिमत्ता : दोन विचारक्रांतींचा समांतर प्रवास<br>– प्रा. नितीन पाटील | २९ |
| ९. | विद्यापीठ मुद्रणालय एक सेवा विभाग म्हणून महत्त्वाची भूमिका<br>– डॉ. मुंजाजी रासवे | ३२ |
| १०. | ‖ शिक्षण  क्षेत्राच्या नव्या वाटा ‖<br>– डॉ. मधुरा महाजन | ३३ |
| ११. | ऋणानुबंध मुद्रणालयाचे व आरोग्य केंद्राचे<br>– डॉ. शशिकांत दुधगावकर | ३५ |
| १२. | विद्यापीठ मुद्रणालयाचा ७५ वर्षांचा गौरवशाली प्रवास<br>– श्री. संतोष धुरी | ३७ |

| अ. क्र. | लेखाचे शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३. | **मध्ययुगीन ते आधुनिक काळातील मुद्रण उत्क्रांती**<br>– डॉ. अशोक कुडले | ४१ |
| १४. | **विद्यापीठ मुद्रणालयाची अमृत महोत्सवी वर्षामध्ये डिजीटल क्रांती**<br>– श्री. राहुल पाखरे | ४७ |
| १५. | **विद्यापीठ मुद्रणालयाच्या हृद्य आठवणी**<br>– श्री. सुहास पानसे | ४९ |
| १६. | **राजमुद्रणालय ते विद्यापीठ मुद्रणालय**<br>– प्रा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर | ५१ |
| १७. | **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय सल्लागार समितीच्या माध्यमातून विद्यापीठ मुद्रणालयाच्या क्षेत्रात योगदान** | ५३ |
| १८. | **विद्यापीठ मुद्रणालयात छपाई झालेली दुर्मिळ पुस्तके** | ५६ |
| १९. | **विद्यापीठ मुद्रणालयात छपाई झालेली निवडक पुस्तके** | ५८ |
| २०. | **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय, अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सन्मानित करण्यात येणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावे** | ६३ |
| २१. | **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय, अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सन्मानित करण्यात येणाऱ्या माजी अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावे** | ६४ |



डॉ. दत्तात्रय कुटे
व्यवस्थापक, विद्यापीठ मुद्रणालय

# विद्यापीठ मुद्रणालय - ७५ वर्षांचा गौरवशाली वारसा : दिशा आणि वाटचाल

पुणे हे शहर शैक्षणिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून देशाच्या अग्रगण्य शहरांपैकी एक मानले जाते. 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) हे शहराच्या या वैभवाचे एक प्रमुख प्रतीक आहे. या विद्यापीठाच्या प्रगतीत अनेक घटकांनी आपापला महत्त्वपूर्ण वाटा उचलला आहे. त्यापैकीच एक महत्त्वाचा आणि सातत्यपूर्ण योगदान देणारा घटक म्हणजे 'विद्यापीठ मुद्रणालय'.

भारतातील शास्त्रीय आणि साहित्यिक ज्ञानाच्या विस्तारामध्ये छपाई व प्रकाशन क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे. या क्षेत्रात सातत्यपूर्ण गुणवत्ता, विश्वासार्हता आणि विद्वत्तेचा आविष्कार करणाऱ्या विद्यापीठ मुद्रणालय या विभागाने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यापीठ मुद्रणालयाची स्थापना ६ जानेवारी १९५० रोजी झाली. हा प्रेस फलटणच्या मालोजीराजे नाईक-निंबाळकर यांचा राजमुद्रणालय प्रेस म्हणून ओळखला जात असे, तो महाराष्ट्र सरकारकडून पुणे विद्यापीठास मिळाला, त्यावेळी त्याच मुद्रणालयातील १४ सेवक व रु. २५,००० किमतीची मशिनरी व टाईपसह प्रेस सुरु झाला. आज, या मुद्रणालयाच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचा गौरव करताना मुद्रणालयाच्या योगदानाचा आढावा घेऊन या क्षेत्राच्या भविष्याचा वेध घेणे अधिक उचित होईल.

शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या दर्जेदार पाठ्यपुस्तकांची निर्मिती हे मुद्रणालयाचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्या काळात दर्जेदार शैक्षणिक साहित्याच्या कमतरतेमुळे विद्यापीठ पातळीवर दर्जेदार पुस्तकांची मागणी होत होती. विद्यापीठ मुद्रणालयाने ही गरज ओळखून महाविद्यालये आणि विद्यापीठांसाठी योग्य आणि विश्वासार्ह प्रकाशन करण्यास प्रारंभ केला. यामध्ये इंग्रजीसह मराठी, हिंदी, संस्कृत, पाली अशा अनेक भाषांमध्ये अभ्यासक्रमाशी संबंधित आणि संशोधनाधिष्ठित ग्रंथ प्रकाशित केले. त्यामुळे अनेक अभ्यासक, शिक्षक व विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न साहित्य उपलब्ध झाले. त्याचबरोबरीने विद्यापीठाच्या सर्व सभांची इतिवृत्ते, कार्यलयीन स्टेशनरी, परीक्षांविषयक स्टेशनरी इत्यादी छपाई केली जात आहे.

**विद्यापीठ मुद्रणालयाचे प्रमुख योगदान–**

१. **शैक्षणिक प्रकाशनातील अग्रगण्य स्थान :** विद्यापीठ मुद्रणालयाने विविध विद्याशाखांच्या अभ्यासक्रमांनुसार पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी सुसंगत, अभ्यासपूर्वक आणि स्पष्ट मांडणी असलेले साहित्य मिळत आहे.

२. **बहुभाषिक प्रकाशन :** इंग्रजीबरोबरच मराठी, हिंदी, संस्कृत आणि इतर भाषांमधून पुस्तके प्रसिद्ध केली. त्यामुळे विविध भाषक विद्यार्थी आणि संशोधकांना समृद्ध सामग्री प्राप्त होत आहे.

३. **गुणवत्तेवर भर :** छपाईतील काटेकोरपणा, मुद्रणाचा उच्च दर्जा आणि संपादनातील बारकावे यामुळे विद्यापीठ मुद्रणालयाची पुस्तके अभ्यासकांत विशेष मानाची मानली जातात.

४. **साहित्य आणि संशोधनासाठी पाठबळ :** शैक्षणिक विभाग व महाविद्यालयीन पुस्तकांच्यापुरते मर्यादित न राहता विद्यापीठ मुद्रणालय संशोधन, शैक्षणिक निबंध आणि वाङ्मयीन साहित्यदेखील मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध करत आहे.

५. **परीक्षांविषयक स्टेशनरी :** विद्यापीठ परीक्षा ही एक अत्यंत गोपनीय, नियोजित आणि वेळेवर पार पाडली जाणारी प्रक्रिया आहे. परीक्षेच्या तयारीसाठी लागणारे अनेक मुद्रित साहित्य, जसे की प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, निर्देशपुस्तिका, प्रवेशपत्रे, गुणपत्रके व अहवाल इत्यादींची छपाई ही विद्यापीठ मुद्रणालयाकडून केली जाते. हे संपूर्ण कार्य अतिशय गोपनीयतेने व काटेकोरपणे पार पाडले जाते.

परीक्षेच्या सर्व कामांसाठी सुरक्षा यंत्रणा व विशिष्ट पद्धत वापरली जात असल्याने विद्यापीठ मुद्रणालयाद्वारे गोपनीयता व विश्वसनीयता राखली जाते व परीक्षांविषयक स्टेशनरी सहज उपलब्ध करण्यास मदत होत आहे.

विद्यापीठ मुद्रणालय ही परीक्षेच्या यशस्वी आयोजनाच्या पाठीमागची महत्त्वाची यंत्रणा आहे. परीक्षा विभाग आणि मुद्रणालयामधील समन्वय जितका उत्तम, तितका विद्यार्थ्यांना चांगला अनुभव व गुणवत्ता मिळते.

६. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रम व परीक्षेची तयारी ही दोन महत्त्वाची क्षेत्रे आहेत. विद्यापीठ अभ्यासक्रम व जुन्या प्रश्नपत्रिका ही माहिती वेळेवर, स्पष्ट आणि प्रमाणित स्वरूपात विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे शक्य होत आहे.

**अभ्यासक्रम पुस्तिकांचे मुद्रण** – पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे अभ्यासक्रम प्रत्येक सत्रानुसार व्यवस्थित छापले जातात. विविध भाषांमध्ये (मराठी/हिंदी/इंग्रजी) अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातात.

**डिजिटल स्वरूपात उपलब्धता (ई–प्रती)–** मुद्रणालयाच्या माध्यमातून पीडीएफ स्वरूपातील अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिका विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध करण्यास मदत केली जाते.

विद्यापीठ मुद्रणालय हे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. अभ्यासक्रम मुद्रण व जुन्या प्रश्नपत्रिकांचे प्रभावी वितरण केल्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार व अधिकृत शैक्षणिक सामग्री मिळते. मुद्रणालय, परीक्षा विभाग आणि अकॅडमिक विभाग यांचा समन्वय विद्यार्थीहितासाठी अत्यावश्यक आहे.

२१व्या शतकात डिजिटल क्रांतीने संपूर्ण मुद्रण व प्रकाशन क्षेत्रामध्ये मोठे परिवर्तन घडवून आणले. ई–बुक्स, पीडीएफ, ऑडिओ बुक्स, ऑनलाईन पोर्टल्स यांच्या आगमनाने पारंपरिक छपाईच्या स्वरूपात

बदल झाला. विद्यापीठ मुद्रणालयानेही हे बदल ओळखून आपल्या कामकाजात या तंत्रज्ञानाचा समावेश केला असून त्यामध्ये पुढील बाबींचा उल्लेख करावा लागेल.

- डिजिटल पब्लिशिंगचा स्वीकार.
- प्रिंट ऑन डिमांड (पीओडी) प्रणालीचा वापर
- ऑनलाईन पुस्तक विक्री
- डिजिटल संपादन साधने आणि आधुनिक छपाई तंत्राचा वापर
- सद्यस्थितीत विद्यापीठ मुद्रणालयाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचे मुद्दे
- गोपनीयता आणि सुरक्षितता
- तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे आणि सक्षमीकरण.
- विद्यार्थ्यांप्रती सेवाभाव.
- उत्कृष्ट नियोजन आणि व्यवस्थापन.
- कमी संसाधनांतून मोठे काम.

सद्यस्थितीत विद्यापीठ मुद्रणालयामध्ये तांत्रिक अडचणी आणि अपुरा सेवक वर्ग या अडचणी जरी असल्या तरी विद्यापीठ मुद्रणालयातील अधिकारी व कर्मचारी त्यांच्या अनुभवानुसार यंत्रसामग्री, कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन, निर्णयप्रक्रिया, निधीची उपलब्धता आणि नवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार यानुसार विद्यापीठास आवश्यक छपाई व बांधणीच्या सेवा वेळेत व दर्जेदार पद्धतीने पुरवित आहेत.

विद्यापीठ मुद्रणालयाने नाविन्यपूर्ण योजना आखून विद्यापीठाच्या अनेक कामांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला त्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१) **विद्यापीठाच्या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी मुद्रणालयाचा महत्त्वाचा सहभाग :** विद्यापीठातील अनेक यशस्वी कार्यक्रम, परीक्षा किंवा प्रवेशप्रक्रिया यामागे एक शांत आणि सतत कार्यरत विभाग म्हणून विद्यापीठ मुद्रणालयाने ओळख निर्माण केली आहे.

२) **तंत्रज्ञानासोबतची वाटचाल :** पूर्वी हॅण्ड कंपोझिंग असायचे, मग डीटीपी आले, नंतर डिजिटल प्रिंटिंग आले आहे. यामध्ये सर्व कर्मचारी वर्गाने त्यामध्ये प्राविण्य मिळवले, त्यातील बदल स्वीकारले आणि त्यातूनच मुद्रणालय आज सशक्त होत आहे.

३) **विद्यार्थ्यांसाठी काम करण्याचे समाधान :** विद्यार्थ्यांना वेळेवर अभ्यासक्रम, परीक्षाविषयक स्टेशनरी आणि ओळखपत्र मिळावे म्हणून अधिकारी व सर्व कर्मचारी विशेष लक्ष देत आहेत.

४) **कमीत कमी बजेटमध्ये अधिक काम :** विद्यापीठ मुद्रणालयाच्या उपलब्ध बजेटनुसार नावीन्यपूर्ण गोष्टी करून छपाईचा खर्च कमी केला. मुद्रण व बांधणी खर्चात कपात करून उत्तम दर्जा राखण्याचा प्रयत्न करीत आहे.

५) **'कमवा व शिका' योजनेतून घडलेला बदल :** विद्यापीठाच्या 'कमवा व शिका योजनेतून विद्यार्थ्यांना मुद्रणालयामध्ये काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगशिक्षण मिळत असून त्यांना तांत्रिक कौशल्यही मिळत आहे.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विकासातील परिणामकारकता**

- शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यात हातभार – अभ्यासक्रम पूरक दर्जेदार साहित्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक प्रभावी होत आहे.
- प्राध्यापकांचे विचार तसेच संशोधन अहवाल प्रकाशित करून ज्ञानसंपदा वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न विद्यापीठ मुद्रणालय करीत आहे.
- विद्यापीठाची शैक्षणिक ओळख वाढवण्यात मदत – अनेक शैक्षणिक व संशोधन ग्रंथ राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी करण्यात येत आहे.
- विद्यापीठातील माहितीचे दस्तऐवजीकरण करून पारदर्शकता व शिस्तबद्धता वाढवण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**विद्यापीठ मुद्रणालयाची छपाई आणि प्रकाशन क्षेत्रामधील दिशा आणि वाटचाल**

१. **कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भाषा प्रक्रिया :** कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून स्वयंचलित संपादन, भाषांतर आणि वाचनयोग्यता सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

२. **इंटरअक्टिव्ह ई–बुक्स :** विद्यार्थ्यांसाठी मल्टिमीडियाच्या सहाय्याने समजण्यास सोपे आणि आकर्षक साहित्य तयार करण्यात येत आहे.


३. **स्थानिक भाषांमध्ये साहित्य विस्तार :** ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये शिक्षण पोहोचवण्यासाठी स्थानिक भाषांचे साहित्य विकसित करण्यात येत आहे

४. **ग्रीन प्रिंटिंग :** पर्यावरणस्नेही कागद आणि शाई वापरास प्राधान्य देणारी छपाई करण्यात येत आहे.

५. **जगभरात मराठीचा प्रसार :** आंतरराष्ट्रीय प्रकाशन भागीदारीद्वारे मराठी साहित्य जगभर पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहे.

६. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत बहुविध व बहुपर्यायी अभ्यासक्रम राबवले जात आहेत. त्यामुळे नवीन पाठ्यपुस्तके, संदर्भसाहित्य व अभ्याससामग्री तयार करण्यात येत आहे.

'पुणे विद्यापीठ मुद्रणालय'ही एक प्रकाशनसंस्था तर आहेच, त्यासोबतच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बौद्धिक आणि शैक्षणिक विकासाचा एक अविभाज्य घटक आहे. सातत्यपूर्ण गुणवत्ता, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर आणि ज्ञानदृष्टीच्या प्रसाराची तळमळ या मूल्यांमुळे मुद्रणालयाचे योगदान आजही महत्त्वाचे ठरते. गेल्या ७५ वर्षांच्या कालखंडात विद्यापीठ मुद्रणालयात अनेक चांगल्या व दर्जेदार पुस्तकांची निर्मिती करण्यात आली त्यातील काही पुस्तके आजही विद्यापीठ मुद्रणालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. भविष्यातही विद्यापीठ मुद्रणालय विद्यापीठाच्या ज्ञानविस्ताराच्या प्रवासात दीपस्तंभ ठरेल, यात शंका नाही. विद्यापीठ मुद्रणालयाचा अमृत महोत्सव साजरा होत असून यापुढेही मुद्रणालयाची आधुनिकतेकडे सर्वांगाने वाटचाल व्हावी, ही मनोमन इच्छा आहे.



**डॉ. गजानन एकबोटे**
अध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे
माजी व्यवस्थापन परिषद सदस्य व अधिष्ठाता, वैद्यकशास्त्र

## विद्यापीठ मुद्रणालयाचे अमूल्य योगदान

सन २००२ ते २००६ या कालावधीत मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत सदस्य म्हणून तसेच वैद्यक विद्याशाखेचा अधिष्ठाता या नात्याने कार्यरत होतो. या काळात प्रा. डॉ. अशोक कोळस्कर हे कुलगुरू म्हणून विद्यापीठाचे नेतृत्व करत होते. शिक्षण, संशोधन व प्रशासन या तीनही घटकांचा संगम साधणाऱ्या या व्यापक संस्थेत त्या काळात अनेक धोरणात्मक निर्णय घेतले जात होते. विद्यापीठाचा व्यापक विकास, पारदर्शक प्रशासन व कार्यक्षम शैक्षणिक व्यवस्था यांना केंद्रस्थानी ठेवून विद्यापीठाची वाटचाल सुरू होती.

याच कालावधीत व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठ मुद्रणालयाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. मुद्रणालयाची विद्यमान स्थिती, त्याचा आर्थिक अहवाल, आवश्यक संसाधने, कर्मचारी रचना आणि भविष्यातील संभाव्यता यांचा सर्वंकष विचार करण्याचे ठरले. मुद्रणालयाने प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, विविध पुस्तके, अभ्यासक्रम साहित्य, संशोधन प्रकाशने इत्यादी मुद्रित करून विद्यापीठाची शैक्षणिक परंपरा दीर्घकाळ समृद्ध केली होती. अशा संस्थेचे महत्त्व जपण्यासाठी सुयोग्य, व्यावहारिक आणि दूरदर्शी धोरणांची आवश्यकता भासू लागली. प्रशासनिक सुधारणा करत असताना काही अपरिहार्य निर्णय घ्यावे लागले. या पार्श्वभूमीवर मुद्रणालयातील कर्मचारी आमच्याकडे भेटीस आले. त्यांनी त्यांच्या समस्या, अपेक्षा व चिंता मांडल्या. कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनीही निवेदने सादर केली. आम्ही या सर्व मुद्यांचा गांभीर्याने विचार करून मा. कुलगुरूंशी सखोल चर्चा केली. मुद्रणालय हे केवळ एक सेवा विभाग नसून विद्यापीठाच्या शैक्षणिक ओळखीचा आणि गौरवाचा अविभाज्य घटक आहे, ही भावना अधिक दृढ झाली.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ (प्रकरण ९, कलम ७५(४)) नुसार विद्यापीठ मुद्रणालय शैक्षणिक सेवा समितीवर सदस्य म्हणून मा. कुलगुरूंनी माझी निवड केली. माझ्याबरोबर विविध विद्याशाखांचे प्रमुखही या समितीवर कार्यरत होते. मा. रत्नाकर गायकवाड (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने विद्यापीठ मुद्रणालय हे अत्यंत आवश्यक असून ते कायमस्वरूपी अस्तित्वात राहावे आणि कोणत्याही परिस्थितीत विद्यापीठ मुद्रणालय बंद करू नये असा एकमताने निर्णय केला. त्याचबरोबर मुद्रणालयाच्या

Staffing Pattern आणि Techno-Economical Feasibility Report यांचा अभ्यास करून मुद्रणालयाला आधुनिक, सक्षम व परिणामकारक रूप देण्याचे ठरले. कर्मचारी व्यवस्थापनाचा पुनर्विचार करून बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना मूळ पदांवर नियुक्त करणे, मुद्रणालय परिसराचा विकास आणि पुनर्रचना करणे तसेच विद्यापीठातील सर्व छपाईची कामे विद्यापीठ प्रेसमध्येच करणे अशा महत्त्वपूर्ण बाबींचे निर्णय करण्यात आले.

त्यानंतर मा. कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मुद्रणालयासाठी आधुनिक यंत्रसामग्रीची खरेदी व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. त्यामध्ये विद्यापीठ मुद्रणालयाचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय कुटे यांची नेमणूक करण्यात आल्यानंतर विद्यापीठ मुद्रणालयाच्या व्यवस्थापनामध्ये आमूलाग्र बदल झाला आणि त्यामुळे मुद्रणालयाच्या कार्यक्षमता, वेग आणि उत्पादनक्षमतेत लक्षणीय वाढ झाली. मा. कुलगुरू डॉ. संजय चहांदे आणि डॉ. रघुनाथ शेवगांवकर यांच्या कार्यकाळात विद्यापीठाने स्वयंपूर्णतेकडे महत्वाचे पाऊल टाकले. मध्यंतरीच्या काळा विद्यापीठाने धोरणात्मक निर्णय घेऊन परीक्षा विभागाची पदवी प्रमाणपत्रे व गुणपत्रकेही विद्यापीठ परिसरातच छापण्यास सुरुवात केली. मुद्रणालयाने गुणवत्ता, वेग, तांत्रिक प्रगती आणि शैक्षणिक गरजा यांचा उत्कृष्ट संगम साधत कार्याचा विस्तार केला.

या संपूर्ण प्रवासात व्यवस्थापन परिषदेचा सदस्य आणि वैद्यक विद्याशाखेचा अधिष्ठाता म्हणून विद्यापीठ मुद्रणालयाच्या विकासात थोडा का होईना, हातभार लावता आला, ही बाब माझ्यासाठी अत्यंत समाधानकारक आहे. विद्यापीठाच्या इतिहासात मुद्रणालयाचे योगदान अमूल्य असून ज्ञानदान, संशोधन व परीक्षा व्यवस्थेच्या प्रगतीत महत्वपूर्ण भूमिका मुद्रणालयाने निभावली आहे.

आज विद्यापीठ मुद्रणालयाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचा सोहळा साजरा करताना मनापासून आनंद होत आहे. भविष्यात हे मुद्रणालय नव्या उंची गाठत राहो आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक सेवेत अढळपणे कार्यरत राहो, ही सदिच्छा.

७५ वर्षांच्या या अमृतप्रसंगी विद्यापीठ मुद्रणालयास हार्दिक शुभेच्छा!



**डॉ. संजय तांबट**
अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास
विभागप्रमुख, संज्ञापन व वृत्तपत्रविद्या

## राजमुद्रणालयाकडून ज्ञानमुद्रणालयाकडे...

पुण्यमयी दे आम्हां, अक्षर वरदान ।
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान ।।

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गीतातील या शब्दांप्रमाणे विद्यापीठाची शिकवण हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचवण्याचे काम विद्यापीठाचे मुद्रणालय करत आहे. विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवापाठोपाठ मुद्रणालयही अमृतमहोत्सव साजरा करत आहे, ही आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. नव्याने स्थापन झालेल्या विद्यापीठाची छपाईची आणि ज्ञानप्रसाराची गरज लक्षात घेऊन, फलटणचे मालोजीराजे नाईक-निंबाळकर यांनी स्वतःचे राजमुद्रणालय सेवारत कर्मचाऱ्यांसह विद्यापीठाला भेट देणे, हे त्यांचे दातृत्व आणि नव्या समाजाच्या उभारणीतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे.

विद्यापीठाला स्वतःचे मुद्रणालय असणे ही गरज तेव्हाही होती आणि आजही आहे. विविध विषयांवरची पाठ्यपुस्तके, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, प्रमाणपत्रे आदी छपाईबरोबरच विविध अधिकार मंडळांच्या सभांची इतिवृत्ते, वार्षिक अहवाल व इतर दस्तावेजांचे मुद्रण विद्यापीठाचा कारभार योग्य रीतीने चालण्यासाठी अत्यावश्यक आहे. त्यातून विद्यापीठ नामक व्यवस्थेतील मुद्रणालयाचे मध्यवर्ती स्थान लक्षात येते.

काळ बदलतो, तंत्रज्ञान बदलते; त्याप्रमाणे समाजातील विविध संस्थांचे प्रयोजन आणि स्वरूपही बदलते. काळाची पावले ओळखून नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आणि स्वतःला अद्ययावत राखणे महत्त्वाचे ठरते. विद्यापीठाच्या मुद्रणालयाबाबत हेच म्हणता येईल. सन १९८४ नंतर शासनाने मुद्रणालयातील सेवकांचे वेतन देणे थांबवले. त्यामुळे सेवकभरतीवर मर्यादा आल्या. याच काळात संगणकाच्या प्रसारामुळे आणि मुद्रण तंत्रज्ञानातील प्रगतीमुळेही नवी आव्हाने उभी राहिली. अक्षरजुळणीपासून संगणकाधारित टंकलेखन व ऑफसेट, रंगीत व वेगवान छपाईच्या तंत्रामुळे त्या प्रकारची मशिनरी व प्रशिक्षित मनुष्यबळ यांची गरज निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर 'पुणे विद्यापीठाचा प्रेस मला ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसप्रमाणे

अत्याधुनिक करायचा आहे', अशी माजी कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे यांनी व्यक्त केलेली अपेक्षा महत्त्वाची ठरते. त्यामुळे विद्यापीठ मुद्रणालयाकडून विविध शैक्षणिक विभाग आणि प्रशासनाच्या असलेल्या अपेक्षांचे मूल्यमापन या कसोटीवर व्हावे, हे साहजिक आहे.

विद्यापीठाचा संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग ना. गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील रानडे इन्स्टिट्यूटच्या आवारात आहे. इतर शैक्षणिक विभागांप्रमाणेच शिक्षकांची व्हिजिटिंग कार्ड्स, लेटरहेड, विद्यार्थ्यांची ओळखपत्रे आदी छपाईची कामे मुद्रणालयामार्फत केली जातात. परंतु, विभागाचे मुद्रणालयाशी असलेले संबंध केवळ एवढ्यापुरते मर्यादित नाहीत.

आमच्या विभागाचे माजी प्रमुख स्व. ल. ना. गोखले यांचे 'पत्रकारितेचा स्वभाव' हे पुस्तक मुद्रणालयामार्फत प्रसिद्ध झाल्याची नोंद मला सुवर्णमहोत्सवी विशेषांकात सापडली. सन २००९ मध्ये मी विद्यापीठात म्हणून रुजू झाल्यानंतर झालेल्या दोन युवा महोत्सवांमध्ये त्यातील स्पर्धांचे वार्तांकन करणारे टॅब्लॉइड आकारातील रंगीत अंक आमच्या विभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने रोजच्या रोज प्रसिद्ध झाले. माझे शिक्षक प्रा. प्रसन्नकुमार अकलूजकर सर यांचे मार्गदर्शन त्यात लाभले. तसेच, प्रारंभी विद्यार्थी व नंतर सहकारी शिक्षक म्हणून प्रा. योगेश बोराटे, प्रा. संदीप नरडेले यांची चांगली मदत झाली. विद्यार्थ्यांनी केलेले वार्तांकन, रंगीत छायाचित्रांचा वापर आणि आकर्षक मांडणीमुळे या अंकांचे कौतुक झाले. या अंकांच्या निर्मिती व छपाईच्या कामादरम्यान मुद्रणालयाचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय कुटे, डॉ. अशोक कुडले आदींशी चांगला परिचय व मैत्री झाली. विद्यापीठ वार्ताचे अंक, दिनदर्शिका व दैनंदिनीच्या निर्मितीदरम्यानही मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांशी सख्य जुळले आणि विद्यापीठाच्या विकासातील मुद्रणालयाचे स्थान लक्षात आले. विद्यापीठातील इतर शैक्षणिक विभाग आणि शिक्षकांचेही मुद्रणालयाशी असे वेगवेगळ्या निमित्ताने संबंध निश्चितपणे येत असणार व त्यांच्या मनात मुद्रणालयाविषयीचा स्नेहभावही असाच पाझरत असणार, याची मला खात्री आहे.

विद्यापीठाचे मुख्य काम अध्ययन-अध्यापन, संशोधन, ज्ञानाचा प्रसार असे असते. या सर्वच अंगांमध्ये मुद्रणालयाची भूमिका पूरक ठरू शकते. ठराविक कालावधीने अभ्यासक्रम अद्ययावत केले जातात. कालानुरूप काही नव्या अभ्यासक्रमांची भर त्यात पडणे अपेक्षित असते. अशा सुधारित व नव्या अभ्यासक्रमांवरील पाठ्यपुस्तके आणि संदर्भपुस्तके तज्ज्ञांकडून लिहून घेणे आणि प्रकाशित करणे, यासाठी मुद्रणालय शैक्षणिक विभागातील शिक्षकांचा प्रोत्साहित करू शकते. विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये होणारी विशेष व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, परिषदा यांतून होणारी ज्ञानाची निर्मिती अनेकदा त्यात सहभागी विद्वानांपुरतीच मर्यादित राहते. ती अन्य अभ्यासक आणि समाजातील संबंधित घटकांपर्यंत पोचण्यासाठी ग्रंथांच्या स्वरुपात ती प्रकाशित होत राहतील, याबाबत मुद्रणालय पुढाकार घेऊ शकते. विविध शैक्षणिक

विभाग, विद्यशाखांच्या संशोधन नियतकालिके नियमित स्वरुपात प्रसिद्ध करणे सध्याच्या ज्ञानयुगात महत्त्वाचे ठरत आहे. विद्यापीठाचे मानांकन त्यावर अवलंबून असते. यात मुद्रणालयाची भूमिका कळीची ठरू शकते. उत्तम गुणवत्तेची आणि विद्वानांनी नावाजलेली संशोधन नियतकालिके प्रसिद्ध करणारे विद्यापीठ असा नावलौकिक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला प्राप्त व्हावयाचा, तर त्यासाठी मुद्रणालयही प्रतिसादी व कार्यक्षम बनवणे हा अग्रक्रमाचा विषय व्हायला हवा. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाचे आधुनिकीकरण करणे, या अपेक्षेमागचा अर्थ हा आहे. विविध शैक्षणिक विभाग त्यात हे आपले योगदान देऊ शकतात.

आमचा पत्रकारिता व माध्यमांचे शिक्षण देणारा विभाग देशातील अग्रगण्य माध्यमशिक्षण संस्थांपैकी एक आहे. पत्रकार, संपादक, निष्णात माध्यमकर्मींची एक पिढी आमच्या विभागाने घडवली आहे. विशेषतः महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांमधील प्रमुख आमच्या विभागाचे माजी विद्यार्थी आहेत. पत्रकारिता शिक्षणात प्रायोगिक वृत्तपत्रांची निर्मिती महत्त्वाची असते. विभागात चालणाऱ्या अशा उपक्रमांना विद्यापीठ मुद्रणालयाचे निरंतर सहाय्य मिळाल्यास विद्यार्थ्यांना चांगला कार्यानुभव मिळू शकतो. विद्यापीठात होणाऱ्या विविध उपक्रमांचे, परिषदांचे वार्तांकन करून ते नियमित स्वरुपात प्रसिद्ध करण्यासाठी मुद्रणालयात अद्ययावत संगणक कक्षाची उभारणी करणे, सुबक व वेगवान छपाईची व्यवस्था करणे यातून हे साध्य होऊ शकते. मानव्यविद्या, आंतरविद्याशाखीय अभ्यास व इतर विद्याशाखांमधील विभागांसाठी विद्यापीठाचे मुद्रणालय असे स्फुरण केंद्र होऊ शकते. त्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. पंचाहत्तर वर्षांपूर्वी विद्यापीठात दाखल झालेल्या राजमुद्रणालयाचे खऱ्या ज्ञानमुद्रणालयात रूपांतर करण्याचा हा राजमार्ग असू शकतो.

❑❑



## डॉ. मुग्धा गाडगीळ
प्राध्यापक, संस्कृत-प्राकृत भाषा
समन्वयक, भारतीय भाषा व भारतीय ज्ञानव्यवस्था राष्ट्रीय केंद्र

# संस्कृत आणि विद्यापीठ मुद्रणालय : हृद्य ऋणानुबंध

आधुनिक दृष्टिकोनातून अध्ययन-अध्यापनाची वैभवशाली परंपरा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला आहे. तत्कालीन पुणे विद्यापीठाच्या स्थापने एवढाच इतिहास असलेल्या काही विभागांपैकी एक म्हणजे विद्यापीठाचा संस्कृत-प्राकृत विभाग. कालांतराने विद्यापीठ अनुदान आयोगा (युजीसी) कडून विभागामध्ये संस्कृत प्रगत अध्ययन केंद्रसुद्धा सुरू झाले. जगद्विख्यात वैदिक तज्ज्ञ प्रा. रा. ना. दांडेकर हे या विभागाचे प्रथम प्रमुख. त्यानंतर हा वारसा व्याकरणाचे ख्यातनाम पंडित प्रा. शि. द. जोशी यांनी तितक्याच समर्थपणे सांभाळला. त्यानंतर आजतागायत हे काम अव्याहतपणे सुरू आहे.

संस्कृत या भाषेमध्ये प्राचीन काळच्या अनेक ज्ञानविषयांचा विचार उपलब्ध आहे. वेद-उपनिषदे, दर्शने, काव्ये-नाटके आणि विविध शास्त्रे या विविध प्रकारच्या ग्रंथांच्या रूपात हे ज्ञान संग्रहित झाले. या सर्व संबंधातील वैचारिक आणि विश्लेषणात्मक ऊहापोह गेल्या २०० वर्षांत केवळ भारतच नव्हे तर युरोपातील विविध देश, अमेरिका, जपान इ. ठिकाणचे संस्कृतज्ञ करत आहेत.

विद्यापीठातील संस्कृतच्या प्राध्यापक आणि संशोधकांनी या समृद्ध वारशात मोलाची भर घातली आहे. या कामी, सा. फु. पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाचा सिंहाचा वाटा आहे असे म्हणायला प्रत्यवाय नसावा. प्रारंभापासून आजतागायत विभागामधील प्राध्यापक आणि संशोधकांनी लिहिलेली साधारण २०० च्या आसपास पुस्तके विद्यापीठाने प्रकाशित केली आहेत. यातील बहुतांश पुस्तकांमध्ये संस्कृत संबंधीच्या विविध विषयांवरील संशोधन आहे. मूळ ग्रंथ संस्कृतमधील असले तरी आंतरराष्ट्रीय पातळीवरील काम असल्याने या संशोधनात्मक पुस्तकांची माध्यम भाषा इंग्रजी आहे, तर काही पुस्तकांची माध्यमभाषा मराठी आहे. या प्रकाशनांची पृष्ठ संख्या आणि विस्तार यात वैविध्य दिसते.

ही प्रकाशने पुढीलप्रकारे विभागता येतील - १) 'मोनोग्राफ' म्हणजे एका विषयाला वाहिलेल्या पुस्तिका २) त्या त्या विषयाला वाहिलेले ३०० च्या सुमारास पृष्ठे असलेले सविस्तर विवेचन ३) ग्रंथसूची आणि शब्दकोश ४) संशोधन परिषदांमधील लेखांचे संकलन ५) शोधपत्रिका म्हणजेच जर्नल ६) विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयीन अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तके

**१) 'मोनोग्राफ' म्हणजे विशिष्ट विषयावरील पुस्तिका –**

प्रा. रा. ना. दांडेकर हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वैदिक विद्वान. त्यांनी स्वतः संशोधनातून निर्माण केलेली, वैदिक आणि हिंदू धर्म, त्यामधील देवता संकल्पना, हिंदू धर्माचा इतिहास या विषयांवर केंद्रित पुष्कळ पुस्तके विद्यापीठ मुद्रणालयाने प्रकाशित केली. त्याचबरोबर त्यांच्या मार्गदर्शनाने त्या काळातील अनेक तरुण संशोधकांनी विविध विषयांवर जे लेखन केले, ते सुद्धा विविध स्वरूपात प्रकाशित झाले. यामध्ये वैदिक भाषाशास्त्र आणि व्याकरण, वैदिक यज्ञविधी, संस्कृत व्याकरण, संस्कृत-प्राकृत-पाली या भाषांमधील संज्ञांचा तौलनिक विचार, संस्कृत साहित्य इ. विषयांवर मोनोग्राफ म्हणजेच पुस्तिका मुद्रणालयाने प्रकाशित केल्या. शि. द. जोशी, पळसुले, देवस्थळी, नवाथे, लद्दू, थिटे, भाटे, जोग, पत्याल इ. संस्कृतज्ञ या लेखनकार्यात सहभागी झाले. १९६५ पासून पुढील दशकभराच्या काळात अशा ५० पुस्तिका प्रकाशित झाल्या.

२) विशिष्ट विषयावरील ३०० च्या सुमारास पृष्ठे असलेले सविस्तर विवेचन/अप्रकाशित संस्कृत रचनांचे सर्वप्रथम प्रकाशन/संस्कृत ग्रंथांचे इंग्रजी अथवा मराठीतील भाषांतर/भारतातील विविध ठिकाणच्या विद्वानांकडून झालेले संशोधन –

विशिष्ट विषयांवरील त्यापूर्वी न झालेले महत्त्वपूर्ण संशोधन अशा स्वरूपातील काही पुस्तके विद्यापीठ मुद्रणालयाने प्रकाशित केली. त्याचप्रमाणे पूर्वी अप्रकाशित असलेले काही मूळ संस्कृत ग्रंथ सर्वप्रथम प्रकाशित केले. साधारणपणे ३०० च्या आसपास पृष्ठे असलेली अशी सुमारे ५० प्रकाशने आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या प्रकाशनांचा आढावा पुढीलप्रमाणे –

**पूर्वी न झालेले महत्त्वपूर्ण संशोधन –**

- 'The Chaturmasya Sacrifices' – (१९८०) – व्ही. व्ही. भिडे यांच्या या संशोधनात्मक प्रकाशनामध्ये चातुर्मास्य नावाच्या वैदिक विधीचे हिरण्यकेशी श्रौत सूत्राच्या आधाराने केलेले विवेचन आणि विचार आहे. वैदिक ग्रंथात येणाऱ्या प्रत्यक्ष विधीचा सविस्तर विचार तर आहेच. त्याचप्रमाणे इसवी सननाच्या अकराव्या शतकानंतर समाजात प्रत्यक्ष होणारा प्रयोगाचाही समावेश इथे दिसतो. त्याचप्रमाणे चातुर्मास्य या यज्ञाशी समांतर अशा पारशी समाजात केल्या जाणाऱ्या गाहंबर नावाच्या विधीचाही समावेश आहे. तांत्रिक संज्ञांची यादी आणि आवश्यक अशा स्पष्टीकरणात्मक टीपा पण दिलेल्या दिसतात. एकूणच संशोधकांच्या दृष्टीने आणि या प्रकारच्या विषयांचा प्रारंभिक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीनेही हे साकल्याने केलेले विवेचन खूप महत्त्वाचे ठरते.
- 'Kavi and Kavya in the Atharvaveda' – एन जे शेंडे यांच्या १९६७ सालच्या या संशोधनात अथर्ववेदातील काव्यावर सविस्तर विवेचन आहे. तसे पाहता वेदांकडे धार्मिक वाङ्मय म्हणून पाहिले जाते. मात्र वेदातही काव्य असते. तसेच नंतर निर्माण झालेल्या काव्यात दिसणारे विविध अलंकार आणि अर्थालंकार असतात, हा वेगळा विचार लेखकाने या पुस्तकात मांडला आहे.

- 'Verbal Forms in the Rgveda (Mandala VI)' – १९७८ सालचे जी. बी. पळसुले यांचे प्रकाशित झालेले संशोधन. ऋग्वेद ही संस्कृत वाङ्मयामधील सर्वात प्राचीन रचना. यातील वर्ण्य विषयाची एकूण १० मंडळांमध्ये विभागणी आहे. या प्रत्येक मंडळात देवतांची स्तुती आहे. मात्र या पलीकडे जात वैदिक काळात संस्कृत भाषेत वापरल्या गेलेल्या प्राचीन व्याकरणावर पळसुले यांनी लक्ष केंद्रित केले. या पुस्तकामध्ये ऋग्वेदाच्या सहाव्या मंडळातील विविध क्रियापदांचा आणि त्यासारख्या रूपांचा सखोल विचार केलेला दिसून येतो. वेदातील व्याकरण असा हा खरे तर अतिशय महत्त्वाचा पण भारतात कमी अभ्यासला गेलेला विषय विद्यापीठ मुद्रणालयाने विद्वानांपर्यंत पोचवला. पुढे याच प्रकारचे आणखीही संशोधन घडले.
- 'Patanjali's Vyakarana Mahabhashya' – (१९६८–८६) – विभागाचे दुसरे प्रमुख प्रा. शि. द. जोशी हे संस्कृत व्याकरणाचे जागतिक कीर्तीचे विद्वान. संस्कृतविषयक संशोधनाच्या क्षेत्रात ते जगभरातील संशोधकांसह काम करत. जगप्रसिद्ध पाणिनीय व्याकरण म्हणजेच अष्टाध्यायीवर पतंजली या नंतरच्या विद्वानाने महाभाष्य या नावाने केलेले प्रदीर्घ भाष्य संस्कृतमध्ये उपलब्ध आहे. प्रा. जोशी यांनी रूडबेर्गेन या डच विद्वानासह या महाभाष्याचे संस्कृतमधून इंग्रजी भाषांतर केले. याचे एकूण १० भाग विद्यापीठ मुद्रणालयाने प्रकाशित केले आहेत. संस्कृत व्याकरणाच्या आधुनिक अभ्यासामध्ये या इंग्रजी भाषांतराचे खूप मोठे योगदान आहे.
- 'Panini A Variationist' – (१९८०) – तत्कालीन पुणे विद्यापीठ म्हणजे आत्ताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय विद्वान विविध कारणांसाठी भेटी देतात. त्याचप्रमाणे संशोधन कार्यासाठी इथे वास्तव्य देखील करतात. पॉल किपारस्की हे अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठातील भाषाशास्त्रज्ञ. १९७६–७७ या काळात त्यांचे पुणे विद्यापीठात वास्तव्य होते. किपारस्की यांनी या दोन वर्षांमध्ये पाणिनीय व्याकरणा विषयी जे संशोधन केले, त्यावरून तयार झालेले 'Panini A Variationist' हे पुस्तक विद्यापीठ मुद्रणालयाने प्रकाशित केले. उल्लेखनीय बाब अशी की, याचे प्रकाशन हे अमेरिकेतील एमआयटी या प्रसिद्ध मुद्रणालयाच्या साथीने झाले आहे.

संस्कृत भाषेतील अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ आधुनिक भाषांमध्ये आणणे हे संस्कृतचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी महत्त्वाचे साधन आहे –

- उदा. तैत्तिरीय संहिता या वैदिक ग्रंथाच्या पहिल्या तीन कांडांचे मराठी भाषांतर जी. यु. थिटे आणि व्ही. व्ही. भिडे यांनी केले. याशिवाय मीमांसा दर्शनामधील जैमिनीय सूत्र शाबर भाष्य यातील तर्कपदाचे भाषांतर उज्वला झा यांनी केले.

सा. फु. पुणे विद्यापीठाबाहेरील भारतातील विविध ठिकाणच्या विद्वानांकडून झालेले संशोधनसुद्धा विद्यापीठ मुद्रणालयाने प्रकाशित केलेले आहे. भारतातील विविध ठिकाणच्या संस्कृत विद्वानांना विद्यापीठात तत्कालीन संस्कृत प्रगत अध्ययन केंद्रात अभ्यागत प्राध्यापक म्हणून बोलावले जात असे. त्यांनी दिलेली

व्याख्याने किंवा केलेले संशोधन हेदेखील पुस्तक रुपाने प्रकाशित झाले आहे –

- उदा., नाट्यशास्त्र विषयावरील एक ख्यातनाम नाव म्हणजे राधावल्लभ त्रिपाठी. सौंदर्यशास्त्र, काव्यशास्त्र आणि नाट्यशास्त्र यावरील आद्य विस्तृत ग्रंथ म्हणजे भरतमुनींचे नाट्यशास्त्र. राधावल्लभ त्रिपाठी यांची या विषयावरील व्याख्याने 'Lectures on the Natyshastra' – १९९१ पुस्तकामध्ये संकलित केलेली आहेत.
- ऋग्वेदाचा काळ आणि आर्यांचे मूळ या वरील एस. एस. मिश्रा यांचे १९९१ मधील लेखन किंवा भारतीय काव्यशास्त्रावरील राममूर्ती त्रिपाठी यांचे २००१ मधील पुस्तक हीदेखील याच प्रकारची प्रकाशने.

या व्यतिरिक्त काही दुर्मीळ हस्तलिखिते गोळा करून पूर्वी प्रकाशित न झालेले काही संस्कृत ग्रंथ देखील विद्यापीठ मुद्रणालयाने सर्वप्रथम प्रकाशित केलेले दिसतात. उदा., 'Sarasidhantakaumudi of Varadaraja' हा जी. व्ही. देवस्थळी यांचा ग्रंथ. विविध ठिकाणच्या ग्रंथालयांमधून अनेक हस्तलिखिते गोळा करून त्यावरून ही रचना सुसूत्रपणे मांडली. याचे सर्वप्रथम प्रकाशन विद्यापीठ मुद्रणालयाने १९६८ मध्ये केले.

काही ग्रंथ हे संस्कृतमधील ग्रंथांचे भाषांतर आणि त्यावरील टीपा अशा स्वरूपाचे आहेत. 'Vishayatvada of Harirama' – नव्य न्याय या तत्त्वज्ञानाच्या शाखेमधील काही संकल्पना मांडणारा हा ग्रंथ हरिराम तर्कालंकार यांनी रचला होता. याचे इंग्रजी भाषांतर आणि स्पष्टीकरणात्मक टीपा अशा स्वरूपात व्ही. एन. झा यांनी तो आणला. १९८७ मध्ये हा प्रकाशित झाला.

**३) ग्रंथसूची आणि शब्दकोश –**

कोणत्याही संशोधनात्मक कामांमध्ये त्यापूर्वी झालेल्या त्या विषयातील संशोधनाचा आढावा हा एक महत्त्वाचा भाग असतो. या दृष्टिकोनातून संस्कृतसंबंधी अनेक विषयांच्या ग्रंथसूची मुद्रणालयाने प्रकाशित केल्या. १९९४ ते २००० या कालावधीत अशा एकूण १२ ग्रंथसूची तयार झाल्या. ज्या काळात आजच्या सारखे अतिशय वेगवान तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते, तेव्हा या ग्रंथसूचींचे स्थान फार मूल्यवान ठरते.

याच जोडीने संस्कृत ग्रंथांमधील विविध ज्ञानशाखांमधील अनेक तांत्रिक शब्दांचे कोश विभागाकडून तयार झाले आणि मुद्रणालयाने प्रकाशित केले. प्रामुख्याने श्रौत, न्याय आणि उपनिषदे यावरील असे एकूण ८ कोश आहेत.

शिवाय संस्कृत ग्रंथांची चिकित्सक आवृत्ती आणि त्याचे भाषांतर असाही एक प्रकाशनाचा प्रकार दिसून येतो.

**४) संशोधन परिषदांमधील लेखांचे संकलन –**

विभागाच्या आणि केंद्राच्या गेल्या अनेक वर्षांच्या इतिहासात संशोधनपर चर्चासत्रे नियमितपणे आयोजित केली जात असत. त्यातील अनेक लेखांचे प्रकाशनसुद्धा विद्यापीठ मुद्रणालयाने केले.

Ashtadhyayi of Panini, Environmental Awareness in Sanskrit Literature, Living Customs and their Ancient Indian Sources, Dharma Studies, Language and Identity – अशा विविधांगी विषयांवर झालेल्या परिषदांमधील लेख संकलन म्हणून प्रकाशित झाले.

**५) शोधपत्रिका म्हणजेच जर्नल –**

शोधपत्रिका हे विविध प्रकारचे संशोधन नियमितपणे प्रकाशित करण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन असते. प्रगत अध्ययन केंद्राअंतर्गत CASS Studies या नावाने १९७३ पासून २००८ पर्यंत अशाप्रकारे शोधपत्रिका प्रकाशित झाली. तर २००४ पासून आजतागायत 'Journal of Indian Intellectual Tradition' या शीर्षकांतर्गत षण्मासिक शोधपत्रिकेचे साधारणपणे ३५ च्या आसपास अंक प्रकाशित झाले आहेत. यातील बरेचसे अंक हे बी. के. दलाई यांनी संपादित केलेले आहेत.

**६) विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयीन अभ्यासक्रमासाठी पाठ्यपुस्तके –**

संशोधन हे उच्च शिक्षणातील एकाच ठिकाणी होणारे, परंतु कदाचित प्रत्यक्ष सर्वसामान्य समाजापर्यंत न पोचणारे काम असते. मात्र विद्यार्थ्यांच्या पुढील पिढ्या तयार करण्यातून तोच विषय त्या विभागाकडून प्रत्यक्ष समाजात प्रसारित होत असतो. यासाठी गेल्या २५ वर्षात लघुसिद्धांतकौमुदी, वैदिक वाङ्मयाचा इतिहास, प्रतिमानाटक व नीतिशतक, वेदांतसार आणि तर्कसंग्रह इ. विषयांवरील पाठ्यपुस्तके तयार केली. संस्कृत प्राकृत विभागातील कांचन मांडे, शैलजा कात्रे इ. प्राध्यापकांचे यात योगदान होते. ही पुस्तके देखील विद्यापीठ मुद्रणालयाने प्रकाशित केली. जी सा. फु. पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपयोगी ठरली.

अशाप्रकारे उच्च शिक्षणातील सखोल संशोधनात्मक काम असो किंवा तरुण पिढीकडून हाताळली जाणारी पाठ्यपुस्तके असोत, सा. फु. पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभाग आणि केंद्राकडून तयार झालेले काम प्रकाशित करण्याची महत्वपूर्ण जबाबदारी गेली ७५ वर्षे विद्यापीठाचे मुद्रणालय समर्थपणे सांभाळत आले आहे. अशा तऱ्हेने विद्यापीठाचा संस्कृत विभाग आणि मुद्रणालय यांच्यामधील हृद्य ऋणानुबंध सुद्धा जवळपास अमृतमहोत्सवी आहे असे म्हणायला हरकत नसावी!

❑❑



## प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे
विभागप्रमुख, मराठी विभाग

# विद्यापीठ मुद्रणालय आणि मराठी विभाग : ७५ वर्षांचा सहकार्याचा प्रवास

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर लगेचच म्हणजेच १९५० मध्ये 'विद्यापीठ मुद्रणालय' या विभागाची स्थापना झाली. सुरुवातीपासूनच विद्यापीठाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व संशोधनात्मक कार्यासाठी आवश्यक असलेल्या मुद्रण सेवांचा केंद्रबिंदू म्हणून मुद्रणालयाने मोलाचे योगदान दिले आहे. या सेवांमध्ये परीक्षा संदर्भित दस्तऐवज, नियतकालिके, ग्रंथ, अहवाल, प्रकल्प पुस्तके, संशोधनपर ग्रंथ, निमंत्रणपत्रिका यांचा समावेश होता. या ७५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीत विद्यापीठाच्या विविध विभागांप्रमाणेच मराठी विभागाशीही मुद्रणालयाचा विश्वासार्ह आणि सलोख्याचा संबंध निर्माण झाला.

### मराठी विभाग आणि मुद्रणालयातील सहकार्याचे प्रारंभिक दिवस

मराठी विभाग हा विद्यापीठातील एक अग्रगण्य आणि समृद्ध विभाग मानला जातो. साहित्य, भाषा, संस्कृती, लोकपरंपरा, समाज आणि तत्त्वचिंतन यांचा अभ्यास करणाऱ्या या विभागाने अनेक मौल्यवान आणि दर्जेदार ग्रंथांची निर्मिती केली आहे. या ग्रंथांचे सुबोध, दर्जेदार आणि सुबक मुद्रण हे वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी अत्यंत आवश्यक होते. यासाठी मराठी विभागाने विद्यापीठ मुद्रणालयावर विश्वास ठेवला आणि मुद्रणालयानेही या विश्वासाला कधीच तडा जाऊ दिला नाही. या सलोख्यामुळे, कामाच्या प्रक्रियेत अनेक अडचणी सहजपणे सोडवल्या जात असत. मराठी ग्रंथांच्या छपाईसाठी लागणारी विशिष्ट अक्षरे, देवनागरी लिपीतील काही खास चिन्हे आणि हस्तलिखितांची गुंतागुंत समजून घेण्याची क्षमता मुद्रणालयाच्या कर्मचाऱ्यांमध्ये होती. मराठी विभागाचे प्राध्यापक मुद्रणालयात स्वतः जाऊन प्रुफ तपासत असत, आणि मुद्रणालयाचे तंत्रज्ञ त्यांच्या सूचनांचे अत्यंत बारकाईने पालन करत असत. या परस्पर संवादामुळे कामात अचूकता येत होती आणि अपेक्षित परिणाम साध्य होत होते. अनेकदा अपुरी साधनसामग्री आणि कमी वेळेच्या दडपणातही मुद्रणालयाने गुणवत्ता व वेळेची शिस्त सांभाळली. हीच गोष्ट पुढे विभागाच्या ग्रंथनिर्मितीच्या कामात उपयोगी ठरली.

### दर्जेदार ग्रंथांचे सुबक मुद्रण

मराठी विभागाने गत सात दशकांत अनेक मौलिक ग्रंथ प्रकाशित केले आहेत. यामध्ये समीक्षात्मक,

संशोधनपर, संपादित ग्रंथांचा समावेश आहे. प्रा. शं. गो. तुळपुळे यांनी सन १९५० मध्ये पुरातत्त्वीय आणि भाषिक संशोधन सुरु केले आणि त्या अभ्यासातून लिहिलेला 'प्राचीन मराठी कोरीव लेख' हा ग्रंथ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाने १९६४ साली प्रकशित केला. मराठी भाषेची प्राचीन रूपे आणि लिप्यांचा अभ्यास करणाऱ्यांसाठी हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे. माजी विभागप्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी २०१७ साली 'मराठी विभागाचा इतिहास' हा ग्रंथ लिहून गेल्या साडेसहा दशकांमधील मराठी विभागाची वाटचाल सविस्तरपणे लिहिली आहे. हा ग्रंथदेखील पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाने प्रकाशित केलेला आहे.

**संशोधन प्रकल्प, अहवाल छपाई**

विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच मराठी विभागात विविध संशोधनप्रकल्प राबविण्यात आलेले आहेत. या संशोधनप्रकल्पांच्या छापाईचे काम पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाने केले आहे. यामध्ये सन १९८२-८३ मध्ये 'बोली शब्दकोश' या प्रकल्पाचे काम पूर्ण करून मुद्रणालयात छपाई करण्यात आली. सन २०१२ ते १४ या कालावधीत डॉ. अविनाश आवलगावकर ह्यांनी 'महानुभाव साहित्याचा शब्दकोश', डॉ. तुकाराम रोंगटे ह्यांनी 'मराठी कादंबरीने चितारलेली आदिवासी स्त्री', डॉ. प्रभाकर देसाई ह्यांनी 'इतिहासविद्याशाखा : सिद्धांतने आणि वाङ्मयेतिहासाची संकल्पनात्मक चौकट' हे संशोधनप्रकल्प पूर्ण करून विद्यापीठाच्या मुद्रणालयातूनच छपाई करण्यात आली.

सन २०१२-१३ मध्ये विभागातील प्राध्यापकांनी 'विभागीय संशोधन विकास कार्यक्रम'च्या अर्थसाहाय्याने पुढील संशोधनप्रकल्प पूर्ण करून विद्यापीठाच्या मुद्रणालयातूनच छपाई करण्यात आले. १. डॉ. विद्यागौरी टिळक ('पुणे परिसरातील प्रबोधनयुगाचा प्रारंभ : वाङ्मयील व सांस्कृतिक अभ्यास'), २. डॉ. अविनाश आवलगावकर ('सूत्रपाठ : संशोधन आणि संपादन'), ३. डॉ. मनोहर जाधव ('निवडक हिंदी कवितांचा मराठी अनुवाद : संपादन आणि समीक्षा'), ४. डॉ. अविनाश सांगोलेकर ('एकोणिसाव्या शतकातील भाषांतरित मराठी कविता'), ५. डॉ. तुकाराम रोंगटे ('सह्याद्रीतील ठाकर समाजाच्या प्रादेशिक बोलीचा अभ्यास'), ६. डॉ. प्रभाकर देसाई ('राजकारण आणि कविता : १९७० ते १९८० : भारतीय परिप्रेक्ष्य')

ह्याच कालावधीत पुढील शिक्षकांनी सी. एस. एस. एच. यु. पी. ई. फेज २ च्या अर्थसाहाय्याने आपले संशोधन प्रकल्प पूर्ण केले : १ डॉ. विद्यागौरी टिळक ('एकोणिसाव्या शतकातील भाषाविचार'), २. डॉ. प्रभाकर देसाई ('राजकारण आणि भारतीय साहित्य : १९७० ते १९८० : भारतीय परिप्रेक्ष्य').

२०१४-१५ या कालावधीत डॉ. अविनाश सांगोलेकर ह्यांनी डी. आर. डी. पी. च्या अर्थसाहाय्याने '१९व्या शतकातील स्वतंत्र मराठी कविता', तर डॉ. मनोहर जाधव ह्यांनी 'नव्वदोत्तर हिंदी कवितांचा अनुवाद आणि मीमांसा', डॉ. विद्यागौरी टिळक ह्यांनी 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तन समाज आणि साहित्य (१८३३-१९००)', तर डॉ. प्रभाकर देसाई ह्यांनी '१९व्या शतकातील परिसरातील

समीक्षा', तर डॉ. तुकाराम रोंगटे ह्यांनी 'सह्याद्री परिसरातील आदिवासी लोककथांचे स्वरूप आणि निराळेपण' ह्या विषयावर संशोधनप्रकल्प पूर्ण करून त्यांची विद्यापीठाच्या मुद्रणालयातूनच छपाई करण्यात आली.

२०१६-१७ ह्या वर्षात डी. आर. डी. पी. च्या अर्थसाहाय्याने डॉ. अविनाश सांगोलेकर ह्यांनी 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचा इतिहास', डॉ. अविनाश आवलगाकर ह्यांनी 'महानुभावांचे वृद्धाचार', डॉ. मनोहर जाधव ह्यांनी 'हिंदी कवितांचा मराठी अनुवाद', डॉ. विद्यागौरी टिळक ह्यांनी '१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तन, समाज आणि साहित्य इ. स. १८५७-१९००', डॉ. तुकाराम रोंगटे ह्यांनी 'कोळी महादेव ह्यांच्या बोलीचा अभ्यास', डॉ. प्रभाकर देसाई ह्यांनी १९ व्या शतकातील मराठी साहित्य, साहित्यसमीक्षा व साहित्यविचार' हे संशोधन प्रकल्पपूर्ण करून त्यांची विद्यापीठाच्या मुद्रणालयातूनच छपाई करण्यात आली.

पुढे सीएसएसएच अंतर्गत डॉ. तुकाराम रोंगटे ह्यांनी  सन २०१७ ते २०१९ या कालावधीमध्ये 'महादेव कोळी जमातीच्या बोलीचा अभ्यास', 'रोडाली ह्या कलाप्रकाराचा अभ्यास' आणि 'सह्याद्रीतील महादेव कोळी जमातीच्या बोलीचा अभ्यास' ह्या लघुसंशोधन प्रकल्पाचे काम पूर्ण करून पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयातून संशोधन अहवाल पुस्तिकांची छपाई करण्यात आली.

या ग्रंथांची मुद्रणप्रक्रिया ही त्यांच्या अंतःसत्त्वाशी सुसंगत अशी असावी, ही विभागाची अपेक्षा होती. मुद्रणालयाने या अपेक्षांची पूर्तता केवळ तांत्रिक दृष्टिकोनातूनच नाही तर मूल्यदृष्टिकोनातूनही केली. डिझाईन, फॉन्टचे शास्त्रशुद्ध प्रमाण, अनुक्रमणिका आणि पृष्ठरचनेतील सौंदर्यज्ञान या बाबींकडे मुद्रणालयाने नेहमीच सजगतेने लक्ष दिले. त्यामुळे विभागाच्या प्रकाशित ग्रंथांना विद्यापीठाबाहेरील वर्तुळातही मान्यता आणि आदर मिळाला.

**पत्रिकांचे मुद्रण**

मराठी विभागाने अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्र, परिसंवाद, परिषदांचे आयोजन केलेले आहे. ह्या सर्व कार्यक्रमांच्या निमंत्रणपत्रिका, फलक, प्रमाणपत्रे हे सर्व सुबक आणि दर्जेदार स्वरूपात विद्यापीठाच्या प्रेसमधून मिळत असते.

**तांत्रिक नवकल्पना आणि विश्वासार्हता**

कालानुरूप मुद्रणाच्या तंत्रज्ञानात मोठे बदल झाले. शाई छपाईपासून ते डिजिटल मुद्रणापर्यंतचा प्रवास हा सुलभ नव्हता. मात्र मुद्रणालयाने ही तांत्रिक वाटचाल सातत्याने आत्मसात केली आणि त्याचा लाभ मराठी विभागालाही झाला. या सर्व प्रक्रियेमध्ये मुद्रणालयाने वेळेचे नियोजन, लेखन-संपादन-सुधारणा यातील समन्वय, पुरवठा व्यवस्थापन यामध्ये अनुशासन पाळले. मराठी विभागाच्या अनेक कार्यक्रमांमध्ये निमंत्रणपत्रिका, स्मरणिका, व्याख्यानमालेच्या पुस्तिका यांची वेळेवर छपाई हीही लक्षणीय बाब ठरली आहे.

**भविष्याचा वेध**

आज जेव्हा आपण ७५ वर्षांचा प्रवास पूर्ण करतो आहोत, तेव्हा केवळ मागे पाहणे नव्हे, तर पुढे पाहण्याचीही ही वेळ आहे. मराठी विभाग आणि मुद्रणालय यांच्यातील सहकार्याला आता डिजिटल प्रकाशन, मल्टिमिडिया ग्रंथ, ई-बुक्स, ऑडिओ बुक्स यांसारख्या नव्या दिशांकडे वळिवण्याची संधी आहे. दोन्ही विभागांनी एकत्रितपणे विद्या आणि तंत्रज्ञान यांचा संगम साधून नव्या वाचकसंस्कृतीला मार्गदर्शन करावे, ही काळाची गरज आहे.

**समारोप**

मुद्रणालय हे केवळ एक सेवा-घटक नसून ते विद्यापीठाच्या बौद्धिक संपदेचे संवाहक आहे. मराठी विभागाच्या ज्ञाननिर्मितीच्या वाटचालीला मुद्रणालयाने नेहमीच पंख दिले. त्या सहकार्याचा हा ७५ वर्षांचा प्रवास म्हणजे एक विश्वासाचे, सहनिर्मितीचे आणि मूल्यांवरील आधारित भागीदारीचे प्रतीक आहे. येत्या काळातही ही भागीदारी अधिक दृढ आणि सर्जनशील होवो, हीच अपेक्षा.

□□



## प्रा. डॉ. शुभदा नगरकर

समन्वयक, सेंटर फॉर पब्लिकेशन इथिक्स


# विद्यापीठ प्रकाशनालये : ज्ञानप्रसारातील विश्वासार्हता आणि नवचिंतनाची दिशा

मानवी इतिहासात काही शोध असे असतात, जे केवळ तांत्रिक प्रगती साधत नाहीत, तर समाजाच्या विचार करण्याच्या आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्याच्या पद्धतीतच क्रांती घडवतात. योहान्स गुटेनबर्ग यांनी सुमारे १४५० च्या दशकात युरोपमध्ये शोधलेले मुद्रण यंत्र हे असेच एक युगांतरकारी पाऊल होते. या शोधापूर्वी, ज्ञानाची निर्मिती आणि प्रसार हा प्रामुख्याने धर्मगुरू आणि उच्चभ्रू वर्गापुरता मर्यादित होता. हस्तलिखिते तयार करणे हे अत्यंत श्रमसाध्य आणि खर्चिक असल्यामुळे, पुस्तके केवळ मोजक्या लोकांपर्यंतच पोहोचत होती. परंतु, छपाई यंत्राच्या आगमनाने ज्ञानाचा प्रवाह जलदगतीने आणि मोठ्या प्रमाणावर जनसामान्यांपर्यंत पोहोचू लागला. म्हणूनच, मुद्रणकलेचा शोध ही मानवी इतिहासातील एक अभूतपूर्व 'संवाद क्रांती' (Communications Revolution) म्हणून ओळखली जाते. या क्रांतीने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवले, ज्याचे सखोल विश्लेषण एलिझाबेथ आयझेनस्टाईन यांनी त्यांच्या **"The Printing Press as an Agent of Change (1980)"** या महत्त्वपूर्ण ग्रंथात केले आहे.

ही संवाद क्रांती १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाली आणि तिचा प्रभाव अनेक शतके टिकून राहिला. यामुळे माहितीचे संकलन, जतन आणि प्रसाराच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र परिवर्तन झाले, परिणामी ज्ञानाची निर्मिती आणि वितरण अभूतपूर्व वेगाने वाढले. १७ व्या शतकात पहिले छापील संशोधनात्मक नियतकालिक प्रकाशित झाले आणि यानंतर जगभरातील अनेक शैक्षणिक संस्था व विद्यापीठांनी त्यांची स्वतःची प्रकाशनालये सुरू केली. ही प्रकाशनालये केवळ पुस्तके छापण्याच्या पलीकडे जाऊन, ज्ञानाच्या प्रसाराची आणि संशोधनाला चालना देणारी केंद्रे बनली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रकाशनालयाच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने लिहिण्यात आलेल्या या लेखात विद्यापीठीय प्रकाशनालयांवर सखोल भाष्य केले आहे. यात जागतिक स्तरावर आणि विशेषतः भारतात ज्ञाननिर्मिती, प्रसार आणि माहितीचे जतन करण्यामध्ये या प्रकाशनालयांची नेमकी काय महत्त्वाची भूमिका आहे, त्यांना कोणत्या प्रमुख आव्हानांना सामोरे जावे लागत आहे विद्यापीठ प्रकाशानालयाच्या भविष्यातील योजना यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

जागतिक पातळीवर, विद्यापीठांची प्रकाशनालये ही त्यांच्या मूळ संस्थांच्या– म्हणजेच विद्यापीठांच्या – मूलभूत उद्दिष्टांशी थेट जोडलेली असतात; जसे संशोधन, अध्यापन आणि सार्वजनिक सेवा इ. व्यावसायिक प्रकाशकांप्रमाणे केवळ नफ्याचा विचार न करता, या प्रकाशनालयांचे प्राथमिक उद्दिष्ट विद्वत्तापूर्ण ज्ञानाच्या प्रसाराला प्राधान्य देणे हे असते. विद्यापीठाच्या अंतर्गत छपाईच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच, ही प्रकाशनालये विविध प्रकारच्या ज्ञाननिर्मितीला चालना देतात. ती संशोधनपर ग्रंथ, उच्चस्तरीय शोधनिबंध, विद्वत्तापूर्ण पुस्तके आणि विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वाच्या नियतकालिकांचे प्रकाशन करून नव-नवीन कल्पना आणि सिद्धांतांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देतात. हे व्यासपीठ केवळ शैक्षणिक वर्तुळापुरते मर्यादित न राहता ते समाजासाठी ज्ञानाची कवाडे खुली करते.

याव्यतिरिक्त विद्यापीठीय प्रकाशनालये केवळ नवीन ज्ञान प्रकाशित करत नाहीत, तर ते माहितीचे जतन आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्याचेही महत्त्वाचे कार्य करतात. अनेकदा दुर्मिळ ग्रंथ, ऐतिहासिक हस्तलिखिते आणि स्थानिक भाषांमधील महत्त्वाचे, पण व्यावसायिकदृष्ट्या कमी आकर्षक असलेले साहित्य प्रकाशित करून ते या महत्त्वपूर्ण ठेव्याला वाचकांपर्यंत पोहोचवतात आणि पुढील पिढ्यांसाठी जतन करतात. थोडक्यात, विद्यापीठांची प्रकाशनालये ही केवळ 'प्रिंटिंग युनिट्स' नसून, ती ज्ञाननिर्मिती आणि प्रसारणाच्या परिसंस्थेतील अविभाज्य भाग आहेत, जी विद्यापीठाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक योगदानाला मूर्तरूप देतात.

भारतात ब्रिटिश राजवटीत विद्यापीठांच्या स्थापनेसोबतच त्यांच्या प्रकाशन विभागांचीही सुरुवात झाली. मुंबई, कलकत्ता  आणि मद्रास विद्यापीठांची प्रकाशनालाये ही काही सुरुवातीची उदाहरणे आहेत. त्यानंतर बऱ्याच विद्यापीठांनी स्वता:ची मुद्रणालये सुरु केली जी नंतर प्रकाशनालये सुद्धा झाली. सुरुवातीच्या काळात या प्रकाशनालयांनी शिक्षण आणि संशोधनासाठी आवश्यक असलेली पुस्तके, नियतकालिके आणि अभ्यासक्रम साहित्य प्रकाशित करण्यावर भर दिला. भारतातील अनेक विद्यापीठे दर्जेदार संशोधनात्मक जर्नल्स अनेक वर्षांपासून प्रसिद्ध करतात.

गेल्या अनेक दशकांपासून भारतातील अनेक विद्यापीठे दर्जेदार संशोधनात्मक जर्नल्स नियमितपणे प्रसिद्ध करत आहेत, ज्यांनी संबंधित ज्ञानशाखांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आजही मुंबई, दिल्ली, पुणे, काश्मीर, बनारस यांसारखी अनेक विद्यापीठे विविध विषयांवरील अनेक दर्जेदार नियतकालिके आणि जर्नल्स प्रसिद्ध करत आहेत, ज्यातून भारतीय संशोधनाला आणि विद्वत्तापूर्ण लेखनाला प्रोत्साहन मिळते. ही प्रकाशनालये भारतीय शिक्षण क्षेत्राच्या विकासात आणि ज्ञानप्रसारात एक महत्त्वाचे माध्यम ठरली आहेत, ज्यांनी अनेक दशके अखंडितपणे सेवा दिली आहे.

आजवर अनेक भारतीय विद्यापीठांची प्रकाशनालये त्यांच्या अपेक्षित यशापासून वंचित राहिली आहेत, हे खेदजनक वास्तव आहे. त्यांची स्थापना उदात्त हेतूने झाली असली तरी, सध्या त्यांना अनेक गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. यात प्रामुख्याने आर्थिक पाठबळाचा अभाव जाणवतो, ज्यामुळे आधुनिक छपाई तंत्रज्ञान, आकर्षक डिझाइन, कठोर संपादन प्रक्रिया, प्रभावी विपणन रणनीती आणि अद्ययावत डिजिटल पायाभूत सुविधांसाठी आवश्यक संसाधनांची कमतरता भासते आणि त्यांची व्यावसायिक प्रकाशकांसमोरची स्पर्धात्मकता कमी होते. तसेच जागरूकतेचा आणि दृश्यमानतेचा अभाव हे देखील एक मोठे आव्हान आहे. उच्च दर्जाची प्रकाशने असूनही, प्रभावी विपणन व वितरणाच्या अभावामुळे ती संबंधित शैक्षणिक वर्गापर्यंत किंवा सामान्य वाचकांपर्यंत पोहोचत नाहीत, ज्यामुळे त्यांचे महत्त्व दुर्लक्षित राहते. भारतीय संदर्भात भाषिक मर्यादा आणि जागतिक पोहोच हा एक विशिष्ट मुद्दा आहे, कारण इंग्रजीमध्ये प्रकाशित होणाऱ्या जागतिक विद्वत्तेमुळे प्रादेशिक भाषांमधील उत्कृष्ट संशोधनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. याशिवाय अनेक प्रकाशनालयांमध्ये व्यावसायिक स्तरावरील प्रभावी विपणन आणि वितरण जाळ्यांचा अभाव दिसून येतो, ज्यामुळे पारंपरिक पद्धती आजच्या डिजिटल युगात पुरेशा ठरत नाहीत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, विद्यापीठांची प्रकाशनालये, विद्यापीठातील इतर विभाग, ग्रंथालये आणि बाहेरील शैक्षणिक संस्था यांच्यात अनेकदा सहकार्याचा अभाव दिसून येतो, ज्यामुळे संसाधनांचे एकत्रीकरण आणि ज्ञानाची प्रभावी देवाणघेवाण होऊ शकत नाही

Peter J. Dougherty (2010) यांनी त्यांच्या "Reimagining the University Press: A Checklist for Scholarly Publishers" या लेखात अनेक महत्त्वाचे बदल विद्यापीठीय प्रकाशनालयांसाठी सुचविले आहेत. त्यांच्या मते, उच्च दर्जाचे शैक्षणिक साहित्य प्रकाशित करणे, लेखकांशी सशक्त नाते ठेवणे, जागतिक स्तरावर पोहोचण्याचे धोरण, आणि डिजिटल माध्यमांसाठी प्रारंभापासूनच तयारी ठेवणे हे आवश्यक आहे. Dougherty यांच्या मतानुसार, विद्यापीठ प्रकाशनालयाची नव्याने पुनर्रचना करायची असेल, तर त्यासाठी दृष्टिकोन, संवाद आणि सहकार्य यांची बांधिलकी आवश्यक आहे. खालील काही बदल प्रकाशनालये सक्षम होण्यासाठी सुचविले आहेत.

**आर्थिक पाठबळ आणि स्वायत्तता**

- विद्यापीठे व सरकारने निधीत वाढ करावी.
- नोकरशाहीचे अडथळे कमी करून प्रकाशनकार्याला व्यावसायिक लवचिकता द्यावी.
- आर्थिक स्वायत्तता मिळाल्यास निर्णयप्रक्रिया वेगवान होईल.
- सरकारने अद्ययावत मुद्रण साहित्य उपलब्धतेसाठी आर्थिक अनुदान देणे आवश्यक आहे.

**संशोधन जर्नल्सचा दर्जा विकास**

- नवीन आणि सध्याच्या संशोधन नियतकालिकांसाठी मजबूत यंत्रणा उभारावी.

•कठोर, पारदर्शक पीअर रिव्ह्यू (Peer Review) प्रक्रिया अनिवार्य करावी.

•संपादक व समीक्षकांसाठी नियमित प्रशिक्षणाची सोय करावी.

**डिजिटल आणि मुक्त प्रवेश (Open Access)**

•बळकट डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करावी.

•वापरकर्ता-उपयोगी वेबसाइट्स, ई-बुक प्लॅटफॉर्म विकसित करावेत.

•शक्य असल्यास 'मुक्त प्रवेश' (Open Access) धोरण स्वीकारावे.

**धोरणात्मक विपणन व वितरण**

•ऑनलाइन व ऑफलाइन व्यावसायिक विपणन धोरणे तयार करावीत.

•सोशल मीडियाचा प्रभावी वापर, पुस्तक मेळ्यांमध्ये सहभाग महत्त्वाचा.

•स्वतंत्र वेबसाइट, ऑनलाइन स्टोअर्स, ॲमेझॉन, फ्लिपकार्टवर उपस्थिती वाढवावी.

**भाषिक समानता व जागतिक ओळख**

•भारतीय भाषांमधील उच्च संशोधनाला पाठबळ द्यावे.

•व्यावसायिक भाषा संपादन सेवा आणि बहुभाषिक प्रकाशनांना प्रोत्साहन द्यावे.

•प्रादेशिक भाषांमध्ये दर्जेदार नियतकालिके सुरू करावीत.

**सहकार्य आणि भागीदारी**

•इतर विद्यापीठे, ग्रंथालये, संशोधन संस्था आणि प्रकाशनालयांशी सक्रिय सहभाग वाढवावा.

•लेखकांसाठी लेखन शिबिरे आणि 'संपादक-लेखक संवाद मालिका' आयोजित करावी.

**क्षमता आणि व्यावसायिक विकास**

•प्रकाशन कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक प्रकाशन ट्रेंड, डिजिटल साधने आणि नैतिक मार्गदर्शक तत्त्वांवर नियमित प्रशिक्षण द्यावे.

**विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग**

•इंटर्नशिप, 'स्टुडंट एडिटर' योजना आणि संपादन कार्यशाळा आयोजित कराव्यात.

•विद्यार्थ्यांना प्रकाशन प्रक्रियेचा प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभव द्यावा.

**स्थानिक समाजाधारित साहित्य**

•'पब्लिक ह्युमॅनिटीज' (लोकाभिमुख विद्या) संकल्पना जोपासावी.

•आदिवासी बोलीभाषा, लोककथा, ग्रामीण जीवन पर्यावरणीय संघर्ष, स्त्री-अनुभव, जातनिहाय अन्याय, स्थानिक अन्नसंस्कृती, आणि औषधी परंपरा यांसारख्या विषयांवर समाजोपयोगी साहित्य प्रकाशित करावे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मुद्रणालय १९५० मध्ये स्थापन झाले आणि ते जरी केंब्रिज किंवा ऑक्सफर्डसारख्या ऐतिहासिक मोठ्या प्रकाशनगृहांइतके जुने नसले तरी, महाराष्ट्रातील आणि भारतातील

शैक्षणिक प्रकाशनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाद्वारे प्रकाशित होणारे 'परामर्श' (मराठी आणि हिंदी) हे एक प्रमुख उदाहरण आहे, जे तत्त्वज्ञान आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासातील संशोधन आणि विचारांना व्यासपीठ पुरवते. धोरणात्मक उपक्रमांद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मुद्रणालय हे केवळ एक प्रिंट युनिट न राहता, एक बौद्धिक, सामाजिक, आणि संवादात्मक केंद्र बनू शकते. प्रेसने आत्तापर्यंत ४० पेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. प्रेसच्या पुनरुज्जीवनाचा हा काळ म्हणजे एक ऐतिहासिक संधी आहे. या संधीचा उपयोग करून एक नव्या युगातील विद्यापीठ मुद्रणालय घडवणे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.




**प्रा. डॉ. संजय देसले**
संचालक, जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र


# विद्यापीठ मुद्रणालय आणि विद्यापीठ ग्रंथालय यांच्यातील सहकार्याचे महत्व

**प्रस्तावना :**

**बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो– साने गुरुजी**

ज्या देशाकडे सैन्य अधिक तो देश अधिक बलवान समजला जातो, ज्या देशाकडे साधन संपत्ती अधिक तो देश अधिक बलवान असेही म्हणतात; परंतु आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या विस्फोटाच्या काळात ज्या देशाकडे शास्त्र–संशोधनाचे, ज्ञान–विज्ञानाचे, यंत्र–तंत्राचे म्हणजेच ज्ञानाचे बळ अधिक तो देश बलवान असा साने गुरुजींच्या वरील पंक्तींचा अर्थ घ्यावा लागेल. ज्या देशाकडे ज्ञानाची मक्तेदारी, तो देश नि:संशय जगावर राज्य करील.

भारतातील विद्यापीठांमध्ये ज्ञानसाठा मुबलक असला तरी ज्ञानसाधने वापरण्यासाठी आज भारतीय विद्यापीठे अनेक जागतिक पातळीवर प्रकाशित होणाऱ्या परदेशी प्रकाशनांवर अवलंबून असल्याचे दिसून येते. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या ज्ञानावर प्रक्रिया करून किंवा ते ज्ञान प्रकाशित करून त्याची नवनिर्मिती करण्याबाबत भारतीय विद्यापीठे फारसा पुढाकार घेत नाहीत असे दिसून येते. भारतातील विद्यापीठे ग्रंथ, ई–पुस्तके, नियतकालिके आणि ई–नियतकालिके स्वतः प्रकाशित करण्याबाबत उदासीन असल्याचे क्लेशदायी चित्र बदलण्याची गरज आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मुद्रणालय आणि ग्रंथालय (जयकर ज्ञानस्रोत केंद्र) ह्या दोन वेगवेगळ्या सेवा व सुविधा आहेत. मुद्रणालय हे विद्यापीठातील सर्व प्रशासकीय आणि शैक्षणिक विभागांच्या कामकाजासाठी आवश्यक असलेल्या छपाईचे काम करते; तर ग्रंथालय हे विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षक यांना अभ्यासासाठी आणि संशोधनासाठी आवश्यक असलेले विविध स्वरूपातील (मुद्रित, अमुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक) ज्ञानसाहित्य पुरविते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मुद्रणालय आणि विद्यापीठाचे मुख्य ग्रंथालय म्हणजे जयकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्यामध्ये जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे दैनंदिन कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले छापील साहित्य–जसे विविध नोंदवह्यांची छपाई व बांधणी, अहवाल छपाई व बांधणी, Book Cards ची छपाई, Due Date Slips ची छपाई, विविध अर्जांची छपाई, जुन्या व फाटलेल्या ग्रंथांची तसेच नियतकालिकांच्या अंकांची बांधणी यासारखी कामे करण्यासाठी समन्वय आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाने गेल्या काही वर्षांत जुन्या, दुर्मिळ आणि Copyright नसलेल्या काही पुस्तकांचे पुनर्मुद्रण करून ती पुस्तके वाचक व संशोधक यांना उपलब्ध करून दिली आहेत. तसेच ती विक्रीसाठीही उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे १० फेब्रुवारी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाचा वार्षिक अंकही नियमितपणे प्रकाशित करण्याचे काम मुद्रणालय करीत आहे. परदेशातील विद्यापीठांचा अभ्यास केला असता अनेक परदेशातील विद्यापीठांची मुद्रणालये ग्रंथनिर्मिती मध्ये मोठ्या प्रमाणावर भरीव काम करताना आढळून येतात. मोठमोठ्या प्रकाशन संस्थांप्रमाणे हजारो ग्रंथांची आणि संशोधन नियतकालिकांची निर्मिती या परदेशातील विद्यापीठांच्या मुद्रणालयांनी केली आहे आणि दरवर्षी त्यात आणखी भर घालत आहेत. त्यातून ज्ञानाचा प्रसार करण्याबरोबरच पुस्तकांच्या विक्रीतून विद्यापीठाला आर्थिक सहयोगाची भूमिकाही ही विद्यापीठे पार पाडत आहेत. या विद्यापीठांच्या तुलनेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाला प्रकाशन या बाबतीत आणखी खूपच वाव आहे असे म्हणता येईल.

परदेशातील अनेक विद्यापीठांची स्वत:ची मुद्रणालये आहेत. परंतु त्या विद्यापीठांमधील University of Oxford आणि University of Cambridge या दोन विद्यापीठांची आणि त्यांच्या मुद्रणालयांची प्रातिनिधिक उदाहरणे घेऊन त्यांचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी तुलनात्मक अभ्यास करता येईल.

अर्थात वरील उदाहरणांमधील विद्यापीठांची स्थापना होऊन सुमारे ८०० ते ९०० वर्षे आणि मुद्रणालयांची निर्मिती होऊन जवळजवळ ५०० वर्षे उलटून गेली आहेत. त्यामुळे स्थापना होऊन जेमतेम ७५ वर्षे पुर्ण झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय यांची तुलना या परदेशातील विद्यापीठांशी करणे योग्य ठरणार नाही. पण जागतिक क्रमवारीमध्ये पहिल्या ५०० किंवा भविष्यात पहिल्या १०० विद्यापीठांच्या यादीत आपण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव यावे अशी अपेक्षा करीत आहोत; तसेच ग्रंथ प्रकाशन, नियतकालिके प्रकाशन यावर जर विद्यापीठ मुद्रणालयाने भरीव काम केले तर ती बाब क्रमवारी उंचावण्यासाठी सहाय्यकारी ठरेल. त्यासाठी जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे सहकार्य, विद्यापीठ प्रशासनाचे धोरणात्मक मार्गदर्शन आणि सुरुवातीच्या काळात आर्थिक पाठबळ यांची गरज भासेल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मुद्रणालय आणि जयकर ज्ञानस्रोत केंद्र परस्पर सहकार्य आणि सहयोगाने ज्ञानसाधनांची निर्मिती आणि ज्ञानाचा प्रसार याबाबतीत काही पावले नक्कीच पुढे टाकू शकतील असा विश्वास वाटतो.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय या दोन विभागांना पुढील बाबतीत परस्पर सहकार्य करता येईल :**

**१. ग्रंथालय आणि महितीशास्त्र अभ्यासक्रम आणि विद्यापीठ मुद्रणालय :**

ग्रंथालय आणि महितीशास्त्र या विषयाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये ग्रंथ छपाई, ग्रंथ बांधणी, ग्रंथेतर साहित्य, संगणकाशी संबंधित DTP तंत्रज्ञान असे उपविषय आहेत. हे विषय शिकविण्यासाठी

विद्यापीठ मुद्रणालयातील प्रशिक्षित व या विषयांतील तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करता येऊ शकते. तसेच विद्यार्थ्यांना मुद्रणालयातील प्रात्यक्षिकांद्वारे छपाई व बांधणी संबंधी प्रत्यक्ष अनुभवही घेता येऊ शकेल.

**२. ज्ञानस्रोत केंद्रातील दुर्मिळ ग्रंथांचे पुनर्मुद्रण :**

जयकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये अनेक दुर्मिळ पुस्तके, ग्रंथ, नामवंत व्यक्तींचा जुना पत्रव्यवहार, प्राचीन पोथ्या अशी संशोधकांना आवश्यक ग्रंथ आणि ग्रंथेतर ज्ञानसाधने आहेत. परंतु ती दुर्मिळ तसेच हाताळली गेल्यास खराब होणार असल्याने देवघेव करता येणे शक्य नसते. अशा साहित्याचे copyright पडताळून ते जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय यांच्या सहयोगाने पुनर्मुद्रित करून त्याचे वितरण करणे शक्य होऊ शकते. याबाबत जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय यांनी पुढाकार घेऊन विद्यापीठाच्या मदतीने काही पुस्तकांचे पुनर्मुद्रण केले आहे. विद्यापीठाच्या मुद्रणालयाने स्वतः प्रकाशित केलेली नवीन पुस्तके आणि नव्याने पुनर्मुद्रित केलेली पुस्तके यांच्या वितरणाचे (विक्रीचे) कामही विद्यापीठ मुद्रणालयाद्वारेच केले जात आहे. जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय या दोन्ही विभागांनी एकत्र येऊन हे काम केले तर ते आणखी व्यापक स्वरूपात करता येईल.

**३. विद्यावाचस्पती (Ph.D.) संशोधन प्रबंध व अहवालांचे मुद्रण, छपाई व बांधणी :**

जयकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये जतन करून ठेवलेले Ph.D. संशोधन प्रबंध, विद्यापीठातील विविध विभागांमध्ये संपन्न होणाऱ्या seminar व conference चे अहवाल, तसेच त्यात सादर केलेले संशोधन निबंध, किंवा निरनिराळ्या Project चे अहवाल इत्यादींचे मुद्रण, छपाई, बांधणी आणि वितरण यासाठी जयकर ज्ञानस्रोत केंद्र व विद्यापीठ मुद्रणालय एकत्र येऊन ही सामग्री सर्वसामान्य नागरिक आणि संशोधक वाचकांपर्यंत पोहचवू शकतील. सद्यस्थितीमध्ये जयकर ज्ञानस्रोत केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सादर केलेले आत्तापर्यंतचे सर्व Ph.D.चे संशोधन प्रबंध INFLIBNET च्या Shodhganga या संकेतस्थळावर upload केलेले आहेत. अशाच प्रकारे मुद्रणालय आणि जयकर ज्ञानस्रोत केंद्र मिळून विद्यापीठासाठी स्वतःचे स्वतंत्र Portal विकसित करून त्यावर विद्यापीठातील सर्व प्रकारची संशोधने, संशोधन निबंध, विविध संशोधन प्रकल्पांचे अहवाल प्रसिद्ध करू शकतील.

**४. प्रकाशन संस्था म्हणून मासिके, साहित्यिक व शैक्षणिक नियतकालिकांचे (जर्नल्स) प्रकाशन :**

अनेक परदेशी विद्यापीठांप्रमाणे जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय यांच्या समन्वयाने नियतकालिके प्रकाशित केली जाऊ शकतील. विद्यापीठातील प्रत्येक विद्याशाखेतील किंवा प्रत्येक विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या संशोधन निबंधांचे, संशोधन अहवालांचे Plagiarism तपासणी आणि Copyright बद्दलचे काम जयकर ज्ञानस्रोत केंद्र करू शकेल. त्यामधून निवडलेल्या संशोधन निबंधांच्या मुद्रण, छपाई आणि बांधणीचे काम करून प्रत्येक विषयाच्या नियतकालिके प्रकाशनाचे काम विद्यापीठ मुद्रणालय करू शकेल. नियतकालिक प्रकाशित झाल्यानंतर त्यांच्या वितरण आणि विक्रीचे काम जयकर

ज्ञानस्रोत केंद्र करू शकेल. अशा प्रकारच्या दोहोंच्या समन्वयातून प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधनाच्या प्रकाशनासाठी हक्काची प्रकाशन संस्था मिळेल. यामुळे जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या आणि विद्यापीठ मुद्रणालयाच्या आणि पर्यायाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नावलौकिकात भर तर पडेलच शिवाय विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लेखन संस्कृतीचा विकास होऊन विद्यापीठातील संशोधन कार्यास गती मिळेल.

**५. विद्यार्थी व संशोधकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा :**

जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय यांच्या सहकार्याने विद्यार्थी, संशोधक तसेच प्राध्यापक यांच्यासाठी Academic Writing and Publication, Library Research Tools, Copyright and Plagiarism, Thesis Publication, Know Your Library Subscriptions अशा विविध विषयांच्या कार्यशाळांचे आयोजन करता येईल. जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय यांच्या संयुक्त विद्यमाने अशा विषयांवरील व्याख्याने आणि प्रात्यक्षिके या माध्यमातून या कार्यशाळा यशस्वी होतील. अशा प्रकल्पांमुळे जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील Online Resources बद्दल आणि त्यांच्या वापराबद्दल विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक यांना योग्य माहिती मिळून डिजिटल शिक्षणास चालना मिळेल.

**६. ग्रंथ प्रदर्शन आणि प्रकाशन मेळाव्यांचे आयोजन :**

जयकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये विद्यापीठ मुद्रणालयाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे, मासिकांचे, नियतकालिकांचे प्रदर्शन आयोजित करावे. त्याचप्रमाणे मुद्रणालयाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या, मासिकांच्या, नियतकालिकांच्या प्रकाशनाचे आयोजन जयकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये करता येईल. त्यामुळे मुद्रणालयाने प्रकाशित केलेले ज्ञानसाहित्य विद्यार्थी व संशोधकांना ज्ञात होईल. अशा प्रकारच्या साहित्य निर्मितीमध्ये त्यांचा सहभाग वृद्धिंगत होईल. जयकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये 'लेखक आपल्या भेटीला', 'प्रकाशक भेट', 'व्याख्यानमाला' ग्रंथप्रदर्शने, यासारखे कार्यक्रम दरवर्षी आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमध्ये विद्यापीठ मुद्रणालय सहभागी होऊ शकते आणि अशा प्रकारच्या आणखी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावू शकते.

**७. डिजिटलायझेशन व ई-प्रकाशन :**

जयकर ज्ञानस्रोत केंद्रातील काही दुर्मिळ ग्रंथ, प्राचीन दस्तऐवज, अभिलेख यांचे डिजिटलायझेशन जयकर ज्ञानस्रोत केंद्राने केलेले आहे. जयकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संकेतस्थळावर वाचकांसाठी ते उपलब्धही करून दिलेले आहे. जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय या दोन्ही विभागांचे तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ एकत्र येऊन डिजिटलायझेशन आणखी व्यापक स्वरूपात करता येईल. यासाठी जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय यांच्या एकत्रित सहकार्याने E-Archives (ई-पुराभिलेख) किंवा Open Access Portal विकसित करुन त्याद्वारे विद्यापीठ E-Publications (ई-प्रकाशने) निर्मिती व वितरण याबाबतीतही ठोस पावले ऊचलता येतील.

### ८. विद्यापीठ मुद्रणालयाची व्यापकता वाढविणे :

अनेक परदेशी विद्यापीठांत मुद्रणालयांच्या जगातील विविध देशांत शाखा असतात. जसे, Oxford University Press च्या न्यूयॉर्क अमेरिका, ऑस्ट्रेलिया, यु.के, नवी दिल्ली भारत, पाकिस्तान, चीन, हाँगकाँग, सिंगापूर येथे शाखा आहेत. Cambridge University Press च्या यु.के, यु.एस.ए., ऑस्ट्रेलिया, नवी दिल्ली भारत, सिंगापूर अशा ३० हून अधिक देशांमध्ये शाखा आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचीही महाराष्ट्रातील अहिल्यानगर आणि नाशिक येथे विभागीय कार्यालये आहेत. तसेच पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर येथील सुमारे ११०० हून अधिक महाविद्यालये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित आहेत. त्यातच आता नव्याने परदेशातही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शाखा स्थापन झालेल्या आहेत. विभागीय कार्यालये, परदेशातील शाखा आणि संलग्नित महाविद्यालये या सर्वांच्या सहकार्याने विद्यापीठ मुद्रणालयाची व्यापकता वाढविता येणे शक्य आहे. यांच्या सहकार्याने, मुद्रणासाठी आवश्यक संशोधन साहित्याची उपलब्धी, साहित्यनिर्मिती, त्याचे मुद्रण आणि वितरण या सर्व बाबतीत अधिक संशोधक व अधिक वाचकांपर्यंत पोहोचणे शक्य आहे.

### समारोप :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ QS World University क्रमवारीमध्ये २०२६ या वर्षात जगात ५६६ व्या क्रमांकावर आले आहे. जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय यांनी एकत्र येऊन विद्यापीठाची स्वतःची अधिकाधिक प्रकाशने निर्माण करण्यावर भर दिला तर जागतिक क्रमवारीत विद्यापीठाला आणखी वरच्या स्थानावर नेण्यासाठी नक्कीच मदत होईल.

जयकर ज्ञानस्रोत केंद्र आणि विद्यापीठ मुद्रणालय या दोन्ही ज्ञानाभिमुख संस्था आहेत. त्यांनी परस्पर समन्वय साधून कार्य केले, तर विद्यापीठाच्या ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानप्रसाराच्या कार्यात निश्चितच भर पडेल.



**प्रा. नितीन पाटील**
संचालक, माहिती तंत्रज्ञान सेवा विभाग

# छापखाना आणि कृत्रिम बुद्धिमत्ता : दोन विचारक्रांतींचा समांतर प्रवास

मानवी इतिहासात काही तांत्रिक शोध असे आहेत ज्यांनी केवळ आपले जीवन सोपे केले नाही, तर आपल्या विचारसरणीलाच सखोलपणे बदलून टाकले. यापैकी छापखाना (Printing Press) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) हे दोन क्रांतिकारी शोध आहेत, ज्यांनी ज्ञानाशी असलेल्या आपल्या संबंधात मूलभूत बदल घडवले.

१५ व्या शतकात जोहान्स गुटेनबर्गने लावलेल्या छापखान्याच्या शोधामुळे माहितीच्या वितरणाचे स्वरूपच बदलून गेले. यामुळे पुस्तके, धार्मिक ग्रंथ, वैज्ञानिक प्रबंध आणि वैचारिक लेख लाखो लोकांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. या सहज उपलब्धतेने वैचारिक स्वातंत्र्याला चालना दिली, सामाजिक चळवळींना बळ दिले आणि शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केला, ज्यामुळे जनतेला माहिती मिळण्याचा हक्क प्राप्त होऊन लोकशाहीचा पाया अधिक मजबूत झाला.

आजच्या युगात AI ही दुसरी क्रांती ठरते. या तंत्रज्ञानाने संगणकांना मानवी बुद्धिमत्ता आणि निर्णय घेण्याची क्षमता दिली आहे. वैद्यकीय क्षेत्रात निदानाच्या अचूकतेपासून ते उपचारांमध्ये सुधारणा करण्यापर्यंत, तसेच AI ट्यूटर्स, वैयक्तिक अभ्यासक्रम आणि आभासी सहाय्यकांद्वारे शैक्षणिक पद्धतींमध्ये क्रांती घडवण्यापर्यंत याचा प्रभाव दिसून येतो. याव्यतिरिक्त व्यवसाय, कृषी, वाहतूक, आणि अगदी कला व संगीतासारख्या क्षेत्रांमध्येही AI महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

छापखाना आणि AI या दोन्ही शोधांचा एक मोठा वारसा आहे. त्यांनी माहिती, ज्ञान आणि बुद्धिमत्ता याबद्दलच्या समाजाच्या संकल्पनांनाच नव्याने परिभाषित केले आहे. छापखान्याने ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचवले, तर AI आता वैयक्तिक बौद्धिक सहाय्याची क्षमता प्रदान करते. माहिती केवळ एक स्रोत नसून, AI माहितीचे सखोल विश्लेषण करणारा आणि अर्थ लावणारा बनले आहे.

AI तंत्रज्ञानाचा जगभरात वेगाने विस्तार होत असताना ते अनेक नवीन संधी घेऊन येत असले तरी, सोबतच काही गंभीर आव्हानेही निर्माण करत आहे. यातील एक प्रमुख चिंता म्हणजे रोजगारावर होणारा

परिणाम. विशेषतः पुनरावृत्तीची कामे करण्यासाठी मानवी श्रमाची गरज कमी होत असल्याने, बेरोजगारी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याव्यतिरिक्त AI च्या वाढत्या वापरामुळे डेटा सुरक्षेचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत, ज्यामुळे वैयक्तिक माहितीची गोपनीयता आणि संरक्षण अत्यंत संवेदनशील मुद्दा बनला आहे.

याहूनही महत्त्वाचे आणि गंभीर आव्हान म्हणजे यंत्रांच्या निर्णयक्षमतेवर अवलंबून राहणे. जसा AI प्रणाली स्वतःहून निर्णय घेऊ लागते, तसतसे त्या निर्णयांची पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यावर प्रश्नचिन्ह उभे राहते. AI मध्ये वापरल्या जाणाऱ्या डेटामधून नकळतपणे पूर्वग्रह तयार होऊ शकतात आणि हे पूर्वग्रह एखाद्या विशिष्ट समाज, वर्ग किंवा व्यक्तीसाठी अन्यायकारक ठरू शकतात. याशिवाय यंत्रांना मानवी भावना, संवेदना किंवा सांस्कृतिक मूल्यांची समज नसल्यामुळे, AI प्रणालींमध्ये नैतिक मूल्ये आणि मानवी विवेक दुर्लक्षित होण्याची भीती आहे.

**या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अनेकस्तरीय उपाययोजना करणे आवश्यक आहे :**

- जागरूकता : वापरकर्त्यांनी AI चा वापर कसा होतो आणि त्याचे काय परिणाम होऊ शकतात, याची सखोल माहिती आणि जाणीव ठेवणे महत्त्वाचे आहे.
- कायदे आणि धोरणे : मानवी हक्कांचे रक्षण करणारे आणि AI च्या वापराला योग्य दिशा देणारे विशेष कायदे आणि नियम तयार करणे गरजेचे आहे.
- सामाजिक सहभाग : AI च्या विकासाशी संबंधित तांत्रिक निर्णयप्रक्रियेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे, जेणेकरून विविध दृष्टिकोन विचारात घेतले जातील.

ज्याप्रमाणे छापखान्याने माध्यम क्षेत्रासाठी नियम आणि आचारसंहिता स्थापित केली, त्याचप्रमाणे AI साठीही स्पष्ट आणि ठोस नियम असणे अपरिहार्य आहे.

छापखाना आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही दोन्ही मानवी बुद्धीच्या उत्क्रांतीचे दोन महत्त्वपूर्ण टप्पे आहेत. छापखाना हे जरी माहितीच्या प्रसारासाठी क्रांतिकारी साधन ठरले असले, तरी त्याचे कार्य मुख्यतः माहिती पोहोचवण्यापुरते मर्यादित होते. त्याच्या माध्यमातून लोकांपर्यंत ज्ञान पोहोचवले गेले, विचारांचा प्रसार झाला, आणि सामाजिक-राजकीय क्रांतींना गती मिळाली. याउलट कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक अशी प्रणाली आहे जी केवळ माहिती स्वीकारत नाही, तर ती माहिती विश्लेषित करते, तिच्यावर विचार करते आणि निर्णय घेण्यास सक्षम असते. त्यामुळे AI ही एक केवळ माध्यम नसून स्वतःच एक कार्यशील, निर्णायक घटक आहे.

या दोघांमधील हाच मूलभूत फरक अत्यंत महत्त्वाचा आहे. AI च्या वापरामुळे जेव्हा यंत्रणा मानवी निर्णयक्षमतेला पर्याय देऊ लागतात, तेव्हा त्याचा उपयोग करताना अधिक काळजी, जबाबदारी आणि नैतिकतेची गरज भासते. आज मानवाच्या हातात अशा अत्याधुनिक प्रणाली आल्या आहेत; ज्या केवळ माहितीची देवाणघेवाण करत नाहीत, तर सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक निर्णयांवरही प्रभाव टाकतात.

त्यामुळे जर या शक्तींचे नियमन स्पष्ट आणि मूल्याधारित नसेल, तर त्या दिशाभूल करणाऱ्या, असमानता वाढवणाऱ्या आणि विनाशकारी ठरू शकतात.

यासाठी आवश्यक आहे की, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आणि वापर हा केवळ तांत्रिक क्षमतांपुरता मर्यादित न राहता, तो स्पष्ट नैतिक चौकटीत घडवावा. तिचा उपयोग लोकशाही मूल्यांचा सन्मान राखून, समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि ज्ञान-आधारित समावेशक विकासासाठी व्हावा. मानवाने निर्माण केलेल्या या बुद्धिमत्तेचा वापर अखेरीस मानवतेच्याच भल्यासाठी होणेहीच खरी प्रगती आणि जबाबदार तंत्रज्ञानाची ओळख ठरेल.




## डॉ. मुंजाजी रासवे

उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश


# विद्यापीठ मुद्रणालय एक सेवा विभाग म्हणून महत्त्वाची भूमिका

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालयास ७५ वर्षे पूर्ण होत असल्याचे समजले, याबद्दल मला मनस्वी आनंद आहे. तत्कालीन पुणे विद्यापीठाने (सध्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) ७५ वर्षापूर्वी स्थापन होऊन नुकताच आपला अमृत महोत्सव साजरा केला. या निमित्ताने जवळपास वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले गेले.

विद्यापीठाच्या स्थापनेबरोबरच शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यास पूरक अशा बऱ्याच गोष्टींची निर्मिती/स्थापना झाली. काळाच्या ओघात यातील काही बंद झाल्या, काही अद्ययावत झाल्या तर काही नव्याने सुरूही झाल्या. यापैकीच विद्यापीठ मुद्रणालय हा विद्यापीठाचा अविभाज्य भाग होय.

विद्यापीठ मुद्रणालयाची स्थापना किंवा निर्मिती ही विद्यापीठ स्थापनेच्या नंतर लगेच झाली त्यावेळी आताच्यासारखी छपाईची अद्ययावत यंत्रणा उपलब्ध नव्हती. म्हणून जी काही छपाई व्हायची ती मुद्रणालयातच करावी लागे. यामध्ये वेगवेगळे अर्जाचे नमुने, अध्ययनाची पुस्तके, वेगवेगळ्या सभांची कार्यक्रम पत्रिका, इतिवृत्त इत्यादी मुद्रणालयात छपाईच्या कामाव्यतिरिक्त बायडिंग, पेपर कटींग इत्यादीचे देखील काम केले जाते.

मी स्वत: ज्या-ज्या विभागांमध्ये काम केले त्या-त्या विभागातील कामकाजामध्ये मुद्रणालयाचे सहकार्य लाभले. गुणपडताळणी/पुनर्मूल्यांकनाचे अर्ज, मास्किंग पेपर व त्याचे कटींग, निकालाचे बाइंडिंग, मा. अधिसभा कार्यक्रम पत्रिका, इतिवृत्त छपाई व बाइंडिंग निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदार याद्या, वेगवेगळे अर्ज/प्रपत्र, मानपत्रिका व इतर आवश्यक अनेक गोष्टी मुद्रणालयात छपाई करून मिळाल्या, शिवाय वार्षिक अहवाल, शैक्षणिक पात्रतेचे पुस्तक छपाई वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी लागणारे बॅनर/फ्लेक्स छपाईसुद्धा मुद्रणालयाच्या मदतीने पूर्ण झाली.

विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील अध्यापन, संशोधन व विस्तारकार्यासाठी सेवा विभाग म्हणून विद्यापीठ मुद्रणालयाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विद्यापीठ मुद्रणालय हा सेवा विभाग असल्याने मुद्रणालयाचा सर्वच प्रशासकीय व शैक्षणिक विभागांशी संबंध येतो. मध्यंतरी विद्यापीठाने प्रकाशित केलेले दुर्मिळ ग्रंथ पुनर्मुद्रण करून जुनी ग्रंथसंपदा पुन्हा नव्या पिढीला मुद्रणालयाने उपलब्ध करून दिली आहे. बदलत्या काळात नवनवीन यंत्रणा आत्मसात करीत विद्यापीठ मुद्रणालय मोलाची भूमिका साकारत आहे.




## डॉ. मधुरा महाजन

विभागप्रमुख, प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग
पीव्हीजीचे कॉलेज ऑफ इंजि. ॲण्ड टेक्नो.


# ।। शिक्षण क्षेत्राच्या नव्या वाटा ।।

मी सौ. मधुरा महाजन सध्या पुणे विद्यार्थी गृहाच्या मुद्रण अभियांत्रिकी महाविद्यालयात विभागप्रमुख म्हणून काम पाहत आहे. १९९० ते १९९४ ह्या काळात ह्या महाविद्यालयातून पदवी घेतली ती BE in Printing Technology तिथूनच Master Degree आणि सध्या Ph.D. चे काम चालू आहे. नव्या शिक्षण क्षेत्राची निवड करताना होणारी धाकधूकही होती, पण आनंद ही तेवढाच झाला. ह्याच क्षेत्राबद्दल माझे मनोगत मी नव्या पिढीच्या विद्यार्थ्यांसमोर मांडणार आहे.

पुणे विद्यार्थी गृहाचे मुद्रण महाविद्यालय १९८५ मध्ये सुरू झाले. बघता बघता कॉलेजची चाळीशी पूर्ण झाली. १९७९ मध्ये पदविका कोर्स सुरू झाला. गेली २९ वर्षे ह्या कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. २०१८ पासून विभागप्रमुख म्हणून ची धुरा सांभाळत आहे.

सन २०२४–२५ मध्ये मुद्रण अभियांत्रिकी शाखेचे नामांकन प्रिंटिंग आणि पॅकेजिंग टेक्नॉलॉजी असे करण्यात आले. यामुळे हे महाविद्यालय प्रिंटिंग आणि पॅकेजिंग सेक्टरमधल्या नोकरीच्या नवनवीन संधी प्राप्त करून देते. हल्ली त्यामध्येही बरेच प्रयोग, संशोधन झाले आहेत. उदा. पॅकेज डिझाईन, पॅकेज डेव्हलप सेंटर, रिसायकलिंग आणि EPR म्हणजेच एक्सेटेंडेड प्रोड्युसर रिस्पॉन्सिबिलीटी यामध्ये आणि मटेरिअल सायन्स रिसर्च या क्षेत्रात नोकरीच्या आणि व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध होतील.

पुणे विद्यार्थी गृह आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचा जुना संबंध आहे. गेली १५ वर्षे मी विद्यापीठ प्रेसच्या टेक्नीकल ॲडव्हायजरी कमिटीमध्ये टेक्नीकल ॲडव्हायझर मेंबर म्हणून मी काम पाहते आहे. ह्या कमिटीवरती काम पाहताना मला विद्यापीठ प्रेसच्या बारिकसारीक गोष्टींची तसेच महत्त्वाच्या टेक्नीकल गोष्टींची त्याच्यात येणाऱ्या अडचींची कल्पना आली. त्यांना मदत केल्यामुळे थोडेफार त्यांच्यासाठी योगदान करण्याचे सार्थक लाभले.

३० वर्षे मी महाविद्यालयात काम करते आहे. या नवीन उद्योगक्षेत्रासाठी योगदान करता आले, ह्याचा अभिमान आहे. मुद्रण महाविद्यालयातील जडणघडणीत मला हातभार लावता आला. गेल्या १० वर्षांत सर्वांगीण असे प्रिंटिंग क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर झालेले बदल सर्वांनीच पाहिले आहेत. गेल्या ३ वर्षांतील बदल तर लक्षणीय आहेत.

अनेक डेटा कलेक्शन टेक्निकल विविध मशिनवर लावण्यात आली आहेत. ज्यामुळे दिवसभराचा डेटा कलेक्ट होऊन त्याचे विश्लेषण करून त्याच्या मदतीने प्रेडिक्शन करता येते. परिणामी त्याच प्रेडिक्शनचा दिवसभराच्या कामामध्ये करून घेता येतो. वेस्ट कंट्रोल, टाईम मॅनेजमेंट, कामाचे व्यवस्थित नियोजन करणे शक्य होते. प्रिंटिंगचा Color मॅनेजमेंट हा महत्त्वाचा भाग ज्याच्यामुळे कुठलाही गेल हा Accept किंवा Reject होऊ शकतो. Arti. Intel. च्या क्षेत्रातही ह्याचा मोठा सहभाग असणार आहे.

Printing च्या चार वर्षांच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रेसचा खूप मोठा वाटा आहे. तिथे कार्यान्वित असणारे प्रेस मॅनेजर डॉ. दत्तात्रय कुटे ह्यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली सध्याचे नवीन व समकालीन विषय जे प्रिंटिंग इंडस्ट्रीसाठी उपयुक्त आहेत आणि ज्याच्यामुळे विद्यार्थ्यांना लाभ होईल आणि जेणेकरून त्यांना नोकरीची संधी प्राप्त होईल, असे बहुमोल मार्गदर्शन विद्यापीठ प्रेसकडून मिळालेले आहे. डॉ. कुटे हे PVG च्या प्रिंटिंग कॉलेजचे विद्यार्थी आहेत हे सांगताना विशेष आनंद होतो.

आता आपण या क्षेत्रातील नवीन कोर्सेस सेच कलाकौशल्याच्या संधी ह्यांच्या बरोबरीने प्रिंटिंग क्षेत्रात झालेले नवनवीन बदल आणि स्पेशलायझेशनचा विचार करू.

ह्या क्षेत्रातील पदवी संपादन केल्यावर मला नमूद करावेसे वाटते की, उपलब्ध असणाऱ्या नोकरीतील विविध संधीमुळे ह्या स्पर्धेच्या युगातही एकही विद्यार्थी बेकार राहिला नाही. सर्वांना काम मिळाले. रोजगारही प्राप्त झालेत. यासाठी Printing क्षेत्रातील Experts नी बहुमोल कामगिरी पार पाडली आहे.

डिजिटल प्रिंटिंगची नवी टेक्नॉलॉजी, स्क्रीन प्रिंटिंग, Offset Gravure, Arti. Intel. उपयुक्त असे हे उद्योग आहेत. पदविका आणि पदवी अभ्यासक्रमासाठी उपयुक्त अशी ही नवी टेक्नोलॉजी प्रिंटिंग कॉलेजमध्ये Flecso Lab Computer and Software Lab ह्यांनी सुसज्ज प्रयोगशाळा आहेत. PVG नी १०वी नंतर पदविका आणि १२वी नंतर पदवी महाविद्यालयांनी उपलब्ध करून दिले आहेत. CET च्या निकालानंतर ह्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. कोणत्याही शोधाची जननी नावीन्याचा शोध असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाची दालने उघडून दिली आहेत.

विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे धाडस दाखविण्याच्या अनेक उपक्रमांत PVG नी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा. FESPA ह्या संस्थेकडे आपल्या विद्यार्थ्यांनी डिझाईन्स पाठवली आहेत. संस्थेने त्या डिझाईन्सचा स्वीकार करून विद्यार्थ्यांचा यथायोग्य सत्कार केला आहे. अशा प्रेरणादायी घटनांमुळे विद्यार्थ्यांना नेहमी PVG बद्दल आदर वाटतो.

नवीन पिढीसाठी एक सुंदरदायी विचार रविंद्रनाथ टागोर ह्यांनी सांगितला आहे. ते म्हणतात, तुमच्या मुलाला तुमच्या मनातील शिक्षणाच्या कल्पनेपुरते मर्यादित ठेवू नका. कारण तो वेगळ्या काळात जन्माला आला आहे. ज्ञानाची कवाडे त्याच्यासाठी उघडी आहेत. नवे तंत्रज्ञान, नवे क्षेत्र, नवी क्षितिजे, विकासाच्या नव्या वाटा, नव्या दिशा त्याला भुरळ घालताहेत.

आईवडिलांनी फक्त डोळसपणे त्याला क्षेत्र निवडण्यास मदत करावी. कदाचित नव्या वाटेवरून त्याला नवा मार्ग सापडेल. घेऊ दे त्याला नवी झेप. आईवडिलांनी फक्त दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश दाखवावा. आकाश त्याच्या भरारीची वाट पाहतेय.

# डॉ. शशिकांत दुधगावकर

आरोग्य अधिकारी



## ऋणानुबंध मुद्रणालयाचे व आरोग्य केंद्राचे

विद्यापीठात रूजू झाल्यावर तसा इतर विभागांशी फारसा संबंध येत नव्हता, कारण मी आरोग्य केंद्रात रूजू झालो होतो आणि आरोग्य केंद्राचे एकच काम म्हणजे रूग्ण पाहणे. प्रशासन विभागाशी संबंध फक्त रूजू होताना आलेला, नंतर फारसा नाही. मात्र एक विभाग ह्याला अपवाद होता जेथे मला रूजू होताच जावे लागले, तो म्हणजे प्रेस विभाग वा मुद्रणालय. रूजू झाल्यावर दोनचार दिवसांनी माझे स्टाफ मला म्हणाले आपल्याला प्रेसला जायचे आहे. म्हटले कशाला, तर उत्तर आले लेटरहेड व विझीटींग कार्ड करायला. त्यानंतर तेथे केसपेपर, चीटपॅड, ई., अशा अनेक कारणांसाठी जावे लागले. त्यात प्रेस म्हणजे आरोग्यकेंद्राच्या शेजारीच. त्यामुळे जाणे सोयीस्कर आणि सहज होते.

प्रेसचे ठिकाणच मुळात सुंदर होते. चारी बाजूने उंच झाडांमुळे गूढरम्य वाटायचा. त्यात तिथल्या असंख्य खोल्या व खोल्यांमधे पोहोचण्यासाठी असलेल्या बोळीवजा गल्ल्या, मशिन्स ठेवलेले मोठे व उंच छपराचे हॉल, मशिनची धडधड, हाती मोठे कागद घेऊन लगबगीने धावणारे कर्मचारी, एक वेगळेच जग होते ते. मला मात्र सर्वात आवडणारे काय असेल तर तो म्हणजे प्रेसमधे दरवळणारा ताज्या कागदाचा सुवास. तो सुवास नाकात शिरल्या शिरल्या शाळेची व बालपणाची आठवण यायची.

त्याकाळी असलेले लोक म्हणजे पाठक साहेब, निघोजकर, मुंडले, कसबे, प्रविण खैरकर आणि अनेक ज्यांची नाव आता लक्षात नाही. ही सर्व मंडळी निवृत्त झाली. जुन्या पठडीतील व कामाच्या बाबतीत प्रामाणिक व अनुभवाने समृध्द असलेली व किंचीतसाही अंहभाव नसलेली मंडळी म्हणजे प्रेसचा कणा होती. एखाद्या कामासाठी गेलो की मग गप्पा व्हायच्या. त्यातून प्रेसच्या कामाचे स्वरूप उलगडत गेले. कधी कधी आतली मोठी मशिन बघायला मिळायची. छापाईचे, कटींगचे व बायंडीगचे चाललेले काम बघायला मिळायचे. त्यातून कामाबरोबरच तिथले कर्मचारी सुध्दा उमजू लागले.

त्यातल्या त्यात पाठकसाहेबांबरोबर माझी चांगली मैत्री जमली. वयाने ते माझ्यापेक्षा वीसेक वर्षांनी मोठे असावेत पण त्यांनी ते अंतर कधीच जाणवू दिले नाही. त्यांच्या मधे तो वयाने आलेला पोक्तपणा नव्हता. प्रत्येक गोष्टीकडे ते बालसुलभ नजरेने पहायचे. आरोग्यकेंद्रातील घोडकेबरोबर त्यांची जुनी मैत्री होती. त्यामुळे

ते आमच्याबरोबर सहलींना येऊ लागले. अतिशय साधी व स्वच्छ व्यक्ती. खैरकर एक जिंदादिल व्यक्तिमत्व प्रसन्न व आनंदी चेहरा घेऊनच जन्माला आले असावेत. एक पेशंट म्हणून त्यांच्या कुटुंबाशी व खास त्यांच्या मुलाशी चांगले संबंध निर्माण झाले. आता कार्यरत असलेले श्री. नवनाथ शिंदे, श्री. संदीप पवार, डॉ. अशोक कुडले यांच्या बरोबर सुध्दा चांगले जमू लागले.

एक काळ होता की, विद्यापीठाची सर्व मुद्रणाची कामे प्रेसमधे होत होती. अगदी प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, पुस्तक, पीएचडी चे थीसीस, विविध विभागांची स्टेशनरी, लेजर, आउटवर्ड/इनवर्ड पुस्तके, नोंदवह्या, कार्यक्रमपत्रिका, पॅम्पलेट, लेटरहेड, विजीटींग कार्ड, ई.

तेथील कर्मचाऱ्यांचे असंख्य प्रश्न होते. त्यांची नेमणूक फॅक्टरी ॲक्ट नुसार झाली असल्यामुळे त्यांना निवृत्तिवेतन नव्हते. त्याबद्दल त्यांनी बराच लढा देऊन निवृत्तवेतन लागू करून घेतले. प्रेसमधले जुने कर्मचारी निवृत्त झाले तसेच नविन भरती नसल्यामुळे काम करणारे हात कमी झाले. कर्मचारी संख्या घटल्यामुळे कामावर परिणाम झालेलाच होता. त्यात काळ बदलला आणि काळाप्रमाणे काही कामे कमी झाली, तर काही आऊटसोर्स होऊ लागली. अशात काही वर्षांपूर्वी नवीन प्रेस मॅनेजर डॉ. दत्तात्रय कुटे यांची नेमणूक झाली. तरूण, होतकरू आणि नविन काही तरी करण्याची उमेद घेऊन आलेले असल्यामुळे प्रेसमधे परत एकता जोश संचारला. त्यांच्या काळात मलूल झालेल्या प्रेसला नवी संजीवनी मिळाली. विद्यापीठात इतर कामानिमित्त गाठी भेटी होऊ लागल्या आणि त्यांच्या कामाची पध्दत व धडाडी लक्षात आली. परत एकदा प्रेस गजबजू लागली. अर्थात प्रत्येक गोष्टीसाठी सुरूवात असते, मध्य असतो व अंतसुध्दा असतो. तंत्रज्ञान, ऑटोमेटशन, डिजीटायझेशन व एआय आल्यामुळे बऱ्याच पारंपरिक क्षमता व कुशलता आता अनावश्यक वाटू लागल्या आहेत. हे सर्वच क्षेत्रात चालू आहे परंतू मुद्रणालयांच्या बाबतीत जरा जास्त. जगभर मुद्रणालये बंद पडू लागलीत. काही आपल्या कामाचे स्वरूप बदलून व नवीन गरजांशी जुळवून घेत अस्तित्व टिकवून आहेत. विद्यापीठ प्रेसचे काम पूर्वीसारखे परत सुरू व्हावे, असे मनोमन कितीही वाटले तरी ते आता होईल का, हे मात्र माहीत नाही. एक प्रचंड कार्य केलेल्या विद्यापीठाच्या ह्या विभागाला गतवैभव प्राप्त होईल का हे मात्र कोणीच सांगू शकत नाही. बदलत्या काळाबरोबर बऱ्याच गोष्टीची उपयुक्तता कमी होत जाते, व्यक्तींची सुध्दा.

विद्यमान प्रेसमॅनेजर डॉ. दत्तात्रय कुटे यांनी यासाठी बरेच कष्ट घेतले आहेत व बदलत्या काळाशी जुळवून घेत प्रेस परत एकदा चांगले काम करू लागली आहे. प्रेसला गतवैभव पुनः प्राप्त होवो ही मनोमन सदिच्छा व्यक्त करतो.



**श्री. संतोष धुरी**
सहाय्यक कुलसचिव, सभा व दप्तर विभाग

# विद्यापीठ मुद्रणालयाचा ७५ वर्षांचा गौरवशाली प्रवास

मी एक **म्हसोबा..**
अनादी.
अनंत..
बसलोय
इथे बोपोडीच्या पाटलाच्या माळावर.
यवनांशी दोन हात करून स्वराज्य निर्मिलेल्या मराठ्यांच्या राजधानीत,
अर्थातच पुण्यातील घडामोडी पाहतोय.
माझ्यासमोरच इथे खडकीमध्ये मराठे आणि इंग्रज लढाईसाठी उभे ठाकले.
पण, का कोणास ठाऊक, लढलेच नाहीत.
आणि इंग्रजांनी आपले साम्राज्य वाढवले.
एवढेच नाही तर नाकावर टिच्चून इथे उभारला आलिशान राजवाडा

मी मात्र शांतपणे बसून होतो, खिन्नपणे.

पुणे मात्र.. शांत नव्हते,
कुस बदलत होते.
याच पुण्यातल्या गोखल्यांचे, अहिंसा तत्त्व अंगीकारून, गांधीजींच्या पुढाकाराने स्वातंत्र्याच्या हक्काचे वारे वाहू लागले.
टिळक, आगरकर, फुले आणि कित्येकांच्या विचारधारांनी समाज जागृत होऊ लागला.
अन्, सुरू झाले शैक्षणिक उत्थान.

इंग्रजी शिक्षणपद्धती लादण्याचा परकीयांचा प्रयत्न सुरु होता. तर, दुसऱ्या बाजूने आपल्या गरजांनुरूप आधुनिक शिक्षणपद्धतीला आकार देण्याच्या धडपडीतून फर्ग्युसन कॉलेज, डेक्कन कॉलेज सारख्या शैक्षणिक संस्थांनी पाया रचला होता.

त्यात मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातूनही मराठी मातृभाषेसाठी प्रादेशिक विद्यापीठाची मागणी जोर धरू लागली.

स्वातंत्र्य मिळाले आणि त्याचबरोबर विद्यापीठाचीही स्थापना झाली, या माझ्या अंगणात.

मी मात्र शांत बसुन होतो,
हे सुवर्णयुग पाहण्यासाठी

१० फेब्रुवारी १९४९ साली पहिले कुलगुरू बॅरिस्टर जयकर यांनी माझ्या प्रांगणात, १२ जिल्ह्यातल्या २३ महाविद्यालयांना सोबत घेऊन सुरु केलेला हा विद्यापीठाचा ज्ञानयज्ञ, आजचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्यापर्यंत दोन उपकेंद्र, तीन जिल्हे आणि १००० पेक्षा जास्त महाविद्यालये/संस्थांमधून अविरत सुरू आहे. त्याचबरोबर हे विश्वची माझे घर म्हणत लेहलडाख आणि कतार येथेही विस्तार केलाय.

देशातीलच नव्हे तर जगभरातील विविध देशातील विद्यापीठेही विविध करारांद्वारे या ज्ञान यज्ञात सहभागी झालेत.

**मी मात्र शांतपणे बसून आहे,**
**या ज्ञानयज्ञाचा साक्षिदार बनून..**

मला आठवतय...

विद्यापीठ सुरु झालं तेव्हा सामान्य नागरिकांनी आपली तुटपुंजी रक्कम विद्यापीठाच्या उभारणीसाठी लावली होती. आज राजकुमार राठींसारखे किती तरी मोठे उद्योजकही दिलदारपणे पुढे येताहेत, मरणाअगोदर आपल्या संपत्तीची आहूती या ज्ञानयज्ञात अर्पण करण्यासाठी.

इथे राज्य करणाऱ्या इंग्रजांनी त्यांच्या घराण्याचे ठसे इमारतीवर कोरलेत.

मात्र कुलगुरूंना, इथल्या प्राध्यापकांना, इथल्या विद्यार्थ्यांना तसे करावेच लागले नाही. त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाचे ठसे उमटवलेत जनामनावर आणि देशाच्या शैक्षणिक प्रगतीवर.

विद्यापीठाचा विस्तार वाढतोय. नवीन नवीन विषय, कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान साऱ्या साऱ्यांची दालने उभारलीत इथे आणि त्यासाठी कार्यरत विद्वज्जनांचा राबताही वाढलाय.

मराठीबरोबरच इतरही विविध देशी विदेशी भाषा, विज्ञानाच्या साऱ्या वाटा त्याचबरोबर समाजशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्रही या विद्यापीठाला आता नवीन नाहीत.

पारंपरिक शिक्षण/संशोधनाबरोबरच नावीन्याची कास धरत जागतिक स्तरावर सिद्ध करण्यासाठी आंतर विद्याशाखीय अभ्यास, लिबरल, ब्लेंडेड अभ्यासक्रमाबरोबरच नवे नवे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्याशी झुंजण्याची आघाडीही इथे उभारली जातेय.

मी मात्र शांत बसून आहे, बसूनच सारं विश्व बदलल्याची जाणीव होतीये.

बघतोय मी,

मराठी मातीत भीमपराक्रम गाजवणारे मराठ्यांचे सरदार आणि संस्थानिकही या ज्ञानयज्ञात सहभागी झालेले..

भोर संस्थांनचे पंतसचिव यांनी आपल्याकडील पाश्चात्य शिल्पकृती तसेच शस्त्रागार विद्यापीठाकडे सुपूर्द केले.

अन्, स्थापत्यशास्त्र, कला आणि इतिहासाच लेण लेऊन इंग्रजांचा राजवाडा ज्ञानाचा राजगड झाला.

फलटणचे राजे नाईक-निंबाळकर यांनी आपल्याकडील राज मुद्रणालय विद्यापीठाकडे सोपवलं.

राजेंच्या मुद्रणालयातील अठरापगड जातींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कर्मचाऱ्यांसमवेत मुद्रणालय या परिसरात सुरू झाले. कर्मठ पुण्याची दुष्कीर्ती पुसून एका संस्कृतीमधून, दुसऱ्या संस्कृतीच्या संक्रमणास सुरुवात झाली समतेची कास धरून.

ज्ञानयज्ञास रसद पुरविण्याच्या महत्वाचे कामास गती मिळाली

भांडारकरांची ग्रंथसंपदा विद्यापीठाच्या गंगाजळीला प्राप्त झाली प्रचंड मोठ ग्रंथालय इथे उभं राहिलं आणि साऱ्या विश्वाची ज्ञान गंगा माझ्या अंगणी आली.

नुसत पुस्तकी ज्ञानच नाही, तर त्याबरोबरच अंतरजाल आणि तंत्रज्ञानाची जोड देता-देता ग्रंथालयाचे ज्ञानस्त्रोत केंद्र कधी झालं कळालच नाही.

या ज्ञान स्त्रोताच्या गंगेत नाहून निघत, कित्येकांनी आपले संशोधन जगापुढे मांडले.

बहि:शाल शिक्षण सारख्या माध्यमातून वंचितांनाही जवळ केलं.

स्पर्धा परीक्षांतून कित्येक प्रशासकीय अधिकारी इथे घडलेत आणि देशाचा गाडा हाकत आहेत.

युवा संशोधकांना उत्तेजन देणारी आविष्कार, तसेच युवाशक्तीला दीपस्तंभ ठरलेल्या अश्वमेध, इंद्रधनुष्य सारख्या स्पर्धांचं आयोजन इथे झालयं.

वेगवेगळ्या कालखंडात तीन वेळेस भारतीय विज्ञान काँग्रेसचे अधिवेशन इथे साकारलं. त्या माध्यमातून साऱ्या देशभरातून शास्त्रज्ञांचा मेळा इथे भरला होता.

वसुधैव कुटुंबकमच्या सुरात जी वीस राष्ट्र समूहाच्या परिषदांचे यजमानपद भूषवताना साऱ्या जगातील दिग्गजांची पावले इकडे वळली.
आणि देशातील दिग्गज शैक्षणिक संस्थांच्या पंगतीमध्ये हे पारंपरिक विद्यापीठ केव्हा जाऊन बसलं हे कळलच नाही.

मी मात्र शांतपणे बसून आहे,
हे विद्यापीठ आपल्या परंपरा जपताना समाजाभिमुख होताना पाहतोय.

आठवलं, महाराष्ट्रातील दिग्गज कवी परंपरेतील रवीकिरण मंडळाच्या सदस्यांचा विद्यापीठाच्यावतीने सत्कार करण्यात आला होता.
परवा आधुनिक मराठीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या देशभरातील कवींचे संमेलन भरवलं. तेही पुण्याच्या मध्यवर्ती ठिकाणी. तिथल्या रसिकांच्या टाळ्यांचा कडकडाट मला इथेही ऐकू येतोय.
मागील कुलगुरूंनी वारीच्या पालख्यांचे स्वागत करायला सुरुवात केली. अन, वारकऱ्यांच्या भक्तिगंगेला ज्ञानगंगा भेटू लागली. आता सारे शिष्यगण निर्मलवारी हरितवारी म्हणत वारीबरोबर पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती आणि स्वच्छतेचे धडे देताना भक्ती आणि ज्ञानगंगा एकत्रित प्रवाहित होत आहेत.
हेलसिंकी ऑलिंपीक स्पर्धेत विद्यापीठाचा विद्यार्थी खाशाबा जाधव यांनी पहिल्या वैयक्तीक पदाकाचं खातं खोललं. त्यांच्या नावानेच विद्यापीठात क्रिडासंकुल उभ राहीलंय आणि आज या विद्यापीठाच्या मुशितून निर्माण झालेले खेळाडू देशाचे हिरो बनताहेत.
पुणे विद्यापीठाच्या नावातील पुण्यनगरीचे स्थानमहात्म्य जपताना आपल्या नावापुढे आईच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच नाव लावायला सुरूवात केली. अन माझी छाती खरंच भरून आली.

मी मात्र आजही शांतपणे बसलोय.

पाहतोय या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबरोबर ज्ञानयज्ञाच्या नव्या पर्वाला सुरुवात करताना



## डॉ. अशोक कुडले

लेखपट यंत्रप्रमुख, विद्यापीठ मुद्रणालय


# मध्ययुगीन ते आधुनिक काळातील मुद्रण उत्क्रांती

मुद्रणप्रक्रियेस 'कला' व 'तंत्रज्ञान' अशा दोन्ही स्वरूपात पाहिले जाते. मुद्रण करावयाच्या लेखनसाहित्याची, आशयाची कलात्मक निर्मिती व साचेबद्ध मांडणी करून मोठ्या प्रमाणात दर्जेदार मुद्रण करण्यासाठी मुद्रण तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. काळाच्या ओघात विविध स्थित्यंतरांतून गेलेल्या या मुद्रणकलेचा व तंत्रज्ञानाचा वापर ''मौल्यवान अशा ज्ञानाचा ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द करण्याहेतुस्तव'' शतकानुशतके केला जात आहे.

**मुद्रण तंत्रज्ञानातील प्रमुख टप्पे**

मानवी इतिहासात मुद्रणकलेस असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळाच्या सुरुवातीपर्यंत विविध ग्रंथ, पुस्तके, काव्य, प्रवासवर्णन इत्यादींच्या मुद्रणाचे साधन म्हणून हस्तलिखितांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असे. मध्ययुगीन काळात (५व्या ते १५व्या शतकादरम्यान) पूर्व आशियामध्ये विशेषतः चीनमध्ये ९व्या शतकाच्या सुमारास मुद्रणासाठी लाकडी ठोकळ्यांचा उपयोग केला जात होता. तद्नंतर याचा प्रसार युरोपात होऊन १५व्या शतकाच्या सुमारास जर्मनीतील **जोहानस गटेनबर्ग** (Johannes Gutenberg) याने सर्वप्रथम मुद्रण तंत्रज्ञानाचा आविष्कार केला. गटेनबर्ग याने १४४८च्या दरम्यान शिसे या धातूपासून तयार केलेल्या 'मूव्हेबल टाइप' व तेलमिश्रित शाईचा वापर करून 'लेटरप्रेस' छपाईचे प्राथमिक तंत्रज्ञान विकसित केले. यामुळे हस्तलिखितांच्या तुलनेत दर्जात्मक व संख्यात्मक सुधारणा होऊन अक्षरजुळणी व छपाई अतिशय वेगाने होऊ लागल्यामुळे मुद्रणाचा दर्जा व वेग यामध्ये कमालीची वाढ झाली. यानंतरच्या काळात मुद्रण प्रक्रियेत अनेक तांत्रिक बदल होत गेले. या तंत्रज्ञानाचा पुढचा टप्पा म्हणजे 'ट्रेडल' (Traedle) या लेटरप्रेस तंत्रज्ञानाधारित छपाई यंत्राचा आविष्कार. अमेरिकेतील ओहायो प्रांतातील क्लीवलँड येथील **हॅरिसन चँडलर व विल्यम प्राइस** यांनी १८८१ मध्ये स्थापन केलेल्या 'चँडलर अॅण्ड प्राइस' या कंपनीने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या सुरुवातीस Platen Press या तंत्रज्ञानावर आधारित जुन्या व नव्या पिढीतील ट्रेडल लेटरप्रेस मशीन विकसित केली.

**ऑटमर मर्गेथॅलर** (Ottmar Mergenthaler) याने १८८४ मध्ये 'लिनोटाइप', ज्याला 'लायनोटाइप' असेही म्हटले जाते, या मुद्रण तंत्रज्ञानात क्रांती करणाऱ्या मशीनचा शोध लावला. यात पूर्ण ओळीचे टाइपसेटिंग (अक्षरजुळणी) व टाइप कास्टिंग मशीनद्वारे होत असे. या मुद्रण तंत्रज्ञानामुळे 'टाइपसेटिंग'चा वेग व अचूकता यामध्ये आमूलाग्र सुधारणा झाली. यापूर्वी अक्षरजुळणी हाताने होत असे त्यामुळे अक्षरजुळणीचा वेग तुलनेने कमी होता; परंतु या शोधामुळे अक्षरजुळणी मशीनद्वारे होऊ लागल्याने कामाचा वेग कित्येक पटीने वाढला. अशाच प्रकारच्या 'मोनोटाइप कंपोझिशन' मशीनचा शोध अमेरिकेतील **टॉल्बर्ट लँस्टन** (Tolbert Lanston) याने १८८५ मध्ये लावला. यात मात्र टाइप सेटिंग की-बोर्ड व मोनो कास्टिंग मशीन वेगवेगळी असून लिनोटाईपप्रमाणे पूर्ण ओळीचे कास्टिंग न होता प्रत्येक टाइप (अक्षर) स्वतंत्रपणे सेट व कास्ट केला जात असे. यात मोनो ऑपरेटिंग मशीनवर टाइप केलेल्या मजकुराप्रमाणे जुळणीस्वरूपात विविध अक्षरांचा 'टाइप' कास्टिंग मशीनमध्ये शिसे या धातूला उच्च तापमानाला वितळवून 'कास्ट' होऊन पुस्तकाचे एक पूर्ण पृष्ठ 'कंपोज' होत असे. अशा 'मोनोटाइप' किंवा 'लिनोटाइप' व 'लेटरप्रेस' या मुद्रण तंत्रज्ञानाच्या एकत्रित वापरामुळे १८व्या व १९व्या शतकात पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादींची मोठ्या प्रमाणात दर्जेदार छपाई करणे शक्य झाले. नंतरच्या काळात प्रचलित झालेल्या 'ऑफसेट' तंत्रज्ञानाची सुरुवात 'लिथोग्राफी' या तंत्रज्ञानाच्या आविष्कारामुळे झाली. याचा शोध जर्मनीमधील **जोहान अलोइस सेनेफेल्डर** (Johann Alois Senefelder) याने १७९६ मध्ये लावला. या शोधामुळे छपाईच्या तंत्रज्ञानात आमूलाग्र सुधारणा होऊन पूर्वीपेक्षा अधिक वाजवी खर्चामध्ये व मोठ्या संख्येत छपाई होऊ लागली.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस व नंतरच्या काळात प्रथम पाश्चिमात्त्य व नंतर आशियाई देशांमध्ये 'ऑफसेट' या सुधारित तंत्रज्ञानाचा वापर छपाईसाठी केला जाऊ लागला. आधुनिक ऑफसेट छपाईचे मूळ १९व्या शतकात आढळते. इंग्लंडच्या **रॉबर्ट बार्क्ले** (Robert Barclay) याने १८७५ मध्ये सर्वप्रथम पूर्वीच्या 'लिथोग्राफी' तंत्रज्ञानाप्रमाणे 'लाइमस्टोन'पासून तयार केलेल्या 'फ्लॅट प्लेट'वर 'इंक ॲप्लिकेशन' व 'प्रेशर टेक्नीक'द्वारे थेट कागदावर छपाई न करता कार्डबोर्डचे वेष्टन असलेल्या धातूच्या ऑफसेट सिलेंडरवर 'इमेज ट्रान्सफर' करून कागदावर छपाई करण्यास सुरुवात केली. यानंतर १९०४च्या दरम्यान अमेरिकेतील **इरा वॉशिंग्टन रूबेल** (Ira Washington Rubel) व जर्मनीमधील **कॅस्पर हर्मन** (Kašpar Harmann) यांनी धातूच्या ऑफसेट सिलेंडरऐवजी रबर ब्लँकेट सिलेंडरचा उपयोग करून आधुनिक ऑफसेट छपाईचा पाया घातला. अशा ऑफसेट तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वर्तमानपत्रांबरोबरच विशेषतः टेक्सटाईल उद्योगामध्ये कॉटन, नायलॉन, पॉलिस्टरसारख्या वेगवेगळ्या कृत्रिम पृष्ठभागांवर विविध रंगांमध्ये दर्जेदार, वेगवान व मोठ्या प्रमाणातील छपाईसाठी 'रोटरी ऑफसेट' तंत्रज्ञानाचा उगम हा मुद्रण तंत्रज्ञानाच्या इतिहासातील 'मैलाचा दगड' ठरला. या तंत्रज्ञानामध्ये सिलेंडर पद्धतीचा वापर रोटरी यंत्रामध्ये करण्यात आला. कंपोझिंग व प्रिंटिंगबरोबरच बाइंडिंग म्हणजेच विविध मुद्रित साहित्याची बांधणी हे मुद्रणालयाचे अभिन्न अंग असून आधुनिक पुस्तक बांधणीमध्ये कापसापासून तयार केलेल्या कापडाचा उपयोग सर्वप्रथम इंग्लंडमधील **आर्चिबाल्ड लेटन**

(Archibald Leighton) याने १८२३ मध्ये यशस्वीरीत्या केला. मुद्रण तंत्रज्ञानाचा हा अथक प्रवास इथेच न थांबता विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व एकविसाव्या शतकामध्ये 'डिजिटल' स्वरूपात रुपांतरित झाला आहे. **इस्त्रायली उद्योजक बेन्नी लँडा** (Benny Landa) यांना डिजिटल मुद्रण तंत्रज्ञानाचे जनक मानले जाते. सन १९७७ मध्ये लँडा यांनी 'इंडिगो डिजिटल प्रेस' स्थापन करून व्यावसायिक डिजिटल मुद्रणाचा पाया रचला. या आविष्कारामुळे मुद्रणउद्योग व तंत्रज्ञानामध्ये अभूतपूर्व क्रांती घडून आली. 'थ्री-डी प्रिंटिंग', 'यूव्ही प्रिंटिंग', 'व्हेरिएबल डेटा प्रिंटिंग', 'एआय' यांसारख्या डिजिटल स्वरूपातील दिवसेंदिवस उत्क्रांत होत असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे मुद्रणखर्चात बचत होऊन मुद्रणाच्या दर्जामध्ये अविश्वसनीय सुधारणा होत आहे. संगणकीय व आनुषंगिक मुद्रण तंत्रज्ञानाच्या उत्क्रांतीमुळे मुद्रणाचा दर्जा, विस्तार व विकास अभूतपूर्व अशा एका नव्या उंचीवर येऊन पोहोचला आहे.

**भारतातील मुद्रण उद्योगाचा प्रवास :**

भारतात पहिले मुद्रणालय गोवा राज्यामध्ये १५५६ मध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारक **सेंट फ्रान्सिस झेवियर** (St. Francis Xavier) यांच्या पुढाकाराने पोर्तुगीज मिशनरीने मुख्यत्वे धार्मिक व शैक्षणिक दस्ताएवेजांच्या मुद्रणासाठी स्थापन केले. तद्नंतर ईस्ट इंडिया कंपनीने व ब्रिटिश राजवटीत विविध सरकारी दस्ताऐवज, परिपत्रके इत्यादींचे मुद्रण व प्रकाशनासाठी मुद्रणक्षेत्राचा भारतात विस्तार केला. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतातील मुद्रणक्षेत्रात भीमजी पारेख, राजा रवी वर्मा, नवल किशोर भार्गव, सोराभजी, चिंतामणी घोष, मुस्तफा खान यांसारख्या दिग्गज व्यक्तींचे भरीव योगदान राहिले आहे. भारतातील मुघल राजवटीच्या काळात सन १६७४ मध्ये मुंबईमध्ये **भीमजी पारेख** यांनी भारतातील पहिले मुद्रणालय सुरू केले.

सन १८५७च्या उठावानंतर देशभरात विशेषतः शहरी भागात वर्तमानपत्रासारख्या छापील दस्ताऐवजांचे महत्त्व सर्वसामान्य लोकांना समजू लागले. भारताच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या विविध राज्यांतील अनेकविध समाजातील लोकांमध्ये संदेश, विचार, ज्ञानाची देवाणघेवाण मुद्रित माध्यमाद्वारे अतिशय प्रभावीपणे होऊ लागली होती. ब्रिटिश राजवटीत इंग्रजांना त्यांचे सरकारी व प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्यासाठी शहरी भागातील लोकांना प्रशिक्षित करण्यासाठी शिक्षणाची गरज भासू लागली. हे दोन्ही उद्देश्य साध्य करण्याहेतुस्तव मुद्रण व प्रकाशन व्यवसायाला भारताच्या वेगवेगळ्या भागात उत्तेजन मिळाले आणि याचाच परिणाम म्हणून १८५८ मध्ये लखनौमध्ये नवल किशोर मुद्रणालय तर १८६४ मध्ये मुंबईत तारापोरवाला सन्सचे मुद्रणालय सुरू झाले. सन १८७८ मध्ये पुणे शहरातील रविवार पेठेत संस्कृतचे पंडित व लेखक **विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर** यांनी **आर्यभूषण प्रेस** स्थापन केला. या मुद्रणालयातून लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या 'केसरी' व 'मराठा' या वर्तमानपत्रांची छपाई व प्रकाशन होत असे. त्याचबरोबर अलाहाबादमध्ये एएच व्हीलर ॲण्ड कंपनी व इंडियन प्रेस, दिल्लीमध्ये आयएमएच प्रेस, मद्रासमध्ये हिगीनबोथॅम्स, गोवर्सन्स पब्लिशर्स यांसारख्या अनेक व्यावसायिक मुद्रण व प्रकाशन संस्थांनी मुद्रण-प्रकाशन क्षेत्रात १९व्या शतकाच्या उत्तरार्धात मोलाचे योगदान दिले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस मोतीलाल बनारसीदास(१९०३), अंजुमन तारिकी ऊर्दू(१९०३), नागरी प्रचारिणी सभा(१९१०), ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसची भारतातील शाखा(१९१२), गोरखपूरमधील गीता प्रेस(१९२७), कलकत्त्यामधील श्री सरस्वती प्रेस(१९३२) यांसारख्या संस्थांनी उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, पंजाब, बंगाल, आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये मुद्रण-प्रकाशन उद्योगास मोठेच उत्तेजन दिले. तसेच दक्षिण भारतात अलीपेईमधील विद्यारंभम प्रेस व बुक डेपो(१९३१), मद्रासमधील प्रसाद प्रिंटिंग ॲण्ड प्रोसेस(१९३५) यांसारख्या संस्थांनी देशातील मुद्रण-प्रकाशन क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

सुमारे दोनशे वर्षांचा गौरवशाली इतिहास असलेल्या भारतातील मुद्रण उद्योगाचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अत्यंत मौल्यवान योगदान राहिले आहे. ब्रिटिश राजवटीविरोधात स्वातंत्र्य चळवळीचा व्यापक प्रसार करण्यासाठी वृत्तपत्राचे मुद्रण व प्रकाशन हे अत्यंत प्रभावी साधन ठरले. स्वातंत्र्य चळवळीचा देशभर फैलाव करण्यासाठी वृत्तपत्रांनी अतिशय परिणामकारक भूमिका पार पाडली आणि यासाठी देशभरातील अनेक मुद्रणालये व प्रकाशन संस्थांनी आपला सक्रिय सहभाग दिला. तद्नंतर **स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनेअंतर्गत व बहुभाषिक संस्कृती लाभलेल्या भारतवर्षातील विविध राज्यांमध्ये विशेषतः प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत अथांग पसरलेल्या शिक्षणक्षेत्रात, तसेच माहिती प्रसारण, प्रसार माध्यमे व वृत्तपत्र उद्योगामध्ये उच्च तंत्रज्ञानाधारित मुद्रणउद्योगाने मोलाची भूमिका बजावली आहे.** भारतातील सार्वजनिक क्षेत्राबरोबर व खाजगी उद्योगक्षेत्राला देखील मुद्रणउद्योगाचे बहुमूल्य साहाय्य लाभले आहे. देशभरातील केंद्र व राज्य सरकारच्या अखत्यारीतील सार्वजनिक तसेच खाजगी उद्योग, सेवा व कृषिक्षेत्राच्या विकास व वाढीमध्ये मुद्रणउद्योगाने आपली भूमिका दर्जेदारपणे व कुशलतेने पार पाडली आहे.

**आधुनिक भारताच्या सर्वांगीण विकासात मुद्रणउद्योगाचे योगदान**

एकविसाव्या शतकात भारताच्या विकासामध्ये मुद्रणउद्योगाने आपले लक्षणीय योगदान दिले आहे. देशभरातील साक्षरता मोहीम यशस्वी करण्यात मुद्रणउद्योगाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्याचबरोबर भारतातील प्राथमिक शाळांपासून ते महाविद्यालये व विद्यापीठांपर्यंतच्या सर्व शैक्षणिक संस्थांना पाठ्यपुस्तके, नियतकालिके तसेच अनेक प्रकारचे मुद्रित शैक्षणिक साहित्य सातत्याने पुरवून शिक्षणक्षेत्रात आपले भरीव योगदान दिले आहे. देशभरातील बालविवाह, अस्पृश्यता इत्यादी सामाजिक चालीरीतींच्या जोखडातून समाजाला मुक्त करण्यात व सामाजिक जाणीवजागृती करण्यात देखील मुद्रणउद्योगाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात मुद्रणउद्योगाने बहुमोल योगदान दिले आहे. जगातील सुमारे १२० विकसित व विकसनशील देशांना भारतातून विविध प्रकारच्या मुद्रित साहित्याची मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. यामध्ये प्रामुख्याने डिजिटल प्रिंटिंग, ऑफसेट प्रिंटिंग, फ्लेक्सोग्राफी, ग्रॅव्ह्युर, स्क्रिन प्रिंटिंग या प्रमुख तंत्रज्ञानाचा वापर केला जात असून मुख्यत्वे पॅकेजिंग, व्यावसायिक छपाई, प्रकाशने, जाहिराती व विपणन, टेक्स्टाईल प्रिंटिंग इत्यादींचा समावेश आहे. भारतात सुमारे एक लाखापेक्षा अधिक व्यावसायिक मुद्रणालये कार्यरत असून देशातील शहरी व ग्रामीण भागात सुमारे २५ लाखांपेक्षा अधिक रोजगारनिर्मिती करून मुद्रणउद्योगाने भारतातील बेरोजगारीनिर्मूलन प्रक्रियेत मोलाचा सहभाग नोंदवला आहे.

अमेरिकेतील वॉशिंग्टनस्थित **आंतरराष्ट्रीय नाणे निधी** (International Monetary Fund) या जगातील १९१ देशांचे सदस्यत्व असलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या २०२५च्या अहवालानुसार ४.१९ ट्रिलीयन डॉलर सकल देशांतर्गत उत्पादन (GDP) असलेली आणि वार्षिक सरासरी ७ टक्के दराने वाढणारी भारताची अर्थव्यवस्था जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर आली आहे. पॅकेजिंग इंडस्ट्री असोसिएशन ऑफ इंडिया व भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने स्थापन केलेल्या आयईबीएफ (India Brand Equity Foundation) या संस्थांच्या २०२५ मधील अहवालानुसार भारतीय अर्थव्यवस्थेतील पाचव्या क्रमांकाचे उद्योगक्षेत्र असलेल्या 'प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग' उद्योगाने २६.७ वार्षिक चक्रवाढ दराने (CAGR) २०२५ वर्षअखेरीस २०४.८१ बिलीयन डॉलर इतके मूल्य असलेल्या बाजारपेठेचे लक्ष्य निर्धारित करून भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादना (GDP)मधील भरीव व महत्त्वपूर्ण योगदानाद्वारे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास व वाढीमध्ये आपले स्थान ठळकपणे अधोरेखित केले आहे.

**विद्यापीठ मुद्रणालयाची अमृतमहोत्सवी वाटचाल**

मुद्रणकला व तंत्रज्ञान यांचा उत्कृष्ट मिलाफ असलेल्या मुद्रणसंस्कृतीचा गौरवशाली वारसा लाभलेल्या भारतवर्षातील आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त नामांकित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला **फलटणचे मालोजीराजे नाईक-निंबाळकर** यांच्याकडून मनुष्यबळ व यंत्रसामग्रीने सुसज्ज असे मुद्रणालय पुणे विद्यापीठाच्या स्थापनेवेळी प्राप्त झाले. सन १९५० मध्ये स्थापन झालेले विद्यापीठ मुद्रणालय गेल्या ७५ वर्षांमध्ये अनेक स्थित्यंतरांतून गेले आहे. सुरुवातीच्या काळात मोनो टाइप हॅण्ड कंपोजचा प्रामुख्याने अक्षरजुळणीसाठी उपयोग केला जात होता परंतु याचा वेग कमी असल्याने अक्षरजुळणीच्या वेगावर मर्यादा येत होत्या. नंतरच्या काळात यंत्राद्वारे अक्षरजुळणी करणाऱ्या मोनो ऑपरेटिंग व मोनो कास्टिंग मशीन मुद्रणालयात दाखल झाल्या. त्यामुळे अक्षरजुळणीचा वेग लक्षणीयरीत्या वाढल्याने पुस्तके, अभ्यासक्रम यांसारखे मजकूरआधिक्य असलेले शैक्षणिक साहित्य वेगाने व दर्जेदारपणे कंपोज करणे शक्य झाले. त्याचबरोबर 'मॅन्युअल' पद्धतीने चालवली जाणाऱ्या ट्रेडल (Traedle) छपाई मशीनसह टप्प्याटप्प्याने विद्यापीठ मुद्रणालयात तत्कालीन लेटरप्रेस तंत्रज्ञानातील अद्ययावत अशी **मर्सिडिस** (Mercedes), **व्हिक्टोरिया फ्रंट** (Victoria Front), **हायडलबर्ग** (Heidelberg) ही छपाईयंत्रे स्थापित करण्यात आली. यातील हायडलबर्ग हे मशीन जर्मनीमध्ये १९१४ मध्ये तयार करण्यात आले. मर्सिडिस प्रिंटिंग मशीन हे १९४८ मध्ये जर्मनीमधील **पॉल ग्लॉकनर** (Paul Glöckner) याने हे मशीन तयार केले तर नेदरलॅण्डमधील ॲम्स्टरडॅम येथे या मशीनचे उत्पादन केल्याचे संदर्भ मिळतात. या काळात मुद्रणालयाच्या बांधणी विभागात पुस्तक बांधणीसारखी बहुसंख्य कामे हाताने करावी लागत असली तरी कामाचा दर्जा उत्तम राखला जात होता. मुद्रणालयातील जुळणी, यंत्र व बांधणी विभागांच्या एकत्रित व नियोजित कामाद्वारे मुद्रणालयात विद्यापीठाचे प्रवेश व परीक्षा अर्ज, विविध विषयांचे अभ्यासक्रम, पुस्तके, पदवीप्रदान व वर्धापनदिन विशेषांक इत्यादी अनेकविध महत्त्वाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व परीक्षासंबंधित दस्तावेजांची सुबक व दर्जेदार छपाई होत असे. असे विविध प्रकारचे मुद्रण तंत्रज्ञान आत्मसात करून मुद्रणालयातील कंपोझिटर, प्रेसमन, बाइंडर अशा आपापल्या कामात निष्णात असलेल्या तज्ज्ञ

कर्मचारीवर्गाने हॅण्ड कंपोझिंग, मोनो ऑपरेटिंग व मोनो कास्टिंग, लेटरप्रेस या श्रेष्ठ दर्जाच्या तंत्रज्ञानापासून ऑफसेट व आजच्या अत्याधुनिक अशा संगणकीय, डिजिटल तंत्रज्ञानापर्यंत अनेक बदल मुद्रणालयात अनुभवले आणि हे बदल स्वीकारून व सातत्याने बदलणारे तंत्रज्ञान आत्मसात करून एक अद्ययावत 'Modern Printing Establishment' म्हणून विद्यापीठाच्या अविरत वाटचालीत 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय' आपले मौल्यवान योगदान अखंडितपणे देत आहे.

**संदर्भ :**


- Hellmut E. Lehmann-Haupt, Johannes Gutenberg, Encyclopaedia Britinnica, 21 June 2025, Chicago, Illinois, USA.
- Overview of printing in India 1556-2015, PrintWeek India, 16 March 2018, Mumbai.
- Jeremy Norman, Ottmar Mergenthaler Invents the Linotype, HistoryofInformation.com
- Kahan, Basil (1999), Ottmar Mergenthaler: The Man and his Machine : A Biographical Appreciation of the Inventor on His Centennial, New Castle, DE: Oak Knoll, ISBN 1-58456-007-X.
- A Printing Revolution: The History of Lithography, Centre Colours, 3 December 2018, Sherburn-in-Elmet, Leeds, England.
- Pioneers of Printing: The Origins of Offset Printing, Drupa – A Global Platform for International Printing and Packaging Industry, Düsseldorf, Germany.
- Packaging Industry Association of India (PIAI) Report – 2024-25, Andheri, Mumbai.
- Srayasree Biswas, The Evolution of Digital Printing: Reshaping the Print Industry, January 16, 2025.
- Report on Indian Printing Industry, Fulcrum Resources Infinity Pvt Ltd, Mumbai.



**श्री. राहुल पाखरे**
अधिसभा सदस्य

# विद्यापीठ मुद्रणालयाची अमृत महोत्सवी वर्षामध्ये डिजीटल क्रांती

पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर सहा जानेवारी १९५० साली विद्यापीठाच्या मुद्रणालयाची स्थापना करण्यात आली. यामुळे विद्यापीठातील अनेक गोष्टींची प्रसिद्धी होऊ लागली आणि मुद्रणालय विषयाची आवश्यकता उपयुक्त ठरत गेली. यावर्षी मुद्रणालयाच्या अमृत महोत्सवी वर्षाची पूर्तता झाली ही आपल्यासाठी खरी अभिमानाची गोष्ट आहे .

अलीकडे तंत्रज्ञानाने सर्वच गोष्टींमध्ये बदल केला आहे या तंत्रज्ञानाच्या हस्तक्षेपामुळे मुद्रणालयही अद्यावत होऊ लागले आहे आणि ती या विभागाची ओळख होऊ लागली .

पूर्वी आपण पाहत होतो की, मोठ्या प्रमाणावरती प्रकाशनांची कामे, त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या प्रशासकीय कामांची नोंद करण्यासाठी मुद्रणाचा उपयोग होताना आपण पाहत आलो त्याचबरोबर त्याची बांधणी आपल्या विद्यापीठातील कर्मचारी करत असायचे .

परंतु आता अमृत महोत्सवाकडे वाटचाल करत असताना आणि तंत्रज्ञानाच्या विकसनामुळे अर्थात डिजिटायजेशनमुळे सर्व डिजिटल होऊ लागले आहे. त्यामुळे ही संख्या कमी होऊ लागली आहे; परंतु आवश्यकता तितकीच आहे, हेही महत्वाचे आहे. कारण गुणपत्रिका, पदविका प्रमाणपत्र व नंबर प्रमाणपत्र देण्याचा कार्यक्रम हा विद्यापीठात चालू आहे व महाविद्यालयीन स्तरावर होतो आहे .


विद्यार्थ्यांना हातामध्ये पडणारे प्रमाणपत्र पाहून स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल अभिमान वाटतो. अशा प्रकारच्या छपाईमध्ये बाकी सर्व माहिती सेम असते, विद्यार्थ्यांची व त्यांच्या विषयांची माहिती मात्र वेगळी असते. अशा वेळेस  व्हेरिएबल डाटा प्रिंटिंग  नावाचे तंत्रज्ञान विकसित झाले आणि यामुळे लाखो विद्यार्थ्यांची छपाई कमी वेळामध्ये होऊ लागली, हे आपण पाहतो आहोत.

येणाऱ्या काळामध्ये आणि आताही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये मला असे वाटते की, मुद्रणालायातील या डिजिटल तंत्रज्ञानामुळे हे अधिक सोपे होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे क्रेडिट्स आणि

त्याचे प्रमाणपत्र हे त्यांना त्यांच्या वेळेनुसार मिळणार आहेत, हे शक्य होणार आहे . व्हेरिएबल डाटा प्रिंटिंग मुळेच कमी वेळामध्ये व कमी कालावधीमध्ये या सर्व प्रमाणपत्राची छपाई होणार आहे यामध्ये विशेष बाब राहील ती ग्राफिक डिझायनरची येणाऱ्या काळामध्ये ब्लॉकचेन मॅनेजमेंटमुळे डाटा स्वरूपात हे सर्व प्रमाणपत्र पाहायला मिळतील, परंतु या प्रमाणपत्रांची ग्राफिक स्वरूपामधील तयारी मुद्रणालयाच्या माध्यमातून होणार आहे त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुद्रणाच्या अमृत महोत्सव वर्षाच्या पूर्तीकडे जात असताना नवीन तंत्रज्ञानाच्या जोडीमुळे हे सहजरीत्या शक्य होणार आहे, यावर माझा विश्वास आहे.

❑❑

**श्री. सुहास पानसे**
माजी व्यवस्थापक, विद्यापीठ मुद्रणालय



## विद्यापीठ मुद्रणालयाच्या हृद्य आठवणी

पुणे विद्यापीठ मुद्रणालयास २०२५ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होताना एक स्मरणिका काढण्याचा स्त्युत्य उपक्रम मुद्रणालयाच्या व्यवस्थापकांनी घेतला आहे, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

माझ्या प्रदीर्घ काळातील जवळजवळ ३६ वर्षाच्या आठवणींची साठवण शब्दात कितीही सांगितली तरी अल्पच ठरेल.

एक भांडाररक्षक ते व्यवस्थापक अशा पायऱ्या चढत असताना आलेले चांगले अनुभवच जास्त आहेत. ह्या काळात मिळालेली सहकाऱ्यांची साथ बहुमोलाची होती. तसेच अधिकारी व कामगार वर्ग हा अतिशय खेळीमेळीने प्रेमाने काम करण्यात तत्पर असे. सकाळी ७ ते दुपारी ४ व दुपारी ४ ते रात्री १२ अशा दोन शिफ्ट्समध्ये त्याकाळी प्रेस सुरू असायचा. सगळे अधिकारी, कामगार अतिशय वेळेवर प्रेसमध्ये हजर राहून आपल्या कामावर पराकोटीची निष्ठा ठेवून काम करीत असत. मी जेव्हा १९६९ मध्ये प्रेसमध्ये भांडाररक्षक म्हणून कामास लागलो तेव्हा सुमारे १२५ तरुण कामगार प्रेसमध्ये होते. त्या काळी सर्व कामे लेटरप्रेस ह्या प्रकारातील होती.

विद्यापीठाच्या कक्षातील पुणे व बाहेरगावातील कॉलेजेसच्या परीक्षांचे पेपर्स छपाईचे काम सर्वस्वी विद्यापीठ प्रेसवर अवलंबून असायचे. पी. डीग्री आर्टस्, कॉमर्स व सायन्सचा इंग्रजीचा पेपर तिन्ही फॅकल्टींना एकच असायचा. परीक्षा सुरू होण्याआधी सगळ्या सेंटर्सना जवळजवळ ३० ते ४० हजार प्रती छापून पाठवण्याची मोठी जबाबदारी प्रेसवर असायची. त्यावेळेस रात्री सर्व प्रेसमधील स्टाफ व कामगार अतिशय कुशलतेने आपापली जबाबदारी सांभाळत असत. पेपर्स कंपोज करून छपाईसाठी रात्री २ वाजता सुरू करून पॅकिंग करुन सर्व सेंटर्सला पाठवल्यानंतरच सर्व स्टाफ घरी जाऊ शकत असे. पेपर दुपारी ३ चा असायचा त्या काळी !

पुढे काही काळाने ॲडव्हान्स प्रिंटिंग पेपरर्सची कार्यवाही करावी लागली. त्यासाठी रात्रीही प्रेसचे काम सुरू असे. अतिशय विश्वासू, कामसू अस कामगार वर्ग ही कामे अतिशय उत्तम रीतीने पार पाडायचा. ठराविकच कामगार ह्या कामासाठी निवडल्याने अनेक विश्वासू कामगारांची नाराजी पत्करावी लागली पण विद्यापीठाच्या पॉलिसीप्रमाणे आम्हा अधिकारी वर्गाला त्याचे काटेकोरपणे पालन करणे भाग होते.

ह्या व्यतिरिक्त सर्व परीक्षा फॉर्मस्, परीक्षा स्टेशनरी, विद्यापीठाचे विविध रिपोर्टस, सिलॅबस, विद्यापीठात झालेल्या सभेची इतिवृत्त इत्यादींची छपाई ही अनेकविध कामे त्या त्या कालावधीत पूर्ण करून द्यायची विद्यापीठ मुद्रणालयाची जबाबदारी असायची. आधुनिक तंत्रज्ञानानुसार नवीन छपाई मशीन्स आल्यावर कामगारांना व अधिकाऱ्यांना त्याचे प्रशिक्षण देऊन अद्ययावत मुद्रण करत होतो. आधुनिक तंत्रज्ञान आल्याने व मुद्रणालयाने ते स्वीकारले, त्यामुळे सेवकवर्ग कमी प्रमाणात लागू लागला म्हणून विद्यापीठाने नवीन सेवक भरती न करता आहे त्याच सेवकांमध्ये काम करावे व जसजसे सेवक निवृत्त होतील तसा विद्यापीठावरचा बोजा पण हलका होईल असे धोरण घेतल्याने आजमितीस अत्यंत कमी सेवकांमध्ये सुधारित यंत्रसामुग्रीद्वारे कामकाज चालू आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार मुद्रणालयासाठी एका सल्लागार समितीची तरतूद होती. त्यामुळे दोन विद्यापीठ कार्यकारिणीचे सदस्य व तीन नामांकित मुद्रणालयाचे व्यवस्थापक किंवा मालक यांची नेमणूक ५ वर्षासाठी असायची अशा समितीतून खूप मार्गदर्शक सूचना व निर्णय घेऊन मुद्रणालयाचे कामकाजात सुशोभिकरण व भरभराट करणे सोयीचे झाले.

मुद्रणालयाचा ५० वा सुवर्ण महोत्सव मी व्यवस्थापक असताना मोठ्या प्रमाणात साजरा केला याचा मला आनंद आहे. त्यावेळेचा सेवकांचा उत्साह खूप छान होता. आज २०२५ मध्ये त्यावेळचे बरेच सेवक हयात नाहीत, पण त्याची आठवण मनाला सतत जाणवत राहते.

मुद्रणालयाच्या सेवेतील काळात अजंठा लेणी, गोवा, गणपतीपुळे-रत्नागिरी, वणी-नाशिक अशा सहली सेवकांबरोबर करून खूप मजा केली होती. तसेच दरवर्षी श्रावण महिन्यात सत्यनारायण पूजा सेवकांमधील एका जोडीला पूजेला बसून साजरी करित होतो. तसचे मटारच्या सिझनमध्ये मठार-उसळ-ब्रेड कार्यक्रम, कोजागिरीला सेवक एकत्र येवून कोजागिरी साजरी करीत होतो. असंख्य आठवणींनी मन भरून येते व सेवकांच्या नसल्याने दु:खही होते.

आज मुद्रणालयाचा ७५ वा वाढदिवस व्यवस्थापक श्री. दत्तात्रय कुटे व त्यांचे सहकारी साजरा करीत आहेत. त्यांना व कार्यक्रमास खूप-खूप शुभेच्छा देतो व माझे चार शब्द व्यक्त करून थांबतो. धन्यवाद !

**प्रा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर**

विभागप्रमुख, इतिहास विभाग




## राजमुद्रणालय ते विद्यापीठ मुद्रणालय

'खऱ्या अर्थाने विद्यापीठाचं मुद्रणालय म्हणजे मुद्रणकलेचे अध्यापन आणि या कलेचा प्रसार करणारे एक आदर्श केंद्र असायला हवे. मुद्रणकलेचे सर्वोच्च मानदंड सांभाळून विद्यापीठ मुद्रणालयाने आपल्या कामातून आणि प्रशिक्षणातून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना या उपयोजित कलेमध्ये प्रावीण्य मिळवून देऊन सबंध देशातील मुद्रणाचा दर्जा उंचावण्यात योगदान द्यायला हवे.

हे सगळे लक्षात घेता पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाची आपली खास ओळख असायला हवी आणि भारतातल्या इतर विद्यापीठांच्या मुद्रणालयांमध्ये उठून दिसतानाच त्याने इंग्लंड, अमेरिकेतल्या विद्यापीठ मुद्रणालयांना टक्कर द्यायला हवी.'

ही अपेक्षा केली होती ती तत्कालीन पुणे विद्यापीठाच्या मुद्रणालयाबाबत नेमलेल्या समितीनं. १९४९मध्ये १० फेब्रुवारीला पुणे विद्यापीठ स्थापन झालं. कुलगुरू, कुलसचिव आणि मोजकेच प्राध्यापक आणि कर्मचारी असणाऱ्या विद्यापीठाला स्वत:ची जागाही अजून मिळायची होती. पण तरीही निजाम गेस्टहाउसच्या वास्तूमधून एका मोठ्या स्वप्नाची पायाभरणी मात्र आधीच सुरू झाली होती. विद्यापीठाची औपचारिक स्थापना होण्याआधीच प्रथम कुलगुरू बॅ. मुकुंदराव जयकर यांनी विद्यापीठाला मुद्रणालयाची गरज कितपत आहे, त्यासाठी कोणती यंत्रणा गरजेची आहे, आणि यासाठी आवश्यक यंत्रणा कशी उभारता येईल याबाबत सल्लागार समिती नेमली होती.

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. इंग्रजी अमलाखालच्या प्रदेशासोबतच ५६५ संस्थानांमधील प्रदेशही स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वतंत्र भारतात समाविष्ट झाला. त्यामुळे त्या त्या संस्थानांमधल्या शासकीय कामकाजासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीला विशेष काम उरलं नाही. पुणे विद्यापीठाच्या त्या काळच्या कार्यक्षेत्रात फलटण संस्थान होतं. तिथले अधिपती मालोजीराजे नाईक निंबाळकर हे राजर्षी शाहू महाराजांच्या काळात कोल्हापूर संस्थानातली व्यवस्था अनुभवलेले आणि त्यामुळे प्रभावित झालेले राज्यकर्ते होते. त्यांच्या 'राजमुद्रणालया'चं कामकाज नव्या शासनकाळात बंद होणार होते. त्याऐवजी हे राजमुद्रणालय नव्याने सुरू होणाऱ्या पुणे विद्यापीठाला देणे योग्य ठरेल असा विचार त्यांनी नूतन कुलगुरूंसमवेत केला. लगोलग जुलै १९४८मध्ये कुलगुरू बॅ. जयकर यांनी अर्थतज्ज्ञ असणारे प्रा. गाडगीळ,

बहुभाषाविद असणारे प्रा. कत्रे आणि श्री. आर. बी. घोरपडे यांची समिती या कामी सल्ला देण्यासाठी नेमली.

या सल्लागार समितीने तातडीने फलटण संस्थानच्या राजमुद्रणालयाला १९४८च्या ऐन पावसाळ्यात प्रत्यक्ष भेट दिली. तिथल्या यंत्रसामग्रीची माहिती, त्याची साधारण किंमत यांचा अंदाज घेऊन तो कुलगुरूंना सादर केला. कुलगुरूंनी मुंबई इलाख्याचे प्रमुख– ज्यांना त्याकाळी पंतप्रधान म्हटलं जाई – त्या बाळासाहेब खेर यांना फलटणच्या राजमुद्रणालयाची संपूर्ण यंत्रणा आणि त्यातील कर्मचारी हे विद्यापीठासाठी मिळावेत अशी मागणी केली. शिवाय मुद्रणालयाचं स्थलांतर केल्यानंतर त्याचं काम अद्ययावत पद्धतीनं सुरू करण्यासाठी जी यंत्रे आणि कच्चा माल लागेल, त्यासाठी शासनाने आणखी १० हजार रुपयांचं अनुदान विद्यापीठाला द्यावं अशीही सूचना त्यांनी केली. आश्चर्यकारक गोष्ट अशी की शासनाने ७३ हजार रुपयांचं अनुदान मुद्रणालय खरेदीसाठी देऊ केलं. विद्यापीठाचे कुलसचिव श्री. बॅनर्जी यांनी शासनाला कळवलं की शासन देऊ करत असलेली रक्कम विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीच्या अंदाजापेक्षा बरीच जास्त आहे. तेव्हा शासनानं विद्यापीठ जी निश्चित करेल ती रक्कम मान्य करण्याची तयारी दाखवली. इतकंच नव्हे तर व्यवहार पूर्ण होण्याची वाट न पाहाता आधीच मुद्रणालय स्थलांतरित करून देण्याचीही तयारी दर्शविली.

सल्लागार समितीने आपल्या शिफारसीमध्ये हेही लिहिलं होतं, की निजाम गेस्टहाउसमधून विद्यापीठाचं स्थलांतर गणेशखिंडीतील गव्हर्नर हाउसच्या ४११ एकरांच्या जागेत झाल्यानंतर मुद्रणालयाच्या यंत्रणेसाठी स्वतंत्र वास्तू आणि कर्मचारी वर्गाला घरे उभारली जावीत. सध्याच्या मुद्रणालयाच्या वास्तूची रचनाही त्या समितीच्या शिफारसीनुसार केलेली आहे. मूळ वास्तूमध्ये यंत्रसामग्रीच्या गरजेनुसार बांधकाम वाढवून ही वास्तू आजच्या स्वरूपात उभी आहे.

६ जानेवारी १९५० रोजी पुणे विद्यापीठ मुद्रणालयाचं काम सुरू झालं. फलटण संस्थानातून मुद्रणालयासोबत स्थलांतरित झालेले बारा कर्मचारी आणि मुद्रणालय सल्लागार समिती यांच्या समन्वयाने मुद्रणालयाने अल्पावधीतच मोठी भरारी घेतली. विद्यापीठातील विविध प्रशासकीय कामांसोबतच तज्ज्ञांच्या संशोधनावर आधारित ग्रंथसंपदाही मुद्रणालयात प्रकाशित होत राहिली. दोन पिढ्या मुद्रणालय सेवेत असणाऱ्या श्री. अहिवळे, श्री. ववले, डॉ. अशोक कुडले, यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळे विद्यापीठ मुद्रणालय पुढेही आपली नाममुद्रा उमटवत राहील असा विश्वास वाटतो.

**संदर्भ –**


- दि. १ मार्च १९४९च्या पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचा अहवाल.
- सन २००० साली प्रकाशित विद्यापीठ वार्ता चा पुणे विद्यापीठ मुद्रणालय सुवर्णमहोत्सव विशेषांक.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय सल्लागार समितीच्या माध्यमातून पुढील मान्यवर सदस्यांचे विद्यापीठ मुद्रणालयाच्या क्षेत्रात योगदान

**१९५८ – १९६१**

१. प्रा. एस. जी. हुल्याळकर (अध्यक्ष)
२. श्री. व्ही. ए. पटवर्धन
३. डॉ. एस. एम. कात्रे

**१९६१ – १९६४**

१. श्री. आर. बी. घोरपडे (अध्यक्ष)
२. श्री. व्ही. ए. पटवर्धन
३. डॉ. एस. एम. कात्रे

**१९६४ – १९६७**

१. श्री. आर. बी. घोरपडे (अध्यक्ष)
२. डॉ. व्ही. एन. भावे
३. श्री. वाय. जी. जोशी

**१९६७ – १९६८**

१. डॉ. व्ही. एन. भावे (अध्यक्ष)
२. श्री. वाय. जी. जोशी
३. श्री. एम. एच. पटवर्धन (संगम प्रेस)

**१९६८ – १९७१**

१. श्री. सी. एन. भालेराव (अध्यक्ष)
२. डॉ. व्ही. एन. भावे
३. श्री. वाय. जी. जोशी
४. श्री. सी. एस. लाटकर
५. श्री. एस. एस. किर्लोस्कर

**१९७१ – १९७४**

१. श्री. सी. एन. भालेराव (अध्यक्ष)
२. श्री. टी. बर्नाबास
३. श्री. वाय. जी. जोशी
४. श्री. एस. एस. किर्लोस्कर
५. श्री. एम. एम. जगताप

**१९७४ – १९७६**

१. श्री. एस. एम. जोशी (अध्यक्ष)
२. श्री. डी. आर. प्रधान
३. श्री. वाय. जी. जोशी
४. श्री. एस. एस. किर्लोस्कर
५. श्री. एम. एम. जगताप

**१९७६ – १९७९**

१. श्री. पतंगराव कदम (अध्यक्ष)
२. श्री. एन. सी. जोशी
३. श्री. वाय. जी. जोशी
४. श्री. एस. एस. किर्लोस्कर
५. श्री. एम. एम. जगताप

**१९७९ – १९८२**

१. श्री. एन. सी. जोशी (अध्यक्ष)
२. श्री. पतंगराव कदम
३. श्री. व्ही. पी. गीत
४. श्री. एम. एम. जगताप
५. श्री. वाय. जी. जोशी
६. श्री. बी. जी. थोरात

**१९८२ – १९८५**

१. श्री. एन. सी. जोशी (अध्यक्ष)
२. श्री. बी. जी. थोरात
३. श्री. एम. एम. जगताप
४. डॉ. सुहास परचुरे
५. श्री. वाय. जी. जोशी

**१९८५ – १९८८**

१. डॉ. एस. सी. गुप्ते (अध्यक्ष)
२. डॉ. पतंगराव कदम
३. श्री. एम. एम. जगताप
५. श्री. वाय. जी. जोशी
६. श्री. व्ही. आर. फडणीस

**१९८८ – १९९१**

१. डॉ. सुधाकर पाण्डे (अध्यक्ष)
२. श्री. ए. एन. गोगटे
३. श्री. प्रतापराव पवार
४. श्री. सर्जेराव घोडपडे
५. श्री. डी. एस. गानू
६. श्री. एम. एस. मौर्य

**१९९१ – १९९२**

१. प्राचार्य प. भ. कुलकर्णी (अध्यक्ष)
२. श्री. ए. एन. गोगटे
३. श्री. डी. एस. गानू
४. श्री. एम. एस. मौर्य
५. श्री. पु. स. सहस्त्रबुध्दे
६. श्री. का. ग. सोनार

**१९९२ – १९९६**

१. श्री. रामनाथ वाघ (अध्यक्ष)
२. श्री. ए. एन. गोगटे
३. श्री. प. भ. कुलकर्णी
४. डॉ. यू. बी. भोईटे
५. श्री. के. आर. महाडिक
६. श्री. सुरेश जगताप
७. श्री. एम. एस. दाते
८. श्री. विजय ठोंबरे
९. श्री. दीपक मराठे

**१९९६ – १९९८**

१. डॉ. बी. डी. चौरे (अध्यक्ष)
२. ॲड. सुरेशचंद्र भोसले
३. डॉ. एच. व्ही. सहस्त्रबुद्धे
४. डॉ. पी. के. सिन्हा
५. डॉ. अरुण साधू
६. श्री. प्रदीप के. मुनोत

**१९९८ – २००२**

१. डॉ. एन. जे. सोनावणे (अध्यक्ष)
२. ॲड. सुरेशचंद्र भोसले
३. डॉ. एच. व्ही. सहस्त्रबुद्धे
४. डॉ. पी. के. सिन्हा
५. डॉ. अरुण साधू
६. श्री. प्रदीप के. मुनोत

२००२ – २००६

१. डॉ. अशोक कोळस्कर (अध्यक्ष)
२. प्रा. संजीव सोनवणे
३. डॉ. डी. एन. देवबागकर
४. डॉ. व्ही. व्ही. डोइफोडे
५. प्रा. के. आर सानप
६. प्रा. आर. के. ऊनियाल

२००६

१. श्री. रत्नाकर गायकवाड (अध्यक्ष)
२. डॉ. ग. र. एकबोटे
३. प्रा. एस. के. पाटील
४. डॉ. अ. वा. आवलगावकर
५. डॉ. व. ना भोरासकर
६. डॉ. दि. एस. जोग
७. प्रा. ए. एम. पाटणे
८. प्रा. एम. एस. जाधव

२००६ – २००९

१. डॉ. नरेंद्र जाधव (अध्यक्ष)
२. डॉ. ग. र. एकबोटे
३. प्रा. एस. के. पाटील
४. डॉ. अ. वा. आवलगावकर
५. डॉ. व. ना भोरासकर
६. डॉ. जी. आर. सोमण
७. प्रा. समीर प्रभुणे
८. डॉ. द. दि. देशमुख

२०१० – २०११

१. डॉ. आर. के. शेवगांवकर (अध्यक्ष)
२. डॉ. ग. र. एकबोटे
३. प्रा. एस. के. पाटील
४. डॉ. संजीव सोनवणे
५. डॉ. संजय चाकणे
६. श्री. संजय गवई
७. प्रा. मधुरा महाजन
८. डॉ. दत्तात्रय कुटे

२०१२ – २०१७

१. डॉ. वासुदेव गाडे (अध्यक्ष)
२. प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते
३. डॉ. धनंजय लोखंडे
४. डॉ. उज्वला बर्वे
५. डॉ. एस. एस. देवकुळे
६. सीए. विद्या के. गारगोटे
७. डॉ. दत्तात्रय कुटे

# विद्यापीठ मुद्रणालयात छपाई झालेली दुर्मिळ पुस्तके

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १. | निजाम – पेशवे संबंध १८ वे शतक<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९५९. | प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर |
| २. | पोर्तुगेज मराठे संबंध अर्थात पोर्तुगेजांच्या<br>दप्तरांतील मराठ्यांचा इतिहास<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६७. | डॉ. पांडुरंग सखाराम<br>पिसुर्लेकर |
| ३. | महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृति<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६४. | प्रा. द. बा. डिसकळकर |
| ४. | पुणे विद्यापीठ इतिहास<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९९९. | राजा दिक्षित |
| ५. | प्राचीन मराठी कोरीव लेख<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६४. | शं. गो. तुळपुळे |
| ६. | महामानव रवींद्रनाथ<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७४. | बा. भ. बोरकर |
| ७. | रविकिरणमण्डळ गौरविका<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६५. | कुमुदीनी घारपुरे |
| ८. | मराठी नाट्यसमीक्षा<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९६८. | डॉ. रामचंद्र शंकर वाळिंबे |
| ९. | **Vedic Religion and Mythology**<br>University of Poona Publication,1965. | R. N. Dandekar |
| १०. | रससिद्धान्त का सामाजिक मूल्यांकन<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७४. | डॉ. (कु.) दुर्गा दिक्षित |
| ११. | आधुनिक वैद्यकशास्त्राचा इतिहास<br>पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७२ | डॉ. आ. श्री. परांजपे |
| १२. | The concept of moral obligation<br>University of Poona Publication,1980 | S. R. Talghatti |
| १३. | Autobiography of Gurudev R. D. Ranade<br>University of Poona Publication,1980 | V. C. Kelkar |
| १४. | Jawaharlal Nehru: The Ecstasy & the agony<br>University of Poona Publication,1966 | P. H. Patwardhan |

| वर्ष | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १५. | Patanjali's Vyakarana - Mahabhasya<br>University of Poona Publication,1968 | S. D. Joshi |
| १६. | Sanskrit Dhatupathas<br>University of Poona Publication, 1961 | G. B. Palsule |
| १७. | Sribhashya of Ramanuja<br>University of Poona Publication,1959 | R. D. Karmarkar |
| १८. | Glimpses of Medieval Indian Ideas & Institutions<br>University of Poona Publication,1974 | K. N. Chitnis |
| १९. | Concepts of Stress in the Indian Tradition<br>University of Poona Publication,1993 | M. N. Palsane |
| २०. | Precious Thoughts : Convocation Address<br>University of Poona Publication,1994 | A. S. Kolaskar |
| २१. | महात्मा जोतीराव फुले यांचे वारसदार<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रकाशन २०२० | विश्वनाथ शिंदे |
| २२. | बेळगाव परिसरातील सत्यशोधक चळवळ<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रकाशन २०२१ | नरेंद्र पाटील |
| २३. | समाजभुषण कै. सौ. सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रकाशन २०२१. | शांताबाई बनकर |
| २४. | Anna Bhau Sathe's My Travel to Russia<br>Savitribai Phule Pune University, 2021 | Dr. Anagha Bhat-Behere |
| २५. | Giloy - A Lucarative Medicinal Plant<br>गिलोय - एक लाभकारी औषधी पौध<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रकाशन २०२१. | Dr. Digambar N. Mokat |
| २६. | Professor R. R. Ranade Contribution to Indian Philosophy<br>Savitribai Phule Pune University, 2021 | B. R. Kulakarni |
| २७. | आत्मानंद व त्याचे जीवनातील स्थान<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रकाशन २०२२. | सौ. प्रद्मा कुलकर्णी |

# विद्यापीठ मुद्रणालयात छपाई झालेली निवडक पुस्तके

| वर्ष | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १९५८ | माधवस्वामीकृत योगवासिष्ठ | डॉ. शं. गो. तुळपुळे |
| १९६० | राहु-केतु आणि ग्रहणे | त्र्यं. गो. ढवळे |
| १९६१ | Vedic Bibliography | आर. एन. दांडेकर |
| १९६३ | विवेकचिंतामणि | प्रा. पण्डित आवळीकर |
| १९६४ | १) सन्त नामदेव की हिन्दी पदावली | भगीरथ मिश्र, राजनारायण मौर्य |
| | २) रामसुतकृत साधुविलास<br>प्राचीन मराठी गद्य-पद्यमाला | वि. म. कुलकर्णी |
| १९६५ | रविकिरण मंडख गौरविका | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९६६ | १) Palynalogical Studies on the Family Acanthaceae | पुष्पलता चौबळ |
| | २) Some Poetical Aspects of the Rgvedic Repetitions | ॲड. टी. जी. माईणकर |
| | ३) Principles of Jurisprudence in a Co-operative Commonwealth | ॲड. एम. डी. विद्वांस |
| १९६८ | १) चित्रवाणी-१ | संस्कृत गद्य-पद्य वेचे (झ.ऊ) |
| | २) A Survey of the Pre-Sankara Advaita Vedanta | एम. टी. सहस्रबुद्धे |
| १९६९ | १) मराठीचा अर्थविचार | अनुराधा पोतदार |
| | २) भारताची रिझर्व्ह बँक | वसंत विष्णू लोणकर |
| | ३) A Study of Satyagraha | प्रा. निर्मल कुमार बोस |
| | ४) Humanities Journa of the Univesity of Poona | पुणे विद्यापीठ पत्रिका |
| | ५) Patanjali's Vyakarana Mahabhasya | एस. डी. जोशी |
| १९७० | १) अवतारांचा कळस (श्री संत तुकाराम महाराज यांचे बोधचरित्र) | गो. शं. राहिरकर |

| वर्ष | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| | २) घाटावरील श्रमिकांची लोकगीते | सौ. अनसूया लिमये |
| | ३) Lectures on Comparative Philosophy | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९७१ | १) चित्रवाणी-२ | संस्कृत गद्य-पद्य वेचे (P.D.) |
| | २) Jayakar Library | Catalogue of Thesis and Dissertations |
| | ३) मुडलगीचे स्वामी | डॉ. पण्डित आवळीकर |
| | ४) जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ - मराठ्यांचा इतिहासकार व प्रशासक | डॉ. अ. रा. कुलकर्णी |
| १९७२ | मराठी गद्य-पद्य वेचे | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९७३ | १) प्रा. हिरियण्णाकृत भारतीय तत्त्वज्ञानाची रूपरेषा | प्रा. भा. ग. केतकर |
| | २) माधवस्वामीकृत योगवसिष्ठ | डॉ. शं. गो. तुळपुळे |
| | ३) In Search of God | प्रा. एन. जी. दामले |
| | ४) East versus West Philosophy of Life and Literature | डॉ. प्रभाकर माचवे |
| १९७४ | १) Ajanta - A Cultural Study | एम. के. ढवळीकर |
| | २) The University of Poona, 1949-74 | डब्ल्यू. एच. गोळे |
| | ३) साहित्य परिमल | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ४) महर्षि शिंदे जन्मशताब्दी व्याख्यानमाला | मा. पं. मंगुडकर |
| | ५) बदलत्या महाराष्ट्राचे स्वरूप | मा. पं. मंगुडकर |
| | ६) Marathi Encyclopaedia of Philosophy | प्रा. डी. डी. वाडेकर |
| १९७५ | १) Sacrifice in the Brahmana - Texts | जी. यू. थिटे |
| | २) छत्रपति शिवाजी महाराज | दि. वा. काळे |
| १९७६ | १) अमरभारती | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | २) Science & Technology Journal of the University of Poona | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९७७ | १) Indian Philosophical Quarterly | एस. एस. बारलिंगे, राजेंद्र प्रसाद |

| वर्ष | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| | २) Lokhitwadi's Thought : A Critical Study | व्ही. के. क्षिरे |
| १९७८ | मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार | अरविंद मंगरुळकर |
| १९७९ | १) Panini as a Variationist | पॉल किपास्की |
| | २) Regularity, Normativity and Rules of Language and other Essays in Philosophical Analysis | राजेंद्र प्रसाद |
| | ३) अवकाश संशोधन | सुधाकर भालेराव |
| १९८० | १) The Concept of Moral Obligation | एस. आर. तळघट्टी |
| | २) C.A.S.S. Studies | एस. डी. जोशी |
| | ३) श्रीमद्भागवतादर्श अथवा श्रीमद्भागवताचा उपसंहार | य. त्र्यं. कोल्हटकर |
| | ४) Proceedings of III Session - Indian Geological Congress | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ५) T.Y.B.A. Sanskrit Selections | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९८१ | १) मानसिक आरोग्य | डॉ. चं. गं. देशपांडे |
| | २) संस्कृत व्याकरणामधील काही मूलभूत समस्यांचा आधुनिक भाषाशास्त्रीय उलगडा | डॉ. गं. बा. पळसुळे |
| १९८२ | १) C.A.S.S. Studies | एस. डी. जोशी |
| | २) 'I' in Science Religion and Everyday Life | डॉ. व्ही. जी. भिडे |
| | ३) आत्मानंद व त्याचे जीवनातील स्थान | सौ. पद्मा कुलकर्णी |
| | ४) श्री. अरविंदांचे तत्त्वचिंतन | डॉ. ग. ना. जोशी |
| | ५) Sedimentology : A Historical Perspective | एस. एम. माथूर |
| १९८३ | १) पत्रकारितेचा स्वभाव | ल. ना. गोखले |
| | २) प्रथम वर्ष साहित्य मराठी अभ्यास पुस्तक | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ३) प्रथम वर्ष वाणिज्य मराठी अभ्यास पुस्तक | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ४) F.Y.B.Com. English Study Text-Book | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ५) प्रथम वर्ष वाणिज्य हिंदी अभ्यास पुस्तक | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ६) प्रथम वर्ष वाणिज्य व्यापारी भूगोल अभ्यास पुस्तक | पुणे विद्यापीठ प्रकाशन |

| वर्ष | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १९८४ | Federal Element in the Indian Constitution | एच. आर. खन्ना |
| १९८५ | १) प्रथम वर्ष वाणिज्य व द्वितीय वर्ष विज्ञान व्यावहारिक मराठी : पाठ्यपुस्तक | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | २) The Philosophy of Kalidas Bhattacharya | दया कृष्णा |
| | ३) महात्मा फुले यांचे सामाजिक प्रबोधनाचे प्रयत्न | प्रा. मा. म. देशमुख |
| | ४) भक्ति रस अनुभव का स्वरूप | डॉ. विद्या निवास मिश्रा |
| १९८६ | १) Hydrology of Volcanic Terrain | के. बी. पवार, एस. एस. ठिगळे |
| | २) Descriptive Catalogue of Manuscripts | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ३) महाराष्ट्रातील औद्योगिक विकेंद्रीकरण | डॉ. वि. म. दांडेकर |
| १९८७ | १) सुभाषितशतकम् | सरोजा भाटे |
| | २) हिन्दी वर्तनी और शब्दलेखन | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९८८ | १) Indian Science Congress | Souvenir |
| | २) Judicial Independence - Myth and Reality | पी. बी. सावंत |
| | ३) Earthquake Prediction - Present Status | एस. के. गुहा |
| | ४) सुभाषितशतकम् | सरोजा भाटे |
| १९८९ | १) स्वातंत्र्यवीर सावरकरांची शस्त्रास्त्रांच्या वापराबद्दलची भूमिका | डॉ. य. दि. फडके |
| | २) Krishna Tulas (Ocimum Sanctum)-A Monograph | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ३) A Concordance of Vedic Compounds interpreted by Veda | एम. डी. पंडित |
| | ४) मराठी दोलामुद्रितांची तालिका | डॉ. शां. ग. महाजन |
| | ५) प्रथम वर्ष वाणिज्य हिंदी पाठ्यपुस्तक | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ६) Panini's Tadhhita Rules | सरोजा भाटे |
| १९९० | १) संस्कृतमन्दाकिनी | व. त्र्यं. झांबरे, वि. बा. इनामदार |
| | २) प्राचीन भारतीय जलशास्त्र | म. दे. पंडित |

| वर्ष | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव |
| --- | --- | --- |
| | ३) प्रथम वर्ष वाणिज्य मराठी पाठ्यपुस्तक | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : विचार आणि कार्य – परिसंवाद | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ५) अंधश्रद्धेकडून विज्ञानाकडे | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ६) पाइय–रयण–माला | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | ७) गीर्वाण–वाणी–विलासः | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९९१ | १) The Rgvedic Family Mandalas - A Statistical Study | एम. डी. पंडित |
| | २) Western Maharashtra - A Study in Population Geography | युसुफ खान सदुलॅक्स |
| | ३) Ecological Characteristics of Wood Decay and Cord Forming Fungi from the Campus of Poona University | जे. जी. वैद्य |
| | ४) परंड्याचे हंसराजस्वामी : चरित्र, वाङ्मय, तत्त्वज्ञान | कल्याण काळे |
| १९९२ | १) Anatomy and Histology of the Common House-Shrew | डॉ. आर. व्ही. रानडे |
| | २) Guide to Resources - Jayakar Library | एस. जी. महाजन |
| | ३) पाइयपाहा (अर्धमागधी प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी) | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९९३ | १) Proceedings of the National Seminar on Biomedical Research in Yoga | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | २) Dr. Ambedkar and Empowerment : Constitutional Vicissitudes | के. आय. विभूते |
| १९९४ | १) Precious Thoughts - Convocation Addresses : 1949-93 | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| | २) विद्यापीठास मिळालेल्या देणग्यांची माहिती | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| १९९९ | पुणे विद्यापीठाचा इतिहास | पुणे विद्यापीठ प्रकाशन |
| २००० | Vedic Vision of the Universe - Dr. Shankar B. Chandekar | पुणे विद्यापीठ प्रकाशन |

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय, अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सन्मानित करण्यात येणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावे

१. **डॉ. दत्तात्रय सुभाष कुटे,** व्यवस्थापक

२. **डॉ. अशोक तुकाराम कुडले,** लेखपट यंत्रप्रमुख

३. **श्री. शिवाजी पोपट बाराथे,** पर्यवेक्षक, मानक व नियोजन

४. **श्री. संदिप तुकाराम देवकर,** प्रतिरूप यंत्रचालक श्रेणी–१

५. **श्री. नवनाथ भिकाजी शिंदे,** प्रतिरूप यंत्रचालक श्रेणी–१

६. **श्री. अशोक कारभारी तुपे,** प्रतिरूप यंत्रचालक श्रेणी–१

७. **श्री. दादा बबन जाधव,** प्रतिरूप यंत्रचालक श्रेणी–१

८. **श्री. विजय पंढरीनाथ ववले,** प्रक्रिया चालक

९. **श्री. अनंत बबन काळोखे,** बांधणीकार

१०. **श्री. संदीप हरिश्चंद्र पवार,** बांधणीकार

११. **श्री. मनोज चंदू चव्हाण,** बांधणीकार

१२. **श्री. विनायक श्रीकांत भोसले,** बांधणीकार

१३. **श्री. मनोज शिवाजी निगडे,** बांधणीकार

१४. **श्री. अंबरीश विलास कुलकर्णी,** शिपाई

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मुद्रणालय, अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सन्मानित करण्यात येणाऱ्या माजी अधिकारी, कर्मचाऱ्यांची नावे

१. **श्री. सु. शां. क्षीरसागर,** व्यवस्थापक

२. **श्री. सु. कृ. पानसे,** व्यवस्थापक

३. **श्री. दि. म. बेलेकर,** भांडारपाल

४. **श्री. हि. श्री. चोरडिया,** मुद्रित-शोधक

५. **श्री. अ. कि. शिंदे,** मुद्रित-शोधक नि ऑफसेट प्रोसेस सहाय्यक

६. **श्री. बा. ना. शेलार,** सिनीयर कंपोझिटर कम् डी.टी.पी. ऑपरेटर

७. **श्री. वा. बा. निघोजकर,** मोनो ऑपरेटर कम् डी.टी.पी. ऑपरेटर

८. **श्री. ग. वि. पाटील,** मोनो ऑपरेटर कम् डी.टी.पी. ऑपरेटर

९. **श्री. ल. गुं. नडगिरे,** सहायक पर्यवेक्षक, लेखपट

१०. **श्री. वि. म. झगडे,** ऑफसेट मशीनमन

११. **श्री. र. ज. क्षीरसागर,** लेखपट यंत्रचालक

१२. **श्री. द. हि. वाघमारे,** प्रतिरूप यंत्रचालक श्रेणी-१

१३. **श्री. इं. पां. कसबे,** प्रतिरूप यंत्रचालक श्रेणी-१

१४. **श्री. रा. द. चव्हाण,** फोरमन कम् बाइंडर

१५. **श्री. ध. म. मल्हारे,** बाइंडर

१६. **श्री. वि. ज. ओरपे,** बाइंडर

१७. **श्री. इंद्रजित वि. शिरोळे,** बांधणीकार

१८. **श्री. सुनील गवारे,** बांधणीकार

# विद्यापीठ मुद्रणालयातील डीटीपी, मशिन व बांधणी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची छायाचित्रे














# सावित्रीबाई फुले
# पुणे विद्यापीठ



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे ४११००७ महाराष्ट्र, भारत
www.unipune.ac.in